# भारतीय राजकीय विचारवंत

लेखक

**डॉ. संभाजी संतोष पाटील**

सहयोगी प्राध्यापक
श्री.शि.वि.प्र.संस्थेचे भाऊसाहेब ना.स. पाटील साहित्य
व मु.फि.मु.अ. वाणिज्य महाविद्यालय, देवपूर, धुळे

---

**SIDDHI PUBLISHING HOUSE**
**NANDED – 431605.**

**ISBN No.: 978-81-960521-3-3**

**लेखक**
**डॉ. संभाजी संतोष पाटील**
**मो. नंबर : ९४२३७३०५११**

*

**प्रकाशक**
सिद्धी पब्लिकेशन,
मारोती मंदिराजवळ,
भावसार चौक, तरोडा खु. नांदेड़
मो. 9623979067
ईमेल – shrishprakashan2009@gmail.com
Website : www.wiidrj.com

*

**अक्षर जुळवणी**
डॉ. राजेश गंगाधरराव उंबरकर

*

**मुद्रक**
अनुपम प्रिंटर्स
श्रीनगर, नांदेड़. मो. 9175324437
© सर्व अधिकार संपादकाकडे

*

**प्रथम आवृत्ती**
**24 मे 2022**
**किंमत : 400 /- रु**

# :: समर्पित ::

आदरणीय गुरुवर्य

**प्राचार्य डॉ. पी.डी. देवरे**

**मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन परिषद**

# :: मनोगत ::

"भारतीय राजकीय विचार" या ग्रंथामध्ये भारतीय राजकीय विचारांची मुहूर्तमेढ घालणाऱ्या विचारवंतांचा समावेश करण्यात आलेला आहे. तसेच भारतातील ब्रिटीश राजवटीतील प्रमुख राजकीय प्रवाहांचा आढावा या ग्रंथात करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. तसेच भारतीय स्वातंत्र्य आणि त्यासाठी करण्यात आलेले प्रयत्न या सर्वांचा उहापोह यात करण्यात आलेला आहे. भारतीय स्वातंत्र्य ही केवळ राजकीय स्वरुपाची घटना नाही तर ती सुधारणावादी, सामाजिक, आर्थिक, निधर्मी व प्रबोधनाची एक चळवळ होती. थोर भारतीय विचारवंतांनी व राजकीय नेत्यांनी विविध क्षेत्रात जी आंदोलने करुन आपले विचार हे भारतीय जनतेपर्यंत पोहचविले त्या सर्वांचा संग्रह करुन येथे मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. राजा राममोहन रॉय यांच्यापासुन राम मनोहर लोहिया यांच्यापर्यंत एकूण दहा मान्यवरांच्या राजकीय व सामाजीक विचारांचा अंतर्भाव प्रस्तुत ग्रंथात केला आहे.

आधुनिक भारताचा प्रारंभ ब्रिटीशांच्या आगमनानंतरचा आहे. त्यांच्या नवबदलांचा प्रभाव भारतीय लोकांवर पडला त्यामुळे विचारमंथनास सुरुवात झाली. राजा राममोहन राय यांनी त्यास वैचारीक आधार देऊन प्रबोधन काळास खऱ्या अर्थाने प्रारंभ केला. महात्मा फुले, नामदार गोखले, न्या. रानडे, दादाभाई नौरोजी, राजर्षी शाहु महाराज, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडित जवाहरलाल नेहरु, विनायक दामोदर सावरकर, सुभाषचंद्र बोस, मौलाना आझाद, राममनोहर लोहिया इत्यादी विचारवंतांनी भारतातील बदलत्या परिस्थितीला अनुरुप व भविष्यकालीन उपाययोजना म्हणून तत्कालीन आवश्यकतेतुन व लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी विविध विषयांवर चिंतन करुन वैचारिक मांडणी केली आहे. या विचारवंतांनी जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडुन जनतेला पुढे नेण्याचेही काम केले. ब्रिटीश साम्राज्यशाही घालविण्यासाठी स्वातंत्र्य आंदोलनाचा लढा तीव्र करण्याचे काम ह्या विचारवंतांनी केले. या थोर विचारवंतांच्या विचारांची आज गरज आहे. त्यांचे विचार आजच्या तरुणांना प्रेरणादायी व मार्गदर्शन करणारे आहेत. हा

ग्रंथ राज्यशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांना निश्चितपणे उपयुक्त ठरेल तसेच स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना उपयोगी पडेल अशी खात्री बाळगतो. या ग्रंथाच्या लेखन कार्यास मला अनेक मित्र व हितचिंतकांचे मला मार्गदर्शन व सहकार्य लाभले. त्याबद्दल सर्वांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करणे हे माझे कर्तव्य समजतो.

माझ्या लेखन कार्यास पितृतुल्य अप्पासाहेब प्राचार्य डॉ. पी.डी. देवरे यांची प्रेरणा लाभलेली आहे. श्री.शि.वि.प्र. संस्थेचे चेअरमन आमदार बाबासाहेब श्री. कुणालजी पाटील, उपाध्यक्ष डॉ. संजय पाटील, उपाध्यक्ष श्री. प्रफुल्लकुमार सिसोदे, प्रशासकिय अधिकारी श्री. प्रमोद पाटील, प्राचार्य डॉ. मनोहर पाटील, प्राचार्य डॉ. संजय सोनवणे, प्राचार्य डॉ. एम.व्ही. पाटील, प्राचार्य डॉ. एम.एच. शिंदे, प्राचार्य डॉ. आर.आर. अहिरे, प्राचार्य डॉ. अशोक खैरनार, प्राचार्य डॉ. आर.बी. पाटील, प्रा. शशीकांत बोरसे, डॉ. रवि वाघ, डॉ. मोहन पावरा, डॉ. जितेंद्र तलवारे, प्रा.ए.आर. पाटील, प्रा.के.व्ही. महाले यांच्या मार्गदर्शन व प्रोत्साहनामुळे हा ग्रंथ पुर्ण करु शकलो तसेच डॉ. विजय तुंटे, डॉ. महेंद्र पाटील, डॉ. मनिषा कचवे, प्रा. आनंद पवार, ग्रंथपाल बबन गावीत आणि महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य मिळाले त्यांच्या ऋणात राहु इच्छितो.

महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. प्रमोद पवार यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाल्याने मी हा ग्रंथ आपल्या हाती देत आहे. कौटुंबिक परिवारातुन आई सौ. जयवंताबाई संतोष शिंदे, वडील अण्णासाो. श्री. संतोष नथु शिंदे, पत्नी सौ. संगिता पाटील, कन्या कु. दिव्या व मुलगा नीलवर्ण यांच्या सहकार्यामुळे प्रस्तुत ग्रंथ लिखाणाचे काम पुर्णत्वास आले.

**डॉ. संभाजी संतोष पाटील**

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | विषय | पान क्र. |
|---|---|---|
| १. | राजा राममोहन रॉय | ०७ |
| २. | दादाभाई नौरोजी | २९ |
| ३. | महादेव गोविंद रानडे | ३८ |
| ४. | लोकमान्य बाळ गंगाधर टिळक | ५४ |
| ५. | महात्मा गांधी | ७३ |
| ६. | पंडित जवाहरलाल नेहरु | ८५ |
| ७. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर | ९८ |
| ८. | विनायक दामोदर सावरकर | ११० |
| ९. | डॉ. सुभाषचंद्र बोस | १२३ |
| १०. | राम मनोहर लोहिया | १३० |
| | **संदर्भ ग्रंथसुची** | १३७ |

## प्रकरण १ ले

# राजा राममोहन रॉय

**जीवनपरीचय :**

राजा राममोहन रॉय यांचा जन्म २२ मे १७७२ मध्ये बंगाल मधील राधानगर येथील ब्राम्हण कुटुंबात झाला. त्यांच्या आजोबांनी स्थानिक प्रशासन कार्यात चांगली कामगिरी केल्याबद्दल रॉय हा सन्मानदर्शक किताब मिळाला. त्यामुळे तेच नाव पुढे सुरु राहिले. राममोहन यांना दिल्लीच्या मोगल बादशाहने राजा हा सन्मानदर्शक किताब दिला होता. मात्र राम मोहन हे नेहमी राजेशाही विरुध्द राहिले. राजा राममोहन रॉय यांनी पारशी, अरबी, ग्रीक, लॅटीन, फ्रेंच व हिंदी या भाषांचाही अभ्यास केला. पुढे तिबेटात जाऊन त्यांनी बौध्द धर्म आणि तत्वज्ञानाचा अभ्यास केला. तसेच ईस्ट इंडिया कंपनीत नोकरी करतांना ख्रिश्चन धर्माचा अभ्यास केला. त्यांनी कोणत्याही एका धर्माचा पुरस्कार केला नाही. धर्मातील अनिष्ठ रुढी, प्रथा परंपरेवर त्यांनी जोरदार टिका केली. १८१५ मध्ये त्यांनी कलकत्त्याला आत्मिय सभेची स्थापना केली. जातीभेद रुढीविरुध्द या संस्थेने कार्य केले. १८१८ मध्ये त्यांनी हिंदू धर्मातील सतीची चाल या विरुध्द मोहिम सुरु केली. नंतर गव्हर्नर जनरल लॉर्ड बेन्टींक यांनी १८२८ मध्ये सतीची चाल बेकायदेशीर ठरवून रद्द केली. रॉय यांनी ब्राम्हो समाजाची स्थापना केली. रॉय यांनी व्यक्ती स्वातंत्र्याशिवाय व्यक्तीचा विकास होत नाही. त्याप्रमाणे वृत्तपत्र स्वातंत्र्याचा पुरस्कार त्यांनी केला. तसेच त्यांनी समाज सुधारणेविषयी विचार मांडले. राजाराम मोहन रॉय यांना सामाजिक प्रबोधनाचे जनक म्हणतात. समाज सुधारणेत त्यांनी स्त्री शिक्षणाला जास्त महत्व दिले. स्त्रीयांना कुटुंबात पुरुषांप्रमाणेच मालमत्तेचा हक्क मिळावा यासाठी त्यांनी प्रयत्न केले. अशा या थोर विचारवंताचा मृत्यु २७ सप्टेंबर १८३३ मध्ये झाला.

**रॉय यांचे समाज सुधारणेविषयी विचार :**

राजाराम मोहन रॉय यांचा जन्म झाला तेव्हा या देशात जातीभेद, धर्मभेद यात विषमता होती. रॉय यांच्या मते भारतातील जाती, उपजाती, धर्म,

पंथ आणि उपपंथ यामुळे समाजाचे तुकडे झाले. राजकीय आणि सामाजिक हितासाठी धर्मात परिवर्तन व्हावे असे त्यांना वाटे. रॉय यांचे सामाजिक कार्य पुढील प्रमाणे -

१. मुर्तीपुजेला विरोध
२. अंधश्रध्देला विरोध
३. जातीव्यवस्थेला विरोध
४. शिक्षणविषयक विचार
५. स्त्री मुक्तीचे जनक
६. धार्मिक सुधारणा

**१. मुतीपुजेला विरोध :**

राजाराम मोहन रॉय यांच्यावर ख्रिश्चन, इस्लाम आणि बौध्द धर्माचा प्रभाव होता. हिंदू धर्मातील मूर्तीपुजेला त्यांचा विरोध होता. परमेश्वराने मानवी रुप घेणे हे त्यांना मान्य नव्हते तसेच मुर्तीपुजा करुन ईश्वरी उपासना होते हे त्यांना मान्य नव्हते. सन १८२८ मध्ये त्यांनी कलकत्ता येथे स्थापन केलेल्या मंदीरात कोणतीही मुर्ती ठेवण्यात आली नाही. मात्र सर्व जातीचे आणि धर्माचे लोक तेथे एकत्र येऊ शकतात. समाज उत्कर्षाचा विचार आणि चर्चा करण्यासाठी एक चांगले व्यासपीठ असावे हा त्यांचा दृष्टीकोन होता. त्यांनी स्थापन केलेल्या ब्राम्हो समाजाचा हेतू समाज सुधारणेचा होता. त्यांच्या मते सर्व शक्तीमान आणि सर्वव्यापी असा परमेश्वर मुर्तीत राहू शकत नाही. परमेश्वर एक असल्यामुळे असंख्य मुर्तीची पुजा करणे त्यांना मान्य नव्हते.

**२. अंधश्रध्देला विरोध :**

रॉय यांच्या मते अंधश्रध्देचे मुळ अज्ञानात आहे. मुर्तीपुजेप्रमाणेच हिंदू धर्मातील अंधश्रध्देला त्यांनी विरोध केला. रॉय हे कोणत्याही धर्माच्या विरुध्द नव्हते. धर्मगुरुंना त्यांचा विरोध होता. कारण ते लोकांची दिशाभूल करत. धर्मातील ज्या अनिष्ट रुढी आहेत त्या नष्ट केल्या पाहिजेत. लोकांनी स्वतःच्या बुध्दीनुसार धर्माचे आचरण करावे. सतीची चाल परंपरेनुसार सुरु ठेवल्यास पुण्यसंचय होतो, तसेच सातसमुद्र पार केल्याने महापाप होते अशा अंधश्रध्देला त्यांनी प्रखर विरोध केला. एवढेच नाही तर त्यांनी वेद व गिता यांचा आधार घेऊन आपले विचार स्पष्ट केले.

### ३. जातीव्यवस्थेला विरोध :

रॉय यांच्या काळात भारतातील जातीय व्यवस्थेने अत्यंत विकृत स्वरुप धारण केलेले होते. समाजात व्यक्ती व्यक्तींमध्ये जातीच्या आधारावर भेदभाव करण्यात येत होता. समाजातील काही जातींना नगण्य स्थान होते. तर काही जातींना वाजवीपेक्षा जास्त महत्व प्राप्त झाले होते. अशा या परिस्थितीत सर्वत्र विषमता दिसून येत होती. समाजाचे अनेक जाती आणि उपजातींमध्ये विभाजन झाले होते. त्यामुळे समाजाचे ऐक्य नष्ट झाले होते. अशा या परिस्थितीत रॉय यांनी समाजात एकात्मता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. रॉय यांच्या मते, समाजातील सर्व व्यक्ती सारख्याच आहेत. म्हणून कोणत्याही जातीच्या आधारावर व्यक्तींमध्ये श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेदभाव करणे चुकीचे आहे. पूर्वी समाजातील कनिष्ठ जातीला अपमानकारक आणि वाईट वागणूक दिली जात होती. तसेच मोठ्या प्रमाणात कनिष्ठ जातींचे धर्मांतर होत होते. कनिष्ठ जातीतील लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी आत्मीय सभेची स्थापना केली.

### ४. शिक्षणविषयक विचार :

राजाराम मोहन रॉय यांच्या मते देशाच्या शिक्षण पध्दतीत आमुलाग्र बदल झाला पाहिजे. भारतीयांना देखील पाश्चात्य पध्दतीने शिक्षण दिले पाहिजे. तसेच इंग्रजी शिक्षणामार्फत भारतीय जनतेत नविन क्षमता आणि नविन जाणिव निर्माण होईल. असा रॉ यांचा विश्वास होता. इंग्रजी शिक्षणाचे महत्व त्यांना माहित होते. संपूर्ण शिक्षण पध्दतीत परीवर्तन करण्याची त्यांची महत्वाकांक्षा होती. नव्या पिढीला पाश्चात्य पध्दतीने शिक्षण दिले पाहिजे. तसेच इंग्रजी शिक्षणामार्फत भारतीय जनतेत नविन क्षमता आणि नविन जाणिव निर्माण होईल असा रॉय यांचा विश्वास होता. संपूर्ण शिक्षण पध्दतीत परीवर्तन करण्याची त्यांची महत्वाकांक्षा होती. नव्या पिढीला पाश्चात्यांप्रमाणे वैज्ञानिक शिक्षण द्यावे अशी रॉय यांची ईच्छा होती. शालेय अभ्यासक्रमात शरीरशास्त्र, गणित, नैसर्गिक शास्त्रे, रसायनशास्त्रे इ. विषयांचा समावेश करण्यात यावा असे त्यांचे मत होते. राजा राममोहन रॉय यांनी कलकत्त्याला पहिलीची इंग्रजी शाळा काढली. तसेच हिंदू महाविद्यालयाची स्थापना केली. रॉय यांच्या मते शिक्षणामुळे अज्ञानता दूर होते. अनिष्ठ रुढीतून व्यक्तींची सुटका होते आणि

तिला आधुनिक जीवनाची प्राप्ती होते तिचा सर्वांगिण विकास होतो म्हणून रॉय यांनी शिक्षणाचा पुरस्कार केलेला आहे.

**५. स्त्री मुक्तीचे जनक :**

राजा राममोहन रॉय यांनी स्त्री बंधनाला प्रखर विरोध केलेला आहे. त्याचप्रमाणे स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार केलेला आहे. राजा राममोहन रॉय यांना भारतातील स्त्रीला स्वातंत्र्याचे जनक म्हटले जाते. रॉय यांच्या काळात भारतातील स्त्रीयांचा दर्जा अतिशय हिन स्वरुपाचा होता. स्त्रीयांना कोठलेही स्वातंत्र्य नव्हते. अनिष्ठ रुढी व परंपरेच्या बंधनांनी स्त्रीला बांधून ठेवले होते. तिच्या जीवनाची किंमत केली जात नव्हती. पतीच्या मृत्युनंतर तिला सती जावे लागत असे आणि पतीच्या चितेवर स्वतःस झोकुन जाळून घ्यावे लागत असे. अशी क्रूर सतीची चाल रुढ झाली होती. अशा प्रकारे स्त्रीयांचा जीवन जगण्याचा हक्क हिरावून घेण्यात आला होता. स्त्रीयांना शिक्षणापासून लांब ठेवले होते. त्यांना स्वतःच्या विकासाची संधी उपलब्ध करुन दिली जात नव्हती. विवाहापूर्वी पित्यावर आणि विवाहानंतर पतीवर अवलंबून रहावे लागत असे. अशी स्त्रीयांची अवस्था होती. राजा राममोहन रॉय यांनी अशा बिकट परिस्थितीतून स्त्रीयांना मुक्त करण्याचा विचार मांडला. त्यांनी सांगितले की, सती प्रथा चांगली असेल तर पुरुषांनीही आपल्या मृत पत्नीबरोबर स्वतःला जाळून घ्यावे असा क्रांतीकारक विचार रॉय यांनी मांडला. स्त्रीयांना जीविताचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क समतेचा हक्क आणि मालमत्तेचा हक्क नाकारलेला होता. अशा परिस्थितीत स्त्री स्वातंत्र्यासाठी त्यांना बंधनातून मुक्त करण्यासाठी रॉय यांना जास्त कष्ट करावे लागले. त्यांनी बालविवाहाला विरोध केला तसेच १८१८ मध्ये सतीची चाल बंद करण्यास जोरदार प्रयत्न केले. बहुपत्नीत्व पध्दतीला त्यांनी विरोध केला. पुरुषांप्रमाणेच स्त्रीयांना देखील शिक्षणाची दालने उघडी असावीत असा विचार त्यांनी मांडला. रॉय यांनी स्त्रीयांच्या सर्वांगिण उन्नतीसाठी, स्त्रीयांसाठी मालमत्तेचा हक्क असावा याचा त्यांनी पुरस्कार केला. प्राचीन धर्मग्रंथाचा आधार घेऊन स्त्रीयांना पतीच्या मालमत्तेत वाटा मिळाला पाहिजे हे स्पष्ट केले. त्याचप्रमाणे पुरुषांना अपवादात्मक परिस्थितीत पहिली पत्नी हयात असतांना दुसरा विवाह करता येइल या संदर्भात त्यांनी मनुच्या मतांचा आधार घेतला आहे. बहुपत्नीत्वाचवी कल्पना चुकीची आहे मात्र

अपवादात्मक परिस्थितीत पत्नी ही पतीद्वेष करणारी, अपशब्द बोलाणारी, उधळपट्टी करणारी, व्यसनी, संततीहीन आणि रोगी असेल तर दुसरा विवाह करावा म्हणजेच संयुक्त कारण असले पाहिजे. त्यासाठी पहिल्या पत्नीची संतती असली पाहिजे. रॉय यांच्या मते पुरुषांच्या अरेरावीपणामुळे स्त्री ही असहाय्य आणि दुर्बल झाली याचा गैरफायदा पुरुषांनी घेतला आणि स्त्रीयांना गुलाम बनविले. वास्तविक पहाता स्त्री ही चारित्र्यवान आहे, समजूतदार आहे, अशा प्रकारे रॉय यांनी स्त्रीयांना रुढी परंपरेच्या बंधनातून मुक्त करण्यासाठी जे आवश्यक होते ते सर्व काही केले.

**६. धार्मिक सुधारणा :-**

रॉय यांच्या मते समाज सुधारणा घडवून आणावयाच्या असतील तर त्यांची सुरुवात धार्मिक सुधारणेपासून केली पाहिजे. संपूर्ण मानव जातीला संदेश देण्याचे कार्य त्यांनी केले. रॉय यांनी विश्वधर्माचा पुरस्कार केलेला होता. हिंदू, मुसलमान, बौध्द, ख्रिश्चन या धर्मांना एकत्र करुन त्यातील तत्वज्ञानाचा अभ्यास केला. रॉय यांच्या मते भारतात आधुनिक दृष्टीने धार्मिक विचार पुढे आले पाहिजेत. त्यातून समाज सुधारणा घडवून आणल्या पाहिजेत. भारतीय समाजातील अनिष्ट प्रथा, परंपरा आणि अंधश्रध्दा नष्ट करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. रॉय यांनी एकेश्वर वादाचा पुरस्कार केलेला आहे. प्रत्येक व्यक्तीला धार्मिक स्वातंत्र्य असले पाहिजे. ब्रिटीश सरकारने जनतेच्या धार्मिक बाबतीत हस्तक्षेप करता कामा नये. तसेच ख्रिश्चन मिशनऱ्यांनी भारतीयांची लाचारी, दुर्बलपणा, दारिद्रय यांचा फायदा उचलून आणि आर्थिक अमिषे दाखवून हिंदू व मुसलमानांना धर्मांतर करावयास लावणे हे अयोग्य आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. तसेच पुर्वीच्या राज्यकर्त्यांनी धर्म भ्रष्ट केले. धर्माची निंदा केली आणि जुलमाने धर्मांतर करावयास लावणे या गोष्टींना रॉय यांचा विरोध होता. रॉय म्हणतात, हिंदू धर्मातील खोटेपणा सिध्द करा आणि स्वतःच्या धर्माचा मोठेपणा दाखवून द्या. ख्रिश्चन धर्म कसा योग्य आहे हे पटवून द्या. तर अनेक लोक त्यांची तत्वे आणि धर्म स्वतःहून स्विकारतील. मात्र त्यांनी युक्तीवाद करणे सोडून द्यावे. रॉय यांचे धर्माविषयीचे विचार आजच्या भारतात धर्मनिरपेक्षतेच्या दृष्टीकोनातून दिसून येतात.

भारताप्रमाणे अनेक देश पारतंत्र्यात होते. सर्वत्र वसाहतवाद पसरलेला होता. वसाहतवादाला रॉय यांचा प्रखर विरोध होता. व्यक्ती स्वातंत्र्याप्रमाणेच राष्ट्रीय स्वातंत्र्याचा पुरस्कार रॉय यांनी केला. जगात कोणताही देश गुलामगिरीत राहु नये म्हणजे सर्वांना स्वातंत्र्य मिळावे, रॉय यांची स्वातंत्र्याची कल्पना अत्यंत व्यापक होती. परकीय देशांच्या स्वातंत्र्याबद्दल रॉय यांनी आनंद व्यक्त केला. मात्र भारताच्या स्वातंत्र्याच्या संदर्भात त्यांनी आपले विचार अगोदर व्यक्त केले नाही. ब्रिटीश साम्राज्याची स्तुती करत असतांना भारताला स्वातंत्र्य मिळावे असे मत मांडणारी व्यक्ती देखील रॉय हीच होती.

**भारताने स्वातंत्र्य गमावण्याची कारणे :**

एकीकडे ब्रिटीश साम्राज्याची स्तुती करीत असतांना दुसरीकडे भारताला स्वातंत्र्य का गमवावे लागले याची कारणे पुढीलप्रमाणे -

१. भारतात संघर्ष होते.
२. भारतीयांकडे शस्त्रे नव्हती.
३. राष्ट्रभक्तीचा अभाव.
४. मोठ्या प्रमाणात अंधश्रध्दा.
५. जातीय व्यवस्था.
६. एकात्मता नव्हती.

**१. भारतात संघर्ष होते :**

**ब्रिटीशांनी** भारतावर वर्चस्व प्रस्थापीत करण्यापूर्वी भारतातील निरनिराळ्या राज्यांमध्ये जे राजे होते त्यांच्यात संघर्ष सुरु होते. सर्वत्र यादवी युध्दाचे चित्र दिसत होते. जनतेच्या जीवाला शांतता नव्हती. सर्वत्र भितीचे वातावरण पसरलेले होते.

**२. भारतीयांकडे शस्त्रे नव्हती :**

भारतीयांजवळ ब्रिटीशांच्या आधुनिक शस्त्र सामुग्रीला तोंड देण्यासाठी आधुनिक शस्त्रे नव्हती तसेच प्रगत युध्द तंत्राचा अनुभव भारतीयांना नव्हता. भारतात युध्दकलेचा अभाव होता. म्हणून ब्रिटीशांसमोर भारतीयांना शरणागती पत्करावी लागली.

**३. राष्ट्रभक्तीचा अभाव :**

भारतीय समाजात राष्ट्रभक्तीचा अभाव होता. सर्वत्र स्वार्थी प्रवृत्ती होती. या परिस्थितीत देशाच्या स्वातंत्र्याचा विचार लोकांपासून लांब होता.

**४. मोठ्या प्रमाणात अंधश्रध्दा :**

भारतीय जनता मोठ्या प्रमाणात अंधश्रध्देच्या आहारी गेलेली होती. त्याचा फायदा धर्मगुरुंनी घेतलेला होत. धर्मगुरु हे लोकांची दिशाभूल करण्याचे काम करत.

**५. जातीय व्यवस्था :**

भारतात जातीय व्यवस्था मोठ्या प्रमाणात होती. भारतातील जातीय व्यवस्था स्वातंत्र्य प्राप्तीतील एक अडथळा होता. जातीच्या संकुचीत विचारांनी समाजात वेगवेगळ्या जाती आणि पोटजातींनी आपले स्थान बळकट केले होते. जातीय व्यवस्था भारताला लागलेला एक कलंक होता.

**६. भारतीय समाजात एकात्मता नव्हती :**

भारतात जातीजातीतील संघर्षामुळे समाजातील एकात्मता नष्ट झ ालेली होती. तसेच समाज अनिष्ट रुढी, परंपरेच्या आहारी गेलेला होता. थोडक्यात भारतीय समाजाची मोठ्या प्रमाणात धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात अवनती झालेली होती.

**७. ब्रिटीशांची आवश्यकता :**

रॉय यांच्या मते ब्रिटीश भारतात आल्यामुळे पाश्चात्य संस्कृती भारतात आली. ब्रिटीश हे उदार मतवादी होते. भारतीयांना देखील ते नागरी आणि धामिर्क हक्क देतील. ब्रिटीशांची भारतीयांना गरज आहे. ब्रिटीशांच्या सहवासात राहुन भारतीय जनता जबाबदार बनेल. स्वराज्य पेलण्याची पात्रता त्यांच्यात येईल आणि म्हणूनच जोपर्यंत भारतीयांची सामाजिक, धर्मिक आणि राजकीय प्रगती होत नाही तोपर्यंत ब्रिटीशांनी भारतातच रहावे जर का ते भारतातून निघून गेले तर भारतात अराजकता निर्माण होईल. नागरी व धार्मिक स्वातंत्र्य नष्ट होईल. म्हणून रॉय म्हणतात, ब्रिटीशांनी चाळीस वर्षांपर्यंत भारतात रहावे, ब्रिटीशांच्या उदारतेवर रॉय यांचा विश्वास होता.

रॉय यांच्या मते, ब्रिटीश राजवट चांगली आहे. त्यामुळे भारतीय जनतेचे कल्याण होईल या संदर्भात रॉय यांनी पुढील गोष्टी सांगितलेल्या आहेत.

१. ब्रिटीशांच्या राजवटीमुळे शेतीत सुधारणा झाली असून उत्पादनात वाढ झाली.
२. भारतीय जनता रुढी आणि परंपरेच्या कचाट्यातून बाहेर येत गेली. त्यांच्यावरील अंधश्रध्देचा पगडा नष्ट होऊन त्यांच्यात शास्त्रीय दृष्टीकोन निर्माण झाला.
३. ब्रिटीशांपूर्वीच्या मुस्लिम राज्यकर्त्यांनी जनतेचे नागरी आणि धार्मिक हक्क हिरावून घेतले होते. धर्म भ्रष्ट केला होता. मालमत्ता लुटली होती. मात्र ब्रिटीशांनी भारतीयांना नागरी हक्क प्राप्त करुन दिलेत. म्हणून राज्यकर्ते हे रक्षण करते आहेत.
४. ब्रिटीशांमुळे ज्ञानाचा प्रसार होत गेला. त्यामुळे लोकांच्या संस्कृतीत परीवर्तन होत गेले.
५. कायदा आणि न्यायदान पध्दतीत मोठे परिवर्तन झाले.
६. भारतातील जमीनदारांच्या जुलूमशाहीला पायबंद बसला.

अशाप्रकारे रॉय यांनी ब्रिटीश राजवटीचे कौतुक केले होते.

**रॉय यांच्या स्वातंत्र्यविषयक विचारांवर झालेली टिका :**

१. ब्रिटीशांचे राज्य भारतीयांच्या हितासाठी प्रस्थापीत झाले आहे असे मत रॉय यांनी व्यक्त केले. टिकाकारांच्या मते रॉय यांच्यानंतर आलेल्या नेत्यांनी स्वातंत्र्याची मागणी केलेली आहे. मात्र रॉय यांनी केलेली नाही.
२. ब्रिटीश राज्यकर्त्यांविरुध्द जेव्हा मराठे आणि शिख स्वातंत्र्य मिळविण्यासाठी लढत असतांना रॉय यांनी आपल्या देशबांधवांची बाजु न घेता उलट ब्रिटीशांची स्तुती केलेली आहे.
३. भारतीय जनतेसाठी भारतातील विधानमंडळांनी कायदे करु नये तर ब्रिटनच्या विधीमंडळाने कायदे करावेत अशी सुचना रॉय यांनी केली.
४. ब्रिटनच्या House of Commens च्या निवड समितीने रॉय यांचे मत मागितले तेव्हा सुशिक्षित वैभवशाली अशा युरोपियनांना भारतात उद्योगधंदे काढण्यास आणि मालमत्ता घेऊन स्थायिक होण्यास परवानगी

द्यावी असे मत व्यक्त केले. टिकाकारांच्या मते रॉय हे पाश्चात्य धोरणांनी भारावून गेले होते.

**टिकेचे खंडन / युक्तीवाद :**

१. रॉय यांनी त्या काळातील परिस्थिती लक्षात घेऊन स्वातंत्र्य विषयक विचार आणि भारतीयांच्या हितासाठी सुचना केल्या आहेत. भारतीयांच्या सर्वांगिण कल्याणाची भावना त्यांच्या मनात होती.

२. भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळाले पहिजे असा संदेश रॉय यांनी सर्वप्रथम मांडलेला आहे. "The Raja was the first drive the assage of Politial freedom to India". इंग्रजांनी भारतात आपली सत्ता प्रस्थापीत केली तेव्हा भारत पारतंत्र्यात गेला ही गोष्ट रॉय यांना सहन झाली नाही म्हणून ते तिबेटात निघून गेले. यावरुन देशप्रेम आणि स्वातंत्र्याची भावना लक्षात येते.

३. ब्रिटीशांबद्दल रॉय यांना आदर वाटत होता. त्यांच्यामुळे शेती व्यवस्थेत सुधारणा झाली. भारतीय जनतेला नागरी हक्क मिळाले, शांतता प्रस्थापित झाली. त्यांनी जनतेला सुधारण्याचे आणि सुसंस्कृत करण्याचे उद्दिष्ट ठेवले, म्हणून काही काळ त्यांची सत्ता हिंदुस्थानात रहावी, त्यामुळे उद्योगधंदे व व्यापार यात वाढ होईल, तंत्रज्ञान, यंत्र सामुग्री शास्त्रीय ज्ञान यामुळे औद्योगिक विकास होईल. परिणामतः भारतीय लोक राज्यकारभार करण्यास आणि स्वातंत्र्य मिळवण्यास पात्र होतील आणि ब्रिटीश राज्यकर्ते हिंदुस्थानला स्वराज्य देऊन निघून जातील असा रॉय यांचा विश्वास होता. भारतीयांमध्ये पात्रता नसतांना ब्रिटीश राज्यकर्ते निघून गेले तर भारतात अराजकता माजेल. सामाजिक, राजकीय व आर्थिक प्रगती होणार नाही म्हणून जोपर्यंत जबाबदार नागरीक होत नाही तेवढा काळ ब्रिटीशांची सत्ता भारतात रहावी, ब्रिटीशांच्या नियंत्रणाखाली हिंदुस्थान आला हे हिंदुस्थानच्या दृष्टीने भाग्याची गोष्ट आहे. ब्रिटीश नसले तर भारतात सुधारणा होण्यास बराच काळ लागला असता म्हणून ब्रिटीशांनी कमीत कमी चाळीस वर्षांपर्यंत भारतात राहिले पाहिजे असे मत व्यक्त गेले.

४. राजा राममोहन रॉय यांनी भारताच्या स्वातंत्र्याची मागणी केली नव्हती. कारण त्यावेळची परिस्थिती अनुकुल नव्हती. संपूर्ण भारतात ब्रिटीशांची सत्ता प्रस्थापित झालेली नव्हती. तसेच भारतीय जनतेला राष्ट्रीयत्वाची जाणीव झालेली नव्हती व राज्यकारभाचा भार पेलण्यास ते तयार नव्हते अशा परिस्थितीत स्वातंत्र्याची मागणी न करणे जनतेच्या हिताचे होते. रॉय यांनी जरी स्वातंत्र्याची मागणी केलेली नसली तरी त्यांनी भारतीय जनतेसाठी सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले. त्यांचे अंतिम उद्दिष्ट स्वातंत्र्य प्राप्त करणे हे होते.

५. जेव्हा रॉय यांच्याकडे युरोपियांच्या भारतातील उद्योगधंदे आणि स्थानिक होण्याच्या संदर्भात मत मागितले तेव्हा रॉय यांनी भारतीय जनतेच्या कल्याणाचा विचार करुनच म्हणजे सुशिक्षित आणि संपन्न लोकांना भारतात स्थायिक होण्याची परवानगी देण्यात यावी असे सुचविले होते. रॉय यांच्या विचारात परकीयपणा व लाचारीवृत्ती नव्हती तर ब्रिटीशांच्या भारतातील वास्तव्यामुळे त्यांच्या संपत्तीच्या ज्ञानाचा कौशल्याचा फायदा भारतीय जनतेला होईल.

**रॉय यांचे व्यक्तीस्वातंत्र्याविषयी विचार :**

राजा राममोहनरॉय यांनी ब्रिटीश साम्राज्याचे जरी समर्थन केलेले असले तरी त्यांनी व्यक्तीस्वातंत्र्याकडे दुर्लक्ष केलेले नाही. त्यांच्या मते व्यक्ती फक्त शरीराने स्वतंत्र असून चालत नाही तर विचारांनी व मनाने देखील ती स्वतंत्र असली पाहिजे. भारतातील अंधश्रध्देमुळे आणि धर्मातील कर्मकांडामुळे मनुष्याचे व्यक्तीस्वातंत्र्य नष्ट झालेले होते. रॉय यांच्या मते हक्कातून व्यकतीचे स्वातंत्र्य व्यक्त होते. हक्काचे वेगवेगळे प्रकार आहेत. नैसर्गिक हक्क, नागरी हक्क, मानवी हक्क, कायदेशीर हक्क दोन प्रकारचे १) नागरी हक्क, राजकीय हक्क रॉय यांनी नागरी हक्काला महत्वाचे स्थान दिलेले आहे. त्यांच्यामते नागरी हक्काला राज्याचे संरक्षण असते आणि न्यायालयाचा आधार असतो. तसेच कोणतेही हक्क अमर्यादित नसतात. त्याचप्रमाणे हक्कांची निर्मिती समाजात आणि लोकशाहीतच होते. रॉय यांनी सांगितलेले नागरी हक्क पुढीलप्रमाणे आहेत -

१. जिवीताचा हक्क
२. धर्मस्वातंत्र्याचा हक्क
३. व्यक्तीस्वातंत्र्याचा हक्क
४. शैक्षणिक हक्क
५. विचार, उच्चार स्वातंत्र्याचा हक्क
६. संपत्ती/मालमत्तेचा हक्क

**१) जिवीताचा हक्क :** रॉय यांच्या मते या हक्कांशिवाय समाज जिवंत राहू शकत नाही. प्रत्येक मनुष्याला जोपर्यंत स्वतःच्या जीवीताची हमी मिळत नाही तोपर्यंत सुसंस्कृत समाज प्रस्थापित होऊ शकत नाही. कोणीही दुसऱ्या कोणावर हल्ला करीत असेल, दुसऱ्यांचा जीव घेत असेल तर जगली प्राण्यांमध्ये आणि मानवात फरक राहणार नाही. म्हणून राज्यकर्त्यांनी व्यक्तीच्या जीवनरक्षणाची जबाबदारी उचलली पाहिजे.

**२) धर्मस्वातंत्र्याचा हक्क :** मनुष्याच्या जीवनात धर्म आवश्यक आहे. रॉय हे स्वतः विश्वबंधुत्व आणि विश्वधर्म यांचा पुरस्कार करणारे असले तरी प्रत्येकाला धार्मिक स्वातंत्र्य असले पाहिजे असे मत व्यक्त केले. प्रत्येकाला आपल्या धर्मानुसार आचरण करण्याचे स्वातंत्र्य असावे, कोणावरही विशिष्ट धर्म लादला जाऊ नये, सरकारने देखील व्यक्तींच्या धार्मिक जीवनात हस्तक्षेप करु नये तसेच तिच्या विकासास मारक ठरतील अशी बंधने लादू नये. प्रत्येकाने दुसऱ्या धर्माबद्दल आदर ठेवला पाहिजे. मुस्लीम राज्यकर्त्यांनी जनतेवर इस्लाम धर्माची सक्ती केली तर ख्रिश्चनांनी भारतातील गरीब अज्ञानी जनतेचा फायदा उठविला आणि सक्तीने धर्मांतर घडवून आणले या गोष्टींना रॉय यांचा विरोध होता.

**३) व्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क :** रॉय यांच्या मते व्यक्तीचा सर्वांगिण विकास करायचा असेल तर व्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क प्रत्येकाला प्राप्त झाला पाहिजे. व्यक्ती विकासासाठी पोषक वातावरणाची निर्मिती झाली पाहिजे. व्यक्तीच्या या हक्काला नाकारणे म्हणजे गुलामगिरीला आमंत्रण देण्यासारखे आहे. गुलामाला स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व नसते. त्याला केवळ आपल्या मालकांच्या आज्ञांचे पालन करावे लागते. त्यातच त्याचे संपूर्ण आयुष्य जाते. अशा प्रकारे जर व्यक्तीचे जीवन असेल तर मनुष्य आणि पशु यांच्यात फरक करता येणार

नाही. अशा प्रकारे इंग्रज राजवटीचे अस्तित्व मान्य करुन व्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार रॉय यांनी केलेला आहे.

**४) मालमत्तेचा हक्क :** नागरीकांच्या हक्कांचा विचार करतांना मालमत्तेच्या अधिकाराचे समर्थन रॉय यांनी केले आहे. प्रत्येक व्यक्तीला संपत्ती प्राप्त करण्याचा व तिचा उपभोग घेण्याचा, त्याचप्रमाणे मालमत्तेची विल्हेवाट लावण्याचा अधिकार आहे. व्यक्तीच्या विकासासाठी हा हक्क महत्वाचा आहे. व्यक्तीच्या विकासासाठी हा हक्क महत्वाचा आहे. म्हणून या हक्कांवर सरकारने वाजवीपेक्षा जास्त बंधने टाकू नये.

**५) शैक्षणिक हक्क :** निरक्षरतेमुळे भारतातील जनतेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असे मत रॉय यांनी व्यक्त केले. अज्ञान आणि निरक्षरता यामुळे व्यक्तीचा विकास खुंटतो. शिक्षणामुळे व्यक्ती जागृती निर्माण होते. भारतीय जनतेने पाश्चात्य शिक्षण पध्दतीचा अवलंब केला पाहिजे. त्यात प्रामुख्याने गामिण आणि आधुनिक शास्त्रांचा समावेश असला पाहिजे. त्यामुळे विज्ञानाचा नवा दृष्टीकोन प्राप्त होतो आणि समाज अंधश्रध्दा आणि रुढीतून मुक्त होतो.

**६) विचार व उच्चार स्वातंत्र्याचा हक्क :** रॉय यांनी व्यक्तीच्या विचार व उच्चार स्वातंत्र्याला महत्व दिलेले आहे. या हक्कामुळे मनुष्याला आपले विचार व्यक्त करता येऊ शकतात. विचार डांबून ठेवले तर डांबलेल्या विचारातून क्रांतीचा स्फोट होतो.

**रॉय यांच्या हक्क विषयक विचारांचे महत्व :**

१) रॉय यांच्या मते व्यक्तीच्या हक्कांचा जन्म लोकशाहीतच होतो. हुकूमशाहीत जनता गुलामगिरीत जीवन जगते म्हणून तेथील जनतेला हक्क प्राप्त होत नाही. भारतीय समाज ब्रिटीशांच्या वर्चस्वाखाली होता या पाश्र्वभूमीवर हा विचार महत्वपूर्ण ठरतो.

२) जसे लोकशाहीतच हक्क प्राप्त होतात त्याचप्रमाणे मानवी समुहातच हक्कांचा उदय होतो. समाजाशिवाय हक्कांची कारणे अर्थहीन आहेत.

३) रॉय यांनी हक्कविषयक विचार मांडताच कोणतेही हक्क अमर्याद असत नाही ही कल्पना स्पष्ट केली. त्यांचा हा विचार लोकशाहीवादी स्वरुपाचा आहे.

४) रॉय यांनी व्यापक स्वरुपात हक्कांचा विचार केलेला आहे. आधुनिक काळात व्यक्ती विकासाला हक्क हे अत्यंत आवश्यक असतात. म्हणून त्यांनी महत्वाच्या हक्कांचा विचार केलेला आहे. म्हणजेच त्यांचे हक्क विषयक विचार आधुनिक आहेत.

५) रॉय यांचा ब्रिटीश राज्यकर्त्यांवर जास्त विश्वास होता. ते भारतीयांना हक्क प्रदान करतील अशी त्यांना खात्री होती. भारतीय जनता अज्ञानी व गरीब आहे अशा परिस्थितीत भारतीयांच्या स्वातंत्र्याची जबाबदारी ब्रिटीश राज्यकर्ते व्यवस्थितरित्या पार पाडतील. रॉय यांच्या मनात भारतीय समाजाबद्दल अत्यंत तळमळ होती. समाजाचे प्रबोधन झाले पाहिजे आणि या प्रबोधनातून जनतेचा सर्वांगिण विकास घडून येतो म्हणून व्यक्ती स्वातंत्र्याचा विचार मांडतांना जेव्हा भारतीय लायक होतील तेव्हा ब्रिटीशांनी स्वातंत्र्य द्यावे.

**आक्षेप - (टिका) :**

१. रॉय यांच्या मते कायदेशीर हक्कात नागरी हक्क व राजकीय हक्क असे दोन विभाग पडतात. व्यक्ती स्वातंत्र्यासाठी त्यांनी नागरी हक्काला महत्व दिलेले आहे तर राजकीय हक्कांकडे दुर्लक्ष केलेले आहे. टिकाकारांच्या मते इंग्रज नाराज होऊ नयेत म्हणून रॉय यांनी असे विचार मांडले. राजकीय हक्कात निवडणूक लढविण्याचा हक्क मतदानाचा अधिकार सरकारवर टिका करण्याचा हक्क अशा महत्वपूर्ण हक्कांचा विचार त्यात येतो.

२. रॉय यांनी हक्कांचा विचार मांडलेला असला तरी त्या काळात ते विचार निरर्थक स्वरुपाचे वाटतात. कारण त्या काळात भारतात लोकशाही अस्तित्वात नव्हती. हक्कांना सुरक्षितता नव्हती म्हणजेच घटनात्मक आणि न्यायालयीन आधार नव्हता. ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या लहरी कारभारानुसार हक्कांचे स्वरुप ठरत होते.

३. टिकाकारांच्या मते रॉय यांनी संपूर्ण नागरी हक्कांचा विचार मांडलेला नाहीत. समतेचा हक्क महत्वाचा आहे. भारतातील जातीव्यवस्थेच्या संदर्भात समतेचा हक्क महत्वपूर्ण ठरतो.

४. रॉय यांच्या ब्रिटीशांच्या उदारतेवर आणि न्यायबुध्दीवर अत्यंत विश्वास होता जरी ते त्यांच्या देशात उदारतेने राज्यकारभार करीत असले तरी भारताच्या संदर्भात राज्यकारभाराची भूमिका केवळ स्वतःचे स्थान बळकट करण्याएवढी मर्यादित होती. तसेच भारतीयांच्या हक्कांवर कडक नियंत्रण ठेवले होते.

**रॉय यांचे कायदेविषयक विचार :**

रॉय यांचा ईस्ट इंडिया कंपनीवर विश्वास नव्हता. मात्र ब्रिटीश संसदेवर त्यांचा विश्वास होता. त्यांच्या मते भारतीय लोक स्वतःसाठी कायदे करण्यास अजून पात्र नाहीत म्हणून कायदे करण्याचा अधिकार त्यांना देऊ नये. ब्रिटीश संसदेचे सभासद बुध्दीमान, अनुभवी आहेत. त्यांनी केलेल्या कायद्याने भारतीय जनतेचे कल्याण होईल, त्यांनी केलेला कायदा हा भावनांवर आधारीत नसेल तर बुध्दीवर आधारीत असेल म्हणून ब्रिटीश पार्लमेंटने केलेला कायदा भारताच्या हिताचा आहे. भारतीय समाजासाठी कोणत्या पध्दतीने कायद्याची निर्मिती करावी यासंदर्भात दोन विचार प्रवाह निर्माण झाले होते.

१. भारतीयांसाठी भारतीय विधीमंडळाने कायद्याची निर्मिती करावी.

२. भारतीय जनतेसाठी ब्रिटीश सरकारने कायद्याची निर्मिती करावी.

राजा राममोहन रॉय यांनी जेव्हा पार्लमेंट सदस्यांनी कायदे करावेत असे मत व्यक्त केले तेव्हा टिकाकारांनी त्यांच्यावर टिका केली. ब्रिटीश पार्लमेंटने भारतासाठी कायदा केल्याने भारतीयांचे कल्याण होईल असे रॉय यांनी सांगितले. कायदा करतांना रॉय यांनी खालील उपाय सांगितलेले आहेत.

**१. भारतीयांचे मत लक्षात घ्यावे -**

संसदेने कायदा निर्मिती पूर्वी भारतीयांचे मत लक्षात घेतले पाहिजे. मात्र त्यासाठी फक्त श्रीमंत आणि सुशिक्षित नागरीकांच्या मतांचा विचार केला पाहिजे. कारण योग्य निर्णय घेण्याची त्यांच्यात पात्रता असते, अशिक्षित जनता कायद्याबद्दल आपले मत देऊ शकत नाही.

**२. वृत्तपत्र स्वातंत्र्य -**

भारतीय जनतेला वृत्तपत्र स्वातंत्र्य दिले पाहिजे कारण या माध्यमातून जनतेच्या समस्या सरकारला समजू शकतील तसेच सरकारच्या उणिवा दूर

करता येतील. कायदा करण्यापूर्वी त्या वृत्तपत्रातून जनतेला आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करता येतील.

**३. ब्रिटीश पार्लमेंटमध्ये एक लहान समिती**

एक लहान समिती निर्माण करुन त्यात संबंधी कायद्यावर चर्चा करावी. सदस्य कमी असल्यामुळे चर्चा हितकारक होईल आणि त्यातून योग्य काय त्याची निर्मिती होईल.

**४. कायद्याचे अधिराज्य -**

रॉय यांनी कायद्याच्या संदर्भात आपले विचार मांडले. भारतात कायद्याचे राज्य असावे. देशाचा कारभार कोणत्याही व्यक्तीच्या मर्जीनुसार चालता कामा नये. तर कायद्याच्या आधारावर राज्यकारभार चालला पाहिजे. संपूर्ण भारतीय समाजासाठी सुसंगत कायदे असले पाहिजे. भारतात हिंदु, मुस्लिम, शिख, पारशी इ. धर्माचे लोक राहतात म्हणून सर्वांसाठी समान कायदा असला पाहिजे. सर्व धर्मांना एकाच माध्यमातून वागणूक दिली पाहिजे. अनिष्ट व वाईट चालीरीती नष्ट करण्यासाठी कायद्याचा आधार घ्यावा. एकंदरीत रॉय यांचे कायद्याविषयीचे विचार अत्यंत मौल्यवान आहेत. एवढे असून सुध्दा रॉय यांच्या विचारांवर पुढील मर्यादा पडलेल्या आहेत.

**मर्यादा :**

१) रॉय यांनी कायद्याचे अधिराज्य सांगतांना सर्वांसाठी समान कायदा असला पाहिजे असे म्हटले. परंतू त्या काळात वेगवेगळे धर्म त्यांच्या चालीरिती यांचा विचार करता रॉय यांची कल्पना प्रत्यक्षात येणे अशक्य आहे.

२) कायद्यामार्फत वाईट चालीरिती नष्ट कराव्यात असे रॉय म्हणतात. मात्र सर्वच गोष्टी कायद्याने नष्ट होत नाहीत तर त्यासाठी जनमाणसातून लोकमत घडवून आणावे लागते. शेकडो वर्षांपासून चालत आलेल्या परंपरा कायद्याने एकदमच नष्ट होत नाही तर त्यासाठी लोकमत घ्यावे लागते. लोकांना चांगल्या परिणामांची जाणीव करुन द्यावी लागते. तेव्हाच ह्या परंपरा नष्ट होतात.

३) रॉय यांनी भारतीयांसाठी कायदा करण्याचा अधिकार संसद सदस्यांना दिला. मात्र कायदा करतांना जुन्या चालीरीतींचा विचारा करावा

लागतो आणि आपल्या देशातील कोणत्या चालीरिती चांगल्या, वाईट योग्य-अयोग्य आहेत यांचे आकलन संसद सदस्यांना होणे कठीण आहे. म्हणून सर्व अधिकार त्यांना देऊन टाकणे अयोग्य आहे.

४) कायदा करतांना फक्त श्रीमंत आणि सुशिक्षित जनतेचे मत घेतले जावे हा रॉय यांचा विचार विषमता निर्माण करणारा आहे. तो लोकशाही मुल्यांच्या विरोधी आहे.

५) संससद सदस्य आणि कंपनीचे अधिकारी यांच्यात फरक आहे असे मत रॉय यांनी व्यक्त केले. कंपनी अधिकाऱ्यांना दोष दिला तर संसद सदस्यांचे कौतुक केले. टिकाकारांच्या मते कंपनीचे अधिकारी आणि संसद सदस्य या दोघांचा एकच हेतू आहे तो म्हणजे भारत गुलामगिरीत रहावा अशी त्यांची इच्छा आहे.

**रॉय यांचे न्यायविषयक विचार :**

रॉय यांच्या काळात कायदा आणि न्याय यासंबंधी प्रचंड उलथापालथ झाली होती. राजा राममोहन रॉय हे उदारमतवादी लोकशाही आणि व्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे होते. म्हणूनच न्यायपालिकेचे स्वातंत्र्य त्यांना आवश्यक वाटत होते. न्यायमंडळातील सुधारणा, न्यायालयीन पध्दत व न्यायालयातील अधिकारक्षेत्र अशा महत्वाच्या विषयांविषयी त्यांनी आपले विचार मांडलेले आहेत. रॉय यांनी न्यायमंडळासंबंधी काही महत्वपूर्ण सुचना आणि उपाय सांगितलेले आहेत ते पुढीलप्रमाणे -

१. जनतेचे सहकार्य
२. न्यायदान उघडपणे
३. अचुक आणि कार्यक्षमतेने कार्य
४. पंचायत पध्दत
५. न्यायाधिशांना आकर्षक आणि भरपूर वेतन द्यावे
६. देशी भाषेतून कामकाज
७. न्यायदान हे सोयीस्कर
८. एकाच प्रकारची साखळी
९. सत्ता विभाजन तत्व
१०. कायद्याची एकच पध्दत

**१. जनतेचे सहकार्य :**

ब्रिटीशांनी न्यायदानाच्या कामकाजात भारतीय जनतेचे सहकार्य घ्यावे. त्यामुळे जनतेचा न्यायपालिकेवर विश्वास बसेल आणि त्यांच्या मनात सरकारविषयी निष्ठा वाढेल.

**२. न्यायदान उघडपणे :**

न्यायदानाचे कामकाज गुप्त पध्दतीने चालू नये म्हणजेच ते उघडपणे असले पाहिजे. जनतेला न्यायालयीन कामकाजाचे प्रत्यक्ष अवलोकन झाले तर त्यांच्या ज्ञानात भर पडेल. त्यासाठी वर्तमानपत्रातून न्यायालयीन कामकाजाला भरपूर प्रसिध्दी दिली पाहिजे आणि ज्यांना न्यायालयात उपस्थित राहणे शक्य होत नाही त्यांना वर्तमानपत्रे वाचून न्यायालयीन कामकाजांची माहिती मिळेल. मात्र वृत्तपत्रांनी जनतेची दिशाभूल करु नये. तसे झाल्यास त्यांना शिक्षा देण्याची तरतूद कायद्यात करावी.

**३. अचूक आणि कार्यक्षमतेने कार्य :**

न्यायपालिकेचे कार्य अचुकपणे आणि कार्यक्षमतेने चालले पाहिजे. जनतेला त्वरीत न्याय प्राप्त करुन दिला पाहिजे. न्यायाधीशांची संसख्या कमी असेल तर निर्णय लवकर दिला जात नाही आणि वर्षानुवर्ष खटले तसेच भिजत पडत असतात. न्यायाला लागलेला उशिर म्हणजे न्याय नाकारणे सारखे आहे.

**४. पंचायत पध्दत :**

भारतातील पंचायत पध्दत ही न्यायदानाची पध्दत म्हणून स्विकारावी म्हणून न्यायाधिशांची नेमणूक कशाप्रकारे करावी याचे स्पष्टीकरण त्यांनी केले आहे. न्यायाधीश पदावर भारतातील तज्ज्ञ लोक असावेत. प्रत्येक खटल्याच्या अगोदर न्यायदानाचे कामकाज चालविण्यासाठी ज्या न्यायाधिशांची नेमणूक करावयाची आहे ती निवड चिठ्ठया टाकून करावी किंवा नाणेफेक करुन करावी. कारण त्यामुळे खटल्याची सुरुवात होईपर्यंत संबंधीत व्यक्तींना आणि वकीलांना न्यायाधीश कोण आहे हे समजणार नाही. त्यामुळे न्यायदान करतंना भ्रष्टाचार होणार नाही किंवा न्यायाधिशांवर दबाव तंत्राचा वापर करता येणार नाही.

**५. न्यायाधिशांना आकर्षक आणि भरपूर वेतन द्यावे :**

न्यायाधिशांना आकर्षक आणि भरपूर वेतन दिले पाहिजे. तसेच अनेक सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. कारण त्यामुळे ते लाचलुचपतीकडे आणि भष्टाचाराकडे वळणार नाहीत. त्यामुळे जनतेला खरा न्याय मिळेल. रॉय यांच्या विचारांचा स्विकार आज देखील अनेक राष्ट्रांनी केलेला आहे.

**६. देशी भाषेतून कामकाज :**

न्यायदानाचे कामकाज हे देशी भाषेतून चालले पाहिजे. त्यामुळे न्याय देण्याचे कार्य अधिक सुलभ आणि सोपे होते आणि संबंधित व्यक्तींना किंवा पक्षकारांना त्यातील मजकूर समजू शकतो. सामान्य जनतेला आपला विचार आपल्या भाषेत मांडता आल्याने त्यांचे समाधान होते आणि खऱ्या न्यायाची त्याला माहिती मिळत असते. भारतासारख्या अप्रगत आणि मागासलेल्या देशाला या तत्वांची फार गरज आहे.

**७. न्यायदान हे सोयीस्कर :**

न्यायदान हे सोयीस्कर आणि वेळ वाचविणारे असले पाहिजे. त्यासाठी न्यायाधिशांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. तसेच देशाच्या निरनिराळ्या भागात न्यायदानाच्या शाखा असल्या पाहिजे. त्यामुळे सर्वसामान्य गरीब जनतेला न्याय मागण्यासाठी त्रास होणार नाही.

**८. एकाच प्रकारची साखळी :**

न्यायालयीन पध्दतीत एकाच प्रकारची साखळी असली पाहिजे. खालून वरपर्यंत म्हणजे तालुका न्यायलयापासून ते सर्वोच्च न्यायालयापर्यंत एक निश्चित प्रकारची व्यवस्था असली पाहिजे. कनिष्ठ न्यायालयांवर वरीष्ठ न्यायालयांचे वर्चस्व असावे. जनतेकडुन खालच्या न्यायालयांची तक्रार असल्यास वरच्या न्यायालयाने त्या तक्रारीची चौकशी करावी.

**९. सत्ता विभाजन तत्व :**

न्यायविषयक विचार मांडतांना रॉय यांनी सत्ता विभाजनाच्या सिध्दांताचा उपयुक्त विचार सांगितलेला आहे. न्यायपालिका विधीमंडळ आणि मंत्रीमंडळ हे शासनाचे तिन्ही विभाग एकमेकांपासून विभक्त असावेत. त्यामुळे न्यापालिकेचे स्वातंत्र्य टिकून राहते.

**१०. कायद्याची एकच पध्दत :**

संपूण भारतीयांसाठी कायद्याची एकच पध्दत असली पाहिजे. ज्युरी ॲक्टला त्यांनी प्रखर विरोध केला. कारण या कायद्याने धर्माच्या आधारावर न्यायपध्दतीच्या रचनेत भेदभाव केला होता. उदा. एखाद्या ख्रिश्चन नागरीकाचा खटला चालत असेल तर त्या खटल्याची ज्युरी म्हणून हिंदू किंवा मुसलमान असू नये अशी कायद्यात तरतूद होती. तसेच राजा राममोहन रॉय यांनी भरतात कायद्याचे राज्य असावे याचा पुरस्कार केला.

**रॉय यांचे वृत्तपत्र स्वातंत्र्याविषयी विचार :**

रॉय हे वृत्तपत्र स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. त्यांनी लेखन स्वातंत्र्याचा पुरस्कार केला होता. ते स्वतः पत्रकार होते. १८२१ मध्ये त्यांनी संवाद कौमुदी हे वर्तमान पत्र सुरु केले. १८२३ मध्ये ब्रिटीश सरकारने रॉय यांच्या लिखाणावर आक्षेप घेऊन त्यांच्यावर लेखन करण्यास बंदी घातली. त्यावेळी रॉय यांनी पुढील विचार मांडले आहेत.

जगाच्या कोणत्याही भागात आतापर्यंत वृत्तपत्र स्वातंत्र्यामुळे क्रांती इ ाली नाही याची सरकारला कल्पना आहे. वृत्तपत्र स्वातंत्र्यामुळे जनतेच्या अडीअडचणी सोडविल्या गेल्या नसल्यामुळे जगाच्या अनेक भागात क्रांत्या इ ालेल्या आहेत. १८२३ मध्ये ब्रिटीश सरकारने एक वटहुकुम काढुन वृत्तपत्रांच्या संपादकांना किंवा मालकांना सरकारकडून परवाने घ्यावे लागतील. या वटहुकूमामुळे ब्रिटीश अधिकाऱ्यांना जास्त सत्ता मिळणार होती हा वटहुकूम रद्द करण्याचा रॉय यांनी प्रयत्न केला. परंतू सर्वोच्च न्यायालयाने रॉय यांचा अर्ज फेटाळला. रॉय यांनी वृत्तपत्र स्वातंत्र्याची गरज प्रभावीपणे मांडलेली आहे ते खालीलप्रमाणे स्पष्ट होते.

**१. प्रातिनिधीक लोकशाहीच्या अभावी वृत्तपत्र स्वातंत्र्य महत्वाचे :**

ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या मते भारतात प्रातिनिधीक सरकार नसल्यामुळे वृत्तपत्र स्वातंत्र्याची गरज नाही. रॉय यांच्या मते प्रातिनिधीक लोकशाहीच्या अभावी वृत्तपत्र स्वातंत्र्य जास्त आवश्यक ठरते. कारण प्रातिनिधीक लोकशाहीत सरकारवर टिका करणारा आणि सरकारला सुधारण्याचा प्रयत्न करणारा विरोधी पक्ष असतो. भारतात तसे सरकार नाही, विरोधी पक्ष नाही म्हणून ब्रिटीश सकारवर टिका केली जात नाही. सरकारच्या ध्येय धोरणात

सुधारण होत नाही. वृत्तपत्र स्वातंत्र्याच्या अभावी जसे जनतेचे नुकसान होते तसेच सरकारचेही नुकसान होते. म्हणून वृत्तपत्र स्वातंत्र्य असले पाहिजे.

**२. वर्तमान पत्रातून लोकमत व्यक्त होते :**

भारतात लोकमतावर आधारीत सरकार नाही, त्यामुळे लोकमताला फारसा हक्क नसतो. भारतात ब्रिटीश अधिकाऱ्यांकडून कारभार चालविला जातो म्हणून राजकीय पक्षांप्रमाणे त्यांच्यावर दडपण आणण्याचा प्रश्न येत नाही हा विचार रॉय यांना मान्य नाही. त्यांच्या मते, कोणत्याही शासन पध्दतीत लोकमत महत्वाचे असते. वर्तमानपत्रातून लोकमत व्यक्त होते. सरकारने केलेल्या कार्यामुळे लोकप्रियता वाढत असते आणि लोकांची सरकारवर निष्ठा निर्माण होते.

**३. वृत्तपत्रे सरकारवर टिका करतात :**

ब्रिटीश अधिकाऱ्यांचे मते वृत्तपत्रे सरकारी धोरणवर टिका करीत असतात. त्यामुळे जनतेचा सरकारवरील आदर कमी होतो. रॉय यांच्या मते जेव्हा सरकारचे धोरण जनकल्याणाच्या विरोधी असेल तेव्हा ते सरकार अप्रिय ठरेल. म्हणजे सरकारच्या बेजबाबदार धोरणाला ते स्वतःच जबाबदार आहेत त्यासाठी वर्तमानपत्रांना दोष देऊ नये.

**४. वृत्तपत्रे समाजाच्या भावना भडकवत असतात :**

तसेच सरकार उलथून लावण्याचा प्रयत्न करतात. जनतेला क्रांती करण्यास प्रवृत्त करतात. मात्र रॉय यांना हे विचार मान्य नाहीत. ते म्हणतात, वृत्तपत्र स्वातंत्र्यामुळे लोकांच्या / जनतेच्या भावना व्यक्त होतात. जनतेचे विचार बंदिस्त ठेवले तर त्यातून क्रांती होते. वृत्तपत्राच्या माध्यमातून जनतेच्या भावना, अडचणी आणि समस्या सरकारला समजतात. त्यामुळे सरकारला आपल्या ध्येय धोरणांची आखणी करता येते. त्याचप्रमाणे धोरणात सुधारणा करता येते. त्यामुळे क्रांती टळते आणि सरकार स्थिर राहत असते.

**वृत्तपत्र स्वातंत्र्याविषयी रॉय यांचे समर्थन :**

१. वृत्तपत्र स्वातंत्र्यामुळे सरकार आणि समाज एकमेकांना जोडले जात असतात.

२. वृत्तपत्रातून सरकारने केलेले कायदे जनतेपर्यंत पोहोचतात.

३. वृत्तपत्र स्वातंत्र्य हे जनतेच्या विकासाचे एक साधन आहे. त्यातून जनतेचे राजकीय ज्ञान वाढत असते.

४. वृत्तपत्रे सरकारच्या चांगल्या कार्याबध्दल गौरव करतात.

५. वृत्तपत्र स्वातंत्र्यामुळे जगाच्या इतिहासात क्रांती झालेली नाही. उलट वृत्तपत्रांवर बंधने घातल्याने क्रांतीला पोषक वातावरण निर्माण होते.

अशाप्रकारे रॉय यांनी वृत्तपत्र स्वातंत्र्याविषयी विचार मांडले आहेत.

**रॉय यांचे आर्थिक विचार :**

रॉय यांनी सामाजिक कार्य केलेले असले तरी त्यांनी आर्थिक बाबींकडे दुर्लक्ष केलेले नाही. ब्रिटीशांची सत्ता भारतात स्थिर झाल्यानंतर त्याचे आर्थिक परिणाम मोठ्या प्रमाणावर जाणवू लागले होते. त्यापूर्वीच्या काळात भारत हा निर्यातदार देश होता. भारतीय कापड, कलाकुसरीच्या वस्तु, हस्तीदंत, मसाल्याचे पदार्थ यांना परदेशी बाजारपेठेत मोठी मागणी होती. परंतु ब्रिटीशांचे भारतात आगमन झाल्यानंतर त्यांनी भारतात व्यापारी वखारी स्थापन केल्या. सुरुवातीच्या काळात भारतीय उत्पादनाला प्रोत्साहन मिळाले. ब्रिटीश व्यापाऱ्यांमार्फत भारतीय माल अधिक प्रमाणात परदेशात जाउ लागला. भारतातील उद्योगांना चालना मिळाली. पण इंग्लंडमधील औद्योगिक क्रांती झाल्यानंतर हे चित्र बदलले. इंग्लंडमध्ये मोठ्या प्रमाणात कापड आणि इतर वस्तुंचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होऊ लागले. त्या वस्तुंच्या विक्रीसाठी इंग्लंडमधील उद्योगपतींना बाजारपेठेची गरज भासू लागली. यासाठी त्यांनी भारतीय बाजारपेठेचा उपयोग करुन घेतला. त्यामुळे भारतातील जे उद्योगधंदे होते ते आपोआप बंद पडले. बेकारांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. शेतीवरचा भार वाढला. इंग्लंडमधील कापड आणि इतर वस्तु भारतात आयात होऊ लागल्या. भारत हा निर्यातदार देश होता. त्यानंतर त्याचे रुपांतर आयातदार देश म्हणून झाले. इंग्लंडमधील उद्योगपती भारतातून कच्चा माल आयात करुन भारतात पक्का माल निर्यात करु लागले. यातून भारताचे आर्थिक शोषण झाले. याकडे दादाभाई नौरोजी, लोकमान्य टिळक, न्या. रानडे त्याचप्रमाणे रॉय यांनी लक्ष दिले.

रॉय हे शेतकऱ्यांच्या हितासाठी इंग्लंडला गेले. जमीन कसण्याबद्दल कुळांना जास्त मोबदला द्यावा लागत होता. तो कमी करण्यासाठी रॉय यांनी

प्रयत्न केला. शेतीवरील महसूल कमी करावा, त्याचप्रमाणे इतर चैनीच्या वस्तुंवर जास्त कर बसवावेत, त्याचप्रमाणे रॉय यांनी मिठाच्या किंमती कमी करण्यासाठी प्रयत्न केले. अशाप्रकारे रॉय यांनी देशाच्या आर्थिक विकासासाठी विचार केला होता.

***

## प्रकरण २

# दादाभाई नौरोजी

---

**जीवन परीचय :**

दादाभाई नौरोजी यांचा जन्म ४ सप्टे १८२५ मध्ये मुंबई येथे पारशी कुटुंबात झाला. लहानपणी वडील वारल्यामुळे त्यांच्या आईने त्यांचे शिक्षण पूर्ण केले. १८५३ मध्ये ते मुंबई येथील एल्फींस्टन कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून रुजू झाले. १८६७ मध्ये ते इंग्लंडला गेले. तेथे त्यांनी East India Association नावाची संस्था स्थापन केली. त्याच संस्थेची एक शाखा त्यांनी मुंबईत स्थापन केली. १८७५ ला ते मुंबई महानगरपालीकेचे सभासद झाले. तसेच मुंबई प्रांत विधीमंडळाचे सभासद झाले. १८९२-१८९५ या काळात ते सामान्य सभागृहाचे सभासद होते. १८८६, १८९३ आणि १९०६ या काळात काँग्रेसचे अध्यक्ष होते. १८८५ ला ज्यावेळी राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली त्यावेळी काँग्रेसचे मुख्य ध्येय म्हणजे भारतीय लोकांची दु:ख दूर करणे ही होती. परंतू दादाभाईंनी काँग्रेसचे स्वराज्य प्राप्तीसाठी प्रयत्न करावा असा विचार मांडला. म्हणून त्यांनी १९०६ च्या कलकत्ता येथील अधिवेशनात 'स्वराज्य' हा शब्दप्रयोग प्रथम वापरला. भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीत त्यांनी आपल्या आयुष्याची ५० वर्ष खर्च केली. अशा वयोवृध्द भारताचे पितामह आणि अर्थशास्त्राचे जनक या विचारवंतांचा मृत्यु ३० जून १९१७ ला झाला.

**दादाभाई नौरोजी यांचा आर्थिक शोषण सिध्दांत :**

दादाभाई नौरोजी यांना अर्थशास्त्राचे जनक म्हणतात. त्यांनी आपले विचार Poverty an unbritish Rule in India या ग्रंथात मांडले आहेत. ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना व्यापारासाठी झाली होती. परंतु ब्रिटीशांनी काळाच्या ओघात आर्थिक क्षेत्रात भारतीयांना गुलाम बनविले. म्हणजेच राजकीय गुलामगिरीबरोबरच आर्थिक गुलामगिरी ब्रिटीशांनी त्यावेळी निर्माण केली. प्रगती आणि विकास यांच्या नावाखाली ब्रिटीश भारतीयांचे आर्थिक शोषण करीत होते.

**आयात निर्यात धोरण :-**

औद्योगिक क्रांतीनंतर इंग्लंडमध्ये औद्योगिकरणाची प्रक्रिया मोठ्या प्रमाणावर सुरु झाली होती. भारतातला कच्चा माल इंग्लंडमध्ये जास्त प्रमाणात जाऊ लागला आणि इंग्लंडमधील पक्का माल भारतात येऊ लागला. त्यामुळे भारतातले लहान मोठे उद्योगधंदे पूर्णपणे बंद पडले. बेकारीची समस्या निर्माण झाली. शेतीवरचा भार वाढला. शेतीत उत्पादन करण्यासाठी आधुनिक स्वरुपाची यंत्रे नसल्याने उत्पादनाचे प्रमाण कमी झाले. भारत हा देश सुरुवातीला निर्यातदार देश होता. नंतर ब्रिटीशांच्या नितीमुळे भारत हा आयातदार देश बनला. १८७५ ते १९०० या कालखंडात भारतात मोठ्या प्रमाणावर दुष्काळ पडले. वस्तुंच्या किंमती मोठ्या प्रमाणावर वाढल्या. या सर्व गोष्टींचा परिणाम असा झाला की भारतीय लोकांच्या दारीद्रयात अधिक भर पडली.

**ब्रिटीशांचे मत :-**

ब्रिटीशांच्या मताप्रमाणे भारतीय लोकांच्या आर्थिक अवनतीला ब्रिटीश जबाबदार नसून भारतीय लोक जबाबदार आहेत. कारण लोकसंख्या वाढीमुळे व पडलेल्या दुष्काळामुळे त्यांच्या दारिद्रयात भर पडत गेली. भारत आणि इंग्लंड यांच्यात व्यापार निसर्ग नियमाने चालत होता. कारण इंग्लंडला ज्याप्रमाणे कच्च्या मालाची गरज होती त्याचप्रमाणे भारताला देखील त्यावेळी पक्क्या मालाची गरज होती. म्हणून ते असे म्हणतात की, ब्रिटीशांच्या पूर्वी असलेली सरकारे भारतात अस्थिर स्वरुपाची होती. परंत ब्रिटीशांच्या शिस्तबध्द कारभारामुळे स्थिर शासनपध्दती निर्माण झाली आणि ब्रिटीशांनीच भारतीयांच्या प्रगतीसाठी प्रयत्न केले.

**दादाभाई नौरोजी यांचा युक्तीवाद :**

दादाभाईनी ब्रिटीशांचा युक्तीवाद खोडून काढताना असे म्हटले की, भारताच्या आर्थिक शोषणाला पूर्णपणे ब्रिटीश राज्यकर्तेच जबाबदार आहेत. त्यांनी शास्त्रीय पध्दतीने आणि तर्काचा आधार घेऊन ब्रिटीश राज्यकर्ते भारतीयांच्या दारीद्रयाला कसे जबाबदार आहेत याचे स्पष्टीकरण केले आहे. ते राज्यकर्ते असल्यामुळे त्यांनी भारतीयांचे आर्थिक शोषण केले. भारतीय लोकांचे दारिद्रय इतक्या मोठ्या प्रमाणात वाढले की त्यांना जीवन जगणे देखील

कठीण झाले होते. जिवीत स्वातंत्र्याला भारतीय लोक त्या काळात ब्रिटीशांनी केलेल्या आर्थिक शोषणामुळे वंचित झाले होते.

दादाभाईंनी आपल्या आर्थिक विचारातील महत्वपूर्ण विचार Drain Theory (आर्थिक लुट सिध्दांत) हा महत्वाचा विचार मांडण्याचा प्रयत्न केला आहे. भारतातील इंग्लंडकडे जाणारा संपत्तीचा ओघ नियंत्रित होईपर्यंत भारतीय लोकांना कोणत्याही कोणत्याही प्रकारे भौतिक सुख आणि नैसर्गिक हक्क मिळणार नाहीत. म्हणून भारतीय लोकांच्या गरिबीचे मुख्य कारण म्हणजे भारतातून इंग्लंडकडे जाणारा संपत्तीचा ओघ आणि त्यातून त्यांचे आर्थिक शोषणाचे प्रमाण वाढले आहे. आर्थिक शोषणाच्या बाबतीत दादाभाईंनी आकडेवारी दिलेली आहे. दरवर्षी भारतातून ३०-४० कोटी रुपये इतकी रक्कम इंग्लंडकडे जात होती. या रकमेतून इंग्लंडमधील अधिकारी वर्गाचे वेतन भारतातील सैन्यावरील खर्च युध्दावरील खर्च भारतीय प्रशासनातील खर्च भागविला जात होता म्हणून दादाभाई असे म्हणतात. ब्रिटीशांच्या पूर्वी असलेल्या मुस्लीम राज्यकर्त्यांनी भारतीयांचे लचके तोडले. परंतू ब्रिटीशांनी मात्र आपल्या तिक्ष्ण सुरीच्या सहाय्याने भारतीयांच्या आर्थिक शोषणाच्या बाबतीत एकप्रकारे हृदय कापलेले आहे. त्यांनी पुन्हा गजनीच्या मोहम्मदाचे उदाहरण दिले आहे. त्याने जेवढी संपत्ती भारतातून लुटली होती त्यापेक्षा जास्त पटीने संपत्ती ब्रिटीशांनी भारतातून लुटलेली आहे. भारतीयांची आर्थिक लुट जर थांबवावयाची असेल तर भारतीय राज्यकारभार भारतीय लोकांकडेच सोपविला गेला पाहिजे. म्हणून त्याकाळी त्यांनी आर्थिक विश्लेषणाच्या बाबतीत "स्वराज्य" हा शब्दप्रयोग प्रथम वापरला होता. दादाभाईंनी आर्थिक लुट सिध्दांत मांडीत असतांना ब्रिटीशांची अर्थनिती अशा प्रकारची होती हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. अर्थनीतीचे भारतावर कोणते परिणाम झाले ते पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) भारतीयांवर कर जास्त :**

**स्वातंत्र्यपूर्व** काळामध्ये भारतीय शेतकऱ्यांवर मोठ्या प्रमाणावर कर लादले होते. म्हणजे शेतकऱ्यांवर बळजबरीने महसूल कर मोठ्या प्रमाणावर लावला जात होता. जास्त कर लावल्यमुळे भारतीय शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती नाजूक झाली होती. नोकरांचे पगार, भत्ते, सैनिकी खर्च इ. साठी

लागणारा पैसा भारतीयांकडून कर रुपाने गोळा केला जात असे आणि हा पैसा भारताकडून इंग्लंड या देशाकडे जात होता.

**२) भरपूर खर्च :-**

भारतातील ब्रिटीश अधिकारी वर्गाला अनेक प्रकारच्या सोयी सवलती मिळत होत्या. अधिकारी वर्ग चैनीत जीवन जगत होता. त्याचप्रमाणे त्यांचे जीवन ऐश आरामदायी बनले होते. तो खर्च कर रुपाने भारतीय लोकांना सहन करावा लागत असे.

**भारतीय व्यापारात घट :-**

ब्रिटीशांच्या अर्थनितीमुळे भारतातील व्यापारात दिवसेंदिवस घट होत गेली. कारण भारतातून तयार होणारा पक्का माल त्यावेळी देखील इतर देशात जात होता. परंतु ब्रिटीशांच्या ह्या अर्थनितीमुळे भारतातील व्यापार पूर्णपणे बंद पडले. भारत हा देश दरवर्षी ३०-४० कोटी रुपयांचे कापड परदेशात पाठवत होता. परंतू ब्रिटीशांच्या नीतीमुळे कापड पाठविणे बंद झाले आणि भारतातील उद्योगधंदे आपोआप बंद पडले.

दादाभाई नौरोजींनी आपल्या आर्थिक लुट सिध्दांतात भारतीय लोकांच्या दारिद्रयाचे संख्यात्मक दृष्टीकोनातून मोजमाप केलेले दिसून येते. त्यांच्यामते भारतीय लोकांचे दरडोई वार्षिक उत्पन्न २० रु. होते. १८७१ चे राष्ट्रीय उत्पन्न ३४० कोटी रु. होते आणि त्यावेळची भारताची लोकसंख्या १७ कोटी होती. यावरुन असे स्पष्ट होते की, दादाभाईंनी सांगितलेले उत्पन्न २० रु. होते हे योग्य वाटते. भारताच्या आर्थिक अवनतीला ब्रिटीश पूर्णपणे जबाबदार होते. त्यांनी पुन्हा भारतातील आर्थिक परिस्थितीच्या दृष्टीकोनातून काही उपाय सुचविले आहेत ते पुढीलप्रमाणे -

१) भारतातून इंग्लंडकडे जाणारा संपत्तीचा ओघ पूर्णपणे बंद झाला पाहिजे.
२) भारतात जे उद्योगधंदे असतील ते भारतीयांनीच चालविले पाहिजे.
३) इंग्लडच्या भांडवलातून भारतीय लोकांचे शोषण होता कामा नये.
४) भारतीय लोकांवरील करांचे प्रमाण कमी असले पाहिजे. ज्याप्रमाणे इंग्लंडमधील लोक कर भरतात त्यांना त्याच्या मोबदल्यात जशा सोयी सवलती पुरविल्या जातात तशाच सोयी सवलती भारतीय

लोकांना पुरविल्या पाहिजेत असे त्यावर उपाय दादाभाईंनी आपल्या आर्थिक शोषण सिध्दांतात मांडण्याचा प्रयत्न केला.

**भारतातील ब्रिटीश प्रशासनासंबंधी दादाभाई नौरोजी यांची मते :**

दादाभाई नौरोजींनी आपल्या राजकीय विचारात ब्रिटीश राजवटीबद्दलचा दृष्टीकोन आणि ब्रिटीश प्रशासनाबद्दलचा दृष्टीकोन स्पष्टपणे मांडला आहे. दादाभाई नौरोजींना ब्रिटीश लोकांबद्दल आदर होता. कारण या लोकांनी दीर्घकाळापर्यंत अनियंत्रीत राजेशाहीविरुध्द संघर्ष करुन अनियंत्रीत राजेशाहीचे रुपांतर नियंत्रीत राजेशाहीत केले आणि कायद्याचे राज्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. समता, स्वातंत्र्य, बंधुभाव आणि न्याय या तत्वांवर त्यांनी संसदीय लोकशाहीची चौकट उभी केली. औद्योगिकरणामुळे इं ग्लंड या देशाला आर्थिक स्थैर्य लाभले. असे उदारमतवादी व न्यायबुध्दी लोकांचे राज्य भारतात प्रस्थापीत होणे ही भारतीयांच्या दृष्टीकोनातून एक प्रकारे भाग्याची गोष्ट आहे. इंग्लंडप्रमाणे भारतात देखील लोकशाही शासन पध्दती निर्माण होईल आणि लोकशाहीची प्रक्रिया भारतीय समाज जीवनात रुजविली जाईल. यावर दादाभाईंचा पूर्णपणे विश्वास होता. ब्रिटीशांनी केलेल्या अनेक सुधारणांमुळे दादाभाईंनी त्यांचे कौतुक केले. कारण ब्रिटीशांच्या पूर्वी ज्या ज्या शासन पध्दती भारतात निर्माण केल्या गेल्या त्यांना निश्चित अशा स्वरुपाची प्रशासकिय यंत्रणा उभी राहिली. ब्रिटीशांमुळे रस्ते, कालवे, रेल्वे व पोस्ट इ. सुधारणा झाल्यात. या ब्रिटीश राजवटीसंबंधी दादाभाईंनी १८८६ च्या कलकत्ता अधिवेशनात व १८९३ च्या लाहे ारच्या अधिवेशनात ब्रिटीश राजवट पूर्णपणे चांगली राजवट या अर्थाने गौरव केला. परंतु सुरुवातीला जरी त्यांना ब्रिटीश राजवटीविषयी आदर असला तरी अनुभवाअंती ब्रिटीश राजवट आणि ब्रिटीश प्रशासन यंत्रणा किती दृष्ट प्रवृत्तीची आहे हे त्यांना दिसून आले.

ब्रिटीश राजवटीत १८३३ आणि १८५८ च्या कायद्यान्वये भारतीयांना काही आश्वासने देण्यात आलेली होती. १८३३ च्या कायद्यात त्यांनी असे अभिवचन दिले होते की, धर्म, जन्मस्थान, वंश इ. च्या आधाराने प्रजाजनास सरकारमधील कोणतेही पद, अधिकार किंवा नोकरी याबाबतीत अपात्र ठरविले जाणार नाही. म्हणजेच ब्रिटीश नागरीकांना त्यांच्या देशात जसे अधिकार प्राप्त होतात तशाच प्रकारचे अधिकार भारतीयांना देखील प्राप्त होतील असे या

कायद्याद्वारे स्पष्ट करण्यात आले. १८५८ च्या राणीच्या जाहिरनाम्यातही अशा प्रकारचे आश्वासन भारतीयांना दिले होते. आमच्या प्रजाजनांना मग ते कोणत्याही धर्माचे, कोणत्याही वंशाचे असोत त्यांना मुक्तपणे आणि निष्पक्षपातीपणे सेवा क्षेत्रात प्रवेश मिळेल आणि शैक्षणिक गुणवत्तेच्या पात्रतेच्या निकषांवर त्यांना जागा दिल्या जातील ही दोन अभिवचने ब्रिटीश राज्यकर्ते पूर्ण करु न शकल्याने दादाभाईंचा ब्रिटीश राजवटीवरील विश्वास उडाला. तेव्हापासून दादाभाई नौरोजी ब्रिटीश राजवटीचे आणि ब्रिटीश प्रशासनाचे टिकाकार बनलेत. ब्रिटीश अधिकाऱ्यांनी देखील त्यावेळी अशी कबुली केली की, आम्ही आमच्या कर्तव्यास चुकलो आहोत. आम्ही आमची वचने पूर्ण करु शकलो नाही. या संदर्भात लॉर्ड मेकॅले असे म्हणतात की, १८३३ च्या आणि १८५८ च्या कायद्यातील अभिवचने जर प्रामाणिकपणे पुर्तता पुर्ण केली गेली असती तर त्याचा फायदा इंग्लंड व भारत या देशांना झाला असता.

दादाभाई नौरोजी यांनी ब्रिटीश प्रशासनावर अशा प्रकारे टिका केली की भारतातील ब्रिटीश राज्य बंदुकीच्या धाकाने टिकून आहे. परंतु बंदुकीच्या धाकाने राज्याचे साम्राज्य वाढविता येऊ शकते परंतु दिर्घकाळापर्यंत असे राज्य राहू शकत नाही. कारण बंदुकीच्या धाकापेक्षा लोकमताच्या आधार असलेले राज्य टिकविले जाऊ शकते.

**ब्रिटीशांविषयी आदर आणि मवाळ धोरण :**

दादाभाईंचे राजकीय, सामाजिक आणि आर्थिक विचारांवरुन असे दिसून येते की ते मवाळ विचारवंत होते की जहाल होते याचे लवकर आकलन होत नाही. परंतु त्यांची विचारसरणी मात्र नेमस्त विचार सरणीपासून जहाल विचार सरणीकडे वाटचाल करणारी होती असे म्हणतात येईल. कारण ब्रिटीश राजवटीला ईश्वरी वरदान मानणारे दादाभाई नौरोजी हे नेमस्त विचार सरणीचे नेते वाटतात. दादाभाई हे नेमस्तातले जहाल आणि जहालमधले नेमस्त होते. ज्यावेळी १८८५ ला राष्ट्रीय सभेवर नेमस्त विचारवंतांचा प्रभाव होता आणि ह्या नेमस्त विचारवंतांच्या निष्ठा ब्रिटीश राजवटीवर होत्या. भारतातील ब्रिटीश अधिकारी जरी स्वार्थी, कपटी व दृष्टी प्रवृत्तीचे असले तरी ब्रिटीश लोक मात्र तशा प्रकारेच नहीत ते उदारमतवादी आणि व्यक्तीस्वातंत्र्यवादी आहेत. कारण

त्या लोकांनी दिर्घकाळापर्यंत त्यांच्या देशातील अनियंत्रित राजेशाहीविरुध्द संघर्ष करुन जनतेचे सार्वभौमत्व प्रस्थापित केले. अशा उदारमतवादी ब्रिटीशांकडून भारतीयांचे नुकसान होणार नाही यावर दादाभाईंचा पूर्णपणे विश्वास होता. ब्रिटीश अधिकाऱ्यांचे कपटी वर्तन ब्रिटीश संसदेला कळावे म्हणून दादाभाईंनी ब्रिटीश संसदेत प्रवेश केला. कारण ब्रिटीश संसद भारतीयांसाठी कल्याणकारी योजना आखेल असे त्यांचे मत होते. १८९३ च्या अधिवेशनात ते म्हणतात जगातील सुसंस्कृत राष्ट्रांप्रमाणे भौतिक आणि राजकीय उन्नती होण्यासाठी दीर्घकाळापर्यंत भारताचा ब्रिटीशांशी संपर्क असला पाहिजे. यावरुन असे स्पष्ट होते की, एका बाजुला ते ब्रिटीशांवर निष्ठा ठेवतात तर दुसऱ्या बाजुला भारतीयांच्या भौतिक आणि राजकीय उन्नतीसाठी अपेक्षा करतात म्हणजेच ब्रिटीशांविषयी निष्ठा व स्वदेशाविषयी देशभक्ती यांचा समन्वय त्यांच्या विचारातून दिसून येतो.

१८९३ च्या अधिवेशनात दादाभाई नौरोजींनी काही विचार मांडले ते पुढीलप्रमाणे -

**१) भारतीयांना प्रतिनिधीत्व द्यावे :**

भारतीय लोक कर भरतात परंतु भारतीय लोकांना प्रतिनिधीत्व दिले जात नाही तर ब्रिटीशांनी भारतीयांना प्रतिनिधीत्व द्यावे. प्रतिनिधीत्व दिल्यानंतर भारतीय लोकांच्या ज्या समस्या असतील त्या संसदेमध्ये मांडल्या जातील.

**२) भारतीयांच्या हातात सत्ता असावी :**

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात ब्रिटीशांच्या हाती राज्यकारभाराची सुत्रे असल्यामुळे त्यांनी भारतीय लोकांची आर्थिक लुट केली होती. भारतीयांच्या हातात सत्ता दिल्यानंतर भारताचा सामाजिक, आर्थिक विकास मोठ्या प्रमाणावर होईल. भारतीय लोकांची आर्थिक लुट थांबावयाची असेल तर राज्यकारभाराची सुत्रे भारतीयांकडे द्यावी.

**३) भारतीय नोकरांना सवलती द्याव्यात :**

ज्याप्रमाणे ब्रिटीश अधिकाऱ्यांना सवलती दिल्या जातात त्याचप्रमाणे भारतीय सेवकांना देखील सवलती द्याव्यात. त्यामुळे भारताचा विकास होईल.

### ४) प्रशासनात भारतीयांची  वर्णी लागावी :

प्रशासनात जी काही वरीष्ठ पदे असतील ती पदेदेखील भारतीयांना द्यावीत. सनदी सेवेत भारतीयांना सामावून घ्यावे. भारतीयांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी ब्रिटीश शासनाने प्रयत्न करावे. विद्यापीठाची स्थापना करावी.

### ५) उद्योगधंद्यांची निर्मिती करावी :

**ब्रिटीशांनी** भारतात मोठमोठ्या उद्योगधंद्यांची निर्मिती करावी. त्या उद्योगधंद्यांमध्ये भारतीय लोकांना सामावून घेण्यात यावे. भारतातील पैसा परदेशात जाता कामा नये. तो भारतातच रहावा त्या पैशाचा वापर उद्योगधंदे निर्मितीसाठी केला पाहिजे.

दादाभाईंनी ब्रिटीशांकडून काही अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे -

१. शासकीय जागांवर भारतीयांची नियुक्ती करावी.
२. गुणवत्ता आणि अनुभव पाहून वरिष्ठ जागांवर भारतीयांची नेमणूक करावी.
३. भारतीयांचे प्रतिनिधी कायदेमंडळात असावे.
४. सार्वजनिक समस्येवर चर्चा करण्यास भारतीयांना अधिकार असावा.
५. न्यायमंडळ मुक्त असावे त्यात ब्रिटीश सरकारने हस्तक्षेप करु नये.
६. आय.ए.एस. आणि आय.पी.एस. या परीक्षा भारतात घ्याव्यात.

### दादाभाई नौरोजींचे जहाल विचार :

१८३३ आणि १८५८ च्या कायद्यातील अभिवचने ब्रिटीश पूर्ण करु न शकल्यामुळे त्यांच्या विचारसरणीत बदल झाला. त्यांची एका मवाळ विचारवंतापासून जहाल विचारवंताकउे वाटचाल केलेली दिसून येते. १९०६ च्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात त्यांनी स्पष्टपणे म्हटले होते की, भारतीय समाजाचे संपूर्ण परीवर्तन होण्यासाठी स्वराज्याशिवाय पर्याय नाही. आमच्या नैतिक, आर्थिक आणि शारीरिक शक्तींचे शोषण करणाही ही अन्यायी राजवट नष्ट झाली पाहिजे. त्याकाळी नेमस्त विचारवंतांपैकी कोणीही असे विचार आणि स्वराज्याची मागणी केली नव्हती. म्हणून दादाभाई नौरोजी हे नेमस्तातील जहाल होते.

मवाळ विचारसरणीतून जहाल विचारसरणीकडे जाण्याचा त्यांचा मार्ग म्हणजे त्यांनी सुचविलेली कार्यपध्दती होय. त्यांचे काही विचार जहाल स्वरुपाचे होते. त्याकाळातील नेमस्त नेत्यांचा ब्रिटीशांच्या उदारमतवादावर आणि न्यायबुध्दीवर श्रध्दा होती. अर्ज विनंत्यांच्या माध्यमतून आपल्या मागण्या ब्रिटीश शासनापुढे मांडल्या जातात. असे त्यांना वाटत होते. हिंसाचार, रक्तपात, पाशवी शक्तीचा उपयोग यावर त्यांचा विश्वास नव्हता. काँग्रेसच्या अधिवेशनात नेमस्त विचारवंत पंडीत मदनमोहन यांनी असे म्हटले होते की, आपल्या मागण्यांसाठी आपण ब्रिटीशांकडे पुन्हा गेले पाहिजे, अर्ज विनंत्या केल्या पाहिजे. परंतु दादाभाईंनी त्यांच्या अशा पध्दतीला विरोध केला. ते म्हणाले की, अर्ज विनत्यांच्या आधारे ब्रिटीश आपल्या मागण्या पूर्ण करु शकणार नाहीत. त्यासाठी भारतीय लोकांमध्ये चळवळ निर्माण केली पाहिजे आणि चळवळीचे स्वरुप विधायक असले पाहिजे. दादाभाईंनी भारतीय लोकांच्या मागण्या न्याय आहेत त्या मागण्यांसाठी भीक मागण्याचे काहीच कारण नाही. भारतीय लोकांना हक्क देणे म्हणजे त्यांच्यावर ब्रिटीश उपकार करीत आहेत असे नव्हे.

या सर्व विचारांवरुन असे स्पष्ट होते की, दादाभाई हे जहाल होते. एवढेच नव्हे तर नेमस्त आणि जहाल विचारसरणीतील लोकांमध्ये समतोल निर्माण करणारे दादाभाई हे महत्वाचे घटक होते. दादाभाई नौरोजी यांनी मवाळ आणि जहाल या दोन्ही विचारसरणीमध्ये समन्वय निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

***

### प्रकरण ३

# न्यायमुर्ती महादेव गोविंद रानडे

**जीवन परीचय :**

न्यायमुर्ती रानडे यांचा जन्म १८ जानेवारी १८४२ साली निफाड येथे झाला. रानड्यांचे शालेय शिक्षण कोल्हापूर येथे झाले, तर उच्च शिक्षण मुंबईला झाले. रानडे हे लहानपणापासूनच फार अभ्यासू वृत्तीचे होते. रोज पुस्तके वाचणे हा त्यांचा नित्याचा क्रम होता. लहानपणी मॅट्रीक परीक्षेत एका निबंधात इंग्रज राजवटीवर कडक टीका केल्यामुळे त्यांचे परिक्षेतील मार्क कमी करण्यात आले होते. तसेच महाविद्यालयीन जीवनात शिवाजींची राज्यपध्दत आणि ब्रिटीशांची राज्यपध्दत यांची तुलना केली आणि ब्रिटीश राजवटीला दोष दिला म्हणून सहा महिन्यांपर्यंत त्यांची शिष्यवृत्ती रद्द करण्यात आली. १८६२ मध्ये त्यांनी बी.ए.ची पदवी प्राप्त केली. १८६४ मध्ये इतिहास विषयात एम.ए. ची पदवी प्राप्त केली. तर १८६६ मध्ये ते एल.एल.बी. परीक्षा पास झाले. १८६८ मध्ये त्यांनी एलफिन्स्टन कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून काम केले. १८७१ मध्ये पुण्यातील उपन्यायाधीशपदी ब्रिटीश सरकारने त्यांची नेमणूक केली. १८८४ मध्ये त्यांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. १८९३ मध्ये ते मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश झाले. न्या. रानडे मवाळ स्वभावाचे होते. निसर्गाने त्यांच्या पारड्यात अवगुणापेक्षा गुण जास्त प्रमाणात टाकले होते. न्या. रानड्यांनी सामाजिक विचार त्याचप्रमाणे आर्थिक विचार देखील मांडलेले आहेत. अशा या थोर विचारवंताचा मृत्यु १६ जानेवारी १९०१ मध्ये झाला.

**न्यायमुर्ती रानडे यांचे सामाजिक विचार :**

न्या. रानड्यांचे समाज सुधारणेविषयीचे विचार खूपच व्यापक आहेत. त्यांनी समाजाच्या परिस्थितीचे सुक्ष्मरित्या अवलोकन केले होते. समाजात जाती व्यवस्था दृढ झालेली होती. श्रेष्ठ कनिष्ठ असा भेदभाव निर्माण झाला. सामाजिक, आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात होती.

कारण जातीनुसार कार्याची वाटणी केली जात होती. शिक्षणाचे दरवाजे सर्वांना खुले नव्हते. स्त्री दास्यात जीवन जगत होती. एकाचवेळी बालविवाह, वृध्द विवाह होत होते. स्त्रीयांना कनिष्ठ दर्जा दिला जात होता. संपूर्ण समाज वाईट प्रथेच्या आहारी गेला होता. सर्वदूर निराशाजनक चित्र होते. अशा या परिस्थितीत राजकीय स्वातंत्र्य अगोदर की सामाजिक सुधारणा अगोदर अशी गंभीर समस्या त्यावेळी निर्माण झाली होती. न्या. रानड्यांच्या मते या समस्येमध्ये न पडता राजकीय आणि सामाजिक कार्य केले पाहिजे. राजकीय समस्या एवढीच सामाजिक समस्या महत्वाची होती. सामाजिक सुधारणेच्या संदर्भात त्यांनी पुढील मुद्दे सांगितलेले आहेत.

१. **सामाजिक आणि राजकीय प्रश्न एकमेकांपासून अलग करता येत नाही :** कोणत्याही क्षेत्रात आणि कोणत्याही काळात व्यक्ती आणि समुह यांना स्वतःच्याच प्रयत्नांनी अडीअडचणींवर मात करावी लागते आणि स्वतःचे बळ वाढवावे लागते. कोणतेही कार्य करतांना सर्व भौतिक, नैतिक, बौध्दिक सामर्थ्यानिशी स्वतःच्या पायावर उभे रहावे लागते. अशावेळी फक्त एका घटकाकउे लक्ष देऊन दुसऱ्या घटकाकडे दुर्लक्ष करता येत नाही. तसे केल्यास सूर्यप्रकाशापासून उष्णता दूर करण्यासारखा प्रकार होईल किंवा गुलाबाच्या सौंदर्यापासून सुगंध वेगळा करण्यासारखा प्रकार होईल.

२. **ऐतिहासिक दाखले :** न्या. रानड्यांनी सामाजिक प्रश्नांच्या संदर्भात ऐतिहासिक दाखले दिलेले आहेत. महाराष्ट्रामध्ये साधुसंतांनी सामाजिक परिर्वतने घडवून आणली होती. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास या सर्वांनी समान सुधारणेसाठी फार परिश्रम घेतले. समाजातील अनिष्ठ रुढी, प्रथा, परंपरा त्यांनी नष्ट केल्या.

३. **समानता नाही :** रानड्यांच्या मते भारतात स्त्री-पुरुषांमध्ये समानता नाही तसे एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीला गुलाम बनविले आहे. कुटुंबात स्त्रीया गुलाम झाल्या आहेत तर समाजात कनिष्ट जाती गुलाम आहेत. आपण आपल्या जाती बांधवांना जोपर्यत समान हक्क देत नाहीत, घरातील गुलामगिरी नष्ट करीत नाही तोपर्यंत इंग्रजांनी इंग्लंडच्या

प्रजेप्रमाणे आपल्यासाठी राजकीय हक्क देणे अशी मागणी करण्यास आपण पात्र नाही.

**४. राजकीय स्वातंत्र्य समाज सुधारणेशिवाय टिकणे अशक्य :** कारण जी लोकशाहीची तत्वे आहेत न्याय, स्वातंत्र्य, समता या तत्वांचा अंगिकार भारतीय समाजाने केलेला नाही. सामाजिक स्वातंत्र्याशिवाय राजकीय स्वातंत्र्याची इमारत उभी करु शकणार नाही.

**५.** न्या. रानड्यांनी समाज सुधारणेला प्राधान्य दिलेले आहे. सामाजिक लोकशाही आणि सामाजिक आधुनिकीकरण यांचा त्यांनी पुरस्कार केलेला आहे. राजकीय स्वातंत्र्य मिळूनही व्यक्ती खऱ्या अर्थाने स्वतंत्र होऊ शकणार नाही. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देखील समाजाचा त्रास कनिष्ट जातीतील लोकांना सहन करावा लागेल.

**भारतीय समाजातील दोष :**

१. मुक संमती
२. सद्सद्विवेक बुध्दीचा अभाव
३. अलिप्तता
४. धर्मनिरपेक्षतेचा अभाव
५. जातीय व्यवस्था

**१. मुक संमती :** भारतीय समाज हा वाईट आणि अनिष्ट रुढी, परंपरेला तो आपली मान झुकवत होता. त्यांना विरोध करीत नाही म्हणून या वाईट परंपरा समाजाला चिकटून राहतात. सतीच्या चालीस समाजाने मान्यता दिली होती.

**२. सद्सद्विवेक बुध्दीचा अभाव :** जनता आपल्या सद्सद्विवेक बुध्दीचा वापर करीत नव्हती. व्यक्ती ह्या बाह्य सत्तेच्या दडपणाखाली वावरत होत्या. धर्ममार्तंड समोर ते नतमस्तक होत असत. समाजामध्ये धर्माची आज्ञा म्हणजे देवआज्ञा असे समजले जात होते. त्यामुळे वाईट चालीला स्वतःच्या विवेक बुध्दीनुसार चौकसपणे एखाद्या गोष्टीच्या संदर्भात विचार करण्याची कुवत निर्माण झाली नाही. कारण इंग्रजी शिक्षणापासून भारतीय समाज दूर राहीला.

**३. अलिप्तता :** भारतीय समाज पाश्चात्य समाजापासून दूर राहिला. भारतीय समाज धर्माच्या आहारी जास्त गेल्यामुळे तो मागासलेला राहिला. बाह्य जगापासून तो अलिप्त राहिला. पाश्चात्य संस्कृतीला त्याने स्वतःचा स्पर्श केला नाही. भौतिक सुख वाढविणारी विज्ञाननिष्ठ संस्कृती भारतीय समाजाने स्वीकारली नाही. म्हणून तो भौतिक सुखापासून वंचीत राहिला.

**४. धर्मनिरपेक्षतेचा अभाव :** भारतीय समाज आपल्या जीवनात मुक्तपणे आणि धर्मनिरपेक्ष दृष्टीने वागताना दिसून येत नाही. धर्माच्या आधाराशिवाय विचार करण्यास तो कचरतो. प्रत्येक गोष्टीला धर्माचा आधार दिला जात असे. उदा. विधवांनी विवाह करु नये अशी धर्माज्ञा आहे. तसेच विधवांचे केशवपन केले पाहिजे याला धर्माचा आधार होता. धर्माच्या आज्ञेविरुध्द कोणी जात नव्हते.

**५. जातीव्यवस्था :** जातीव्यवस्थेबद्दल जनतेत तिरस्कार निर्माण केला गेला नाही. जाती व्यवस्था हा समाज रचनेचा अनमोल ठेवा आहे असे ते मानतात. जातीयता हा भारतीय समाजावरील एक मोठा कलंक होता. यामुळेच समाजात श्रेष्ठ-कनिष्ट अशी रचना निर्माण झालेली होती. त्यामुळे लोकांना जातीचा अभिमान वाटू लागला. समाजातील कनिष्ट जातींना वाईट वागणूक दिली जात होती. त्यामुळे समाजाचा विकास झ ालेला नव्हता.

**समाज सुधारणेचा मार्ग :**

न्या. रानड्यांच्या मते समाज सुधारणा समाजाच्या सर्व विभागांमध्ये झाली पाहिजे. समाजातील खालच्या पातळीपर्यंत सुधारणा झाल्या पाहिजेत. समाजसुधारणेसाठी न्या. रानड्यांनी चार पध्दती सांगितलेल्या आहेत.

१. पारंपारीक पध्दत
२. सद्सद्विवेकावर आधारीत पध्दत
३. कायद्याने समाज सुधारणा पध्दत
४. क्रांतीची पध्दत

**१. पारंपारीक पध्दत :**

समाज सुधारणेसाठी समाजातील जनतेवर धर्माचे असलेले प्रभुत्व लक्षात घेऊन धार्मिक तत्वानुसार सुधारणा केल्या पाहिजेत आणि या सुधारणा जुन्या विचारांवर आधारलेल्या असाव्यात. कारण कोणतेही जुने विचार समाज एकदम सोडून देत नाही. तसेच नविन विचार देखील ताबडतोब स्विकारत नाही. प्राचीन काळात समाजाची अवस्था फार चांगली होती. मात्र मध्ययुगीन काळात समाजाचे वैभव नष्ट झाले होते. म्हणून सामाजिक सुधारणा करतांना नवा दृष्टीकोन स्विकारत जनतेला प्राचीन वैभवाचे स्मरण करुन दिले पाहिजे. न्या. रानडे म्हणतात भविष्यकडे जातांना सुधारकांना भूतकाळाशी आपले नाते पूर्णपणे कधीच सोडता येत नाही. कारण तसे केल्यास त्यांचे परिणाम घातक ठरतील.

**२. सद्‌सद्विवेकावर आधारीत पध्दत :**

न्या. रानड्यांच्या मते समाज परिवर्तनासाठी व्यक्तीची सद्‌सद्विवेक प्रवृत्ती जागृत करणे आवश्यक आहे. त्यांच्या मते भारतीय समाजातील व्यक्ती नेहमी बाह्य दडपणाखाली वावरत असते. अशावेळी तो स्वतःच्या बुध्दीचा अवलंब करीत नाही. व्यक्तीची विवेक बुध्दी जागी करणे हे अत्यंत अवघड काम आहे. तरीदेखील व्यक्तीला स्वतंत्र बुध्दीने विचार करायला शिकविले पाहिजे. तरच समाजाच्या समस्यांची त्याला जाणिव होईल आणि सामाजिक सुधारणा मोठ्या प्रमाणावर घडून येतील. या कार्यासाठी समाज सुधारकांनी अपली लेखणी आणि वाणी खर्च केली पाहिजे. त्याशिवाय समाजात बदल होणार नाही. समाज सुधारणेसाठी नैतिक मार्गांचा अवलंब केला पाहिजे. जुन्या, अनिष्ट रुढींचा त्याग केला पाहिजे.

**३. कायद्याने समाजसुधारणा पध्दत :**

न्या. रानड्यांनी या पध्दतीचा पुरस्कार केलेला आहे. मात्र लोकमान्य टिळकांनी जेव्हा या पध्दतीला विरोध केला तेव्हा न्या. रानड्यांनी आपले विचार स्पष्ट करुन सांगितले. ते म्हणतात ब्रिटीशांच्या मनात आले असते तर त्यांनी भारतीय समाजाकडे सुरुवातीपासूनच दुर्लक्ष केले असते आणि जनतेला असंघटीत अज्ञानी ठेवले असते. रानड्यांच्या मते जेव्हा जनता स्वइच्छेने सुधारणा घडवून आणत नसेल तेव्हा कायद्याचा उपयोग करुन सुधारणा करणे

समाज हिताच्या दृष्टीने आवश्यक आहे. कायद्यामागे दंडशकती असल्यामुळे जनता त्याचे पालन करते.

**४. क्रांतीची पध्दत :**

न्या. रानड्यांनी समाज सुधारणेच्या जरी चार पध्दती सांगितलेल्या आहेत तरी त्यांना क्रांतींची पध्दत मान्य नव्हती. कारण ते संयमी वृत्तीचे आणि व्यवसायाने न्यायाधीश होते. क्रांतीचे उग्र स्वरुप त्यांच्या सौम्य स्वभावाला मानवणारे नव्हते. हिंसक पध्दतीने समाजात परिवर्तन करणे त्यांना मान्य नव्हते.

न्या. रानड्यांच्या मते काळावर अवलंबून न राहता सामाजिक सुधारणा केल्या पाहिजेत. रानड्यांनी पुढील सामाजिक सुधारणांना अग्रक्रम दिला होता.

१. भारतीय स्त्री गुलामगिरीतून मुक्त झाली पाहिजे. पुरुषांच्या बरोबरीने स्त्रीयांना स्थान मिळाले पाहिजे.
२. समाजातील जातीव्यवस्था नष्ट झाली पाहिजे. जन्मावर आधारलेले जातीय भेदभाव नष्ट केले पाहिजेत.
३. विवाह पध्दतीत सुधारणा झाली पाहिजे. उदा. वृध्द विवाह व बालविवाह बंद झाले पाहिजेत. वृध्दाने कुमारीकेशी लग्न करु नये.
४. समाजातील अंधश्रध्दा, रुढी व परंपरा नष्ट झाल्या पाहिजेत आणि संपूर्ण समाज विज्ञाननिष्ठा झाला पाहिजे.
५. शिक्षणाची दालने सर्वांना खुली असावीत. विशेषतः स्त्रीयांना पुरुषाच्या बरोबरीने शिक्षणाची संधी उपलब्ध करुन द्यावी.

न्या. रानडे हे केवळ विचार मांडणारे समाज सुधारक नव्हते तर त्यांनी आपल्या परीने समाज सुधारणेचे कार्य केलेले आहे. त्यांचे कार्य खालीलप्रमाणे सांगता येतील.

१. न्या. रानड्यांनी वृत्तपत्रातुन लेख लिहून भारतीय समाजाला अनिष्ट रुढी परंपरेतून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी आपली लेखणी आणि वाणी खर्च केली.
२. प्रार्थना समाजाची स्थापना करुन धार्मिक सुधारणा करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

उदा. परमेश्वर एक आहे. सर्व त्यांची लेकरे आहेत हा विचार मांडून समाजातील भेदभाव नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

३. न्या. रानड्यांनी सामाजिक परिषदेची स्थापना केलेली आहे. समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी अत्यंत प्रामाणिकपणे आणि तळमळीने या सामाजिक परिषदेतून योगदान केलेले आहे.

४. त्यांनी विधवा विवाहाला समाजात उत्तेजन मिळावे म्हणून विधवा विवाह उत्तेजन मंडळ स्थापन केले.

**न्या. रानडे यांचे आर्थिक विचार :**

न्या. रानडे यांनी दादाभाई नौरोजींप्रमाणे भारताच्या आर्थिक स्थितीचा सखोल आणि सुक्ष्म अभ्यास केला आहे. मात्र दोघांच्या विचारसरणीत फरक दिसून येतो. रानड्यांच्या मते कोणाताही प्रश्न राजकीय नसून तो सामाजिक असतो. तर त्या प्रश्नांना काही प्रमाणात आर्थिक बाजु असते. दादाभाई नौरोजींच्या मते इंग्रजांच्या आर्थिक धोरणामुळे भारतात दारिद्रय आहे. हा विचार न्या. रानडे यांना मान्य नव्हता. रानडेंच्या मते आपल्या देशात फार काळापासून दारिद्रय आहे. दारीद्रयाचा वारसा फार जुना आहे आणि आता आपण झोपेतून जागे झालो, दारिद्रयाचे प्रखर चटके आपल्याला बसत आहेत म्हणून आपण दारिद्रयाच्या कारणांचा विचार करु लागलो. ब्रिटीश सैन्यावर होणारा खर्च म्हणजे भारताची लुट नाही उलट पैशांच्या मोबदल्यात त्यांनी भारतात शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित केलेली आहे.

**दारिद्रयाची कारणे :**

१. कौशल्याचा अभाव
२. लोकसंख्या जास्त
३. खेड्यांची संख्या जास्त
४. मागासलेला शेती व्यवसाय
५. अपुरे भांडवल
६. पत व्यवस्था नाही
७. जुन्या रुढी प्रथांचा पगडा

**१. कौशल्याचा अभाव :** भारतीय जनतेजवळ व्यवसायासाठी आणि उद्योगधंद्यासाठी लागणारी हिंमत नाही, कौशल्य नाही, साहस नाही,

चिकाटी नाही, इ. गुणांचा अभाव आहे. तसेच उद्योगधंद्यासाठी धोका पत्करण्याची तयारी कमी लोकांकडे आहे. त्यातूनच दारिद्रयात वाढ होते.

२. **लोकसंख्या :** भारताच्या दारिद्रयाला लोकसंख्या देखील जबाबदार आहे. देशाची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढली आणि सतत वाढत जाणारी लोकसंख्या ही सुध्दा दारीद्रयाचे प्रमुख कारण आहे. न्या. रानडेंच्या मते वाढत्या लोकसंख्येला पोषणासाठी पाहिजे तशी उद्योगधंद्यांची वाढ झालेली नाही आणि त्यामुळे हा सर्व भार शेतीवर पडला आणि दारिद्रयात मोठ्या प्रमाणात वाढ झाली.

३. **खेड्यांची संख्या जास्त :** भारतात मोठ्या प्रमाणात खेड्यांची वाढ झ ाली. त्या तुलनेने शहरांची वाढ झाली नाही. नवीन विचारसरणी फक्त शहरापुरतीच राहिली. ग्रामीण भाग जुन्या विचार सरणीला चिकटून राहिला आणि त्यामुळे खेड्यांचा विकास झाला नाही.

४. **मागासलेली शेती :** भारत हा शेतीप्रधान देश आहे. देशाची अर्थव्यवस्था संपूर्णपणे शेतीवर अवलंबून आहे. तसेच जनतेच्या उपजीवीकेचे एकमेव साधन शेती आहे. अशा या शेतीप्रधान देशात मागासलेली शेतीप्रधान व्यवस्था दारिद्रयाला कारणीभूत ठरली.

५. **अपुरे भांडवल :** देशाची आर्थिक स्थिती भक्कम करण्यासाठी औद्योगिकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. नविन आणि आधुनिक उद्योगधंद्यात गुंतवणूक करणे अत्यंत आवश्यक आहे. गुंतवणूक करण्यासाठी भारताजवळ त्या वेळेला स्वतःचे भांडवल नव्हते. त्यामुळे मागासलेपणात मोठ्या प्रमाणात भर पडली.

६. **पतव्यवस्था नाही :** आपल्या देशात आधुनिक पध्दतीची पतव्यवस्था नव्हती. रानड्यांच्या मते आपल्या देशातील शेतकरी कर्जात जन्म घेत होता. कर्जात त्याची वाढ होत होती आणि कर्जातच शेतकरी मरत होते. शेतकऱ्याला जेव्हा वेळेवर पैशांची गरज भासायची तेव्हा त्याला सावकारांकडून वेळेवर पैसा मिळत नव्हता आणि मिळालाच तर जास्त व्याज त्यावर आकारले जात असे. या गोष्टींमुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती कधीच सुधारली नाही. त्याचप्रमाणे उद्योगधंद्याला लागणारा पैसा स्वस्त दरात कर्जाच्या रुपाने जनतेला मिळत नव्हता.

७. **जुन्या रुढी प्रथांचा पगडा :** न्या. रानडेंच्या मते भारतीय समाज जुन्या रुढी परंपरेला चिकटलेला होता आणि त्यात अडकलेला होता. भौतिक गोष्टीत पाहिजे तेवढा उत्साह त्यांच्यात दिसून येत नव्हता. म्हणून औद्योगिक क्षेत्रात ते प्रगती करु शकले नाही. अशा रितीने रानड्यांनी दारीद्रयाची कारणे सांगितलेली आहेत.

**दारिद्रय दूर करण्याचे उपाय :**

१. शेतीत सुधारणा करावी.
२. औद्योगिकीकरण झाले पाहिजे.
३. भांडवल पुरवठा.
४. शहरांची संख्या वाढली पाहिजे.
५. आर्थिक नियोजन.
६. व्यापारात वाढ करावी.

**१. शेतीत सुधारणा करावी :** भारत हा देश शेतीप्रदान देश असल्यामुळे बहुसंख्य जनता शेतीवर अवलंबून आहे. म्हणून शेतीचे संपूर्ण आधुनिकीकरण झाले पाहिजे. शेती करण्याच्या जुन्या पध्दतींचा उपयोग केला पाहिजे. आधुनिक यंत्र सामुग्रीचा वापर शेतीत झाला पाहिजे. अन्नधान्याचे उत्पादन वाढवून त्यामार्फत भारतीयांचे दारिद्रय नष्ट करता येईल. पाश्चात्य देशांच्या पध्दतीचा शेतीसाठी अवलंब केला पाहिजे. भारतात शेतकऱ्यांना भांडवल उपलब्ध करुन देण्यासाठी भू-विकास बँका स्थापन केल्या पाहिजेत.

**२. औद्योगिकीकरण झाले पाहिजे :** भारतीयांचे दारीद्रय दूर करण्यासाठी मोठ्या स्वररुपाच्या उद्योग धंद्यांचा विकास झाला पाहिजे. ब्रिटीशांच्या अर्थनितीमुळे भारतातील उद्योगधंदे नष्ट झाले होते. शेतीवर मोठ्या प्रमाणत भार पडलेला होता. म्हणून मोठे उद्योगधंदे निर्माण केले पाहिजे. दारीद्रय दूर करण्यासाठी उद्योगधंद्यांची निर्मिती करणे अत्यावश्यक आहे. मोठ्या उद्योगधंद्यांमुळे लहान उद्योगधंद्यांची देखील वेगाने प्रगती होते.

**३. भांडवल पुरवठा :** भारतात उद्योगधंद्यांची वाढ होण्यासाठी त्याला लागणारे भांडवल देखील आपल्या देशात निर्माण झाले पाहिजे. ब्रिटीश उद्योगपतींनी भारताच्या औद्योगिक विकासासाठी भांडवलाची गुंतवणूक

करण्याची तयारी दाखविली तर त्यास विरोध करु नये. उद्योगधंद्यांच्या विकासातून बेकारीची समस्या सुटत असते.

४. **शहरांची संख्या वाढली पाहिजे :** भारतात मोठ्या प्रमाणात शहरीकरण झाले पाहिजे. खेडी म्हणजे मागासलेल्या जुन्या अंधश्रध्दा यांचे माहेरघरच असते. शहरीकरण झाले तर आधुनिक विचारप्रणाली आणि आधुनिक दृष्टीकोन झपाट्याने आत्मसात केला जातो.शहरांची प्रगती खेड्यांच्या तुलनेने अधिक जलद गतीने होत असते. तसेच आधुनिक सुधारणेचे विचार खेड्यापर्यंत लवकर पोहोचत नाही आणि पोहोचले तरी खेड्यातील जनता ते विचार आत्मसात करीत नाही.

५. **आर्थिक नियोजन :** न्या. रानडे हे आर्थिक क्षेत्रातील सरकारच्या हस्तक्षेपाचे पुरस्कार करणारे विचारवंत होते. आर्थिक प्रगतीसाठी सरकारने आर्थिक निये ाजन करावे. प्रामुख्याने कृषी व्यवसाय, उद्योगधंदे या क्षेत्रात सरकारने आर्थिक नियोजन करावे म्हणजे भारताच्या दारीद्रयाची समस्या सुटू शकेल.

६. **व्यापारात वाढ करावी :** भारताने आंतरराष्ट्रीय व्यापार वाढविला पाहिजे. देशातील वेगवेगळे व्यापारी केंद्र एकमेकांना जोडली पाहिजेत. दळणवळणाची सोय निर्माण केली पाहिजे. भारतात निर्माण झालेल्या वस्तु मोठ्या प्रमाणत परकीय देशात पाठविल्या पाहिजेत. अनेक प्रगत देशांबरोबर व्यापारी संबंध ठेवले पाहिजेत. त्यामुळे दारीद्रय कमी होण्यास मदत होईल.

अशा प्रकारे आर्थिक विचार स्पष्ट करता येतील.

**न्या. रानडेंचे उदारमतवादाविषयी विचार :**

न्या. रानडे यांच्यावर प्राचीन धर्म संस्कृतीचा मोठा प्रभाव पडलेला होता. पाश्चात्य विचारांनी ते प्रभावीत झाले होते. त्यांच्या मते आपल्या देशाला जर प्रगती करावयाची असेल तर आपल्या जनतेने उदार मतवादाचे तत्वज्ञान स्विकारले पाहिजे. उदारमतवाद म्हणजे प्रगत संस्कृतीची राजकीय बाजु होय.

**उदारमतवादाची वैशिष्ट्ये :**

१. व्यक्ती स्वातंत्र्य

२. सामाजिक स्वातंत्र्य

३. कौटुंबिक स्वातंत्र्य
४. कायद्याचे अधिराज्य
५. केंद्रस्थानी व्यक्ती
६. धामिर्क उदारमतवाद
७. राजकीय उदारमतवाद
८. हक्क आणि कर्तव्य

**१. व्यक्ती स्वातंत्र्य :** रानडेंनी आपल्या उदारमतवादात व्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार केलेला आहे. भारतातील प्रत्येक व्यक्तीला भाषण, लेखन, संघटन स्वातंत्र्य असले पाहिजे. यावरील स्वातंत्र्याची त्यांनी मागणी केलेली आहे. कारण अशा प्रकारच्या स्वातंत्र्यामुळे व्यक्तीचा सर्वांगिण विकास होत असतो.

**२. सामाजिक स्वातंत्र्य :** व्यक्ती स्वातंत्र्याप्रमाणेच सामाजिक स्वातंत्र्याला देखील रानड्यांनी महत्वाचे स्थान दिलेले आहे. समाजातील व्यक्ती व्यक्तींमध्ये भेदभावांच्या आणि विषमतेच्या ज्या तटबंद्या होत्या त्याला त्यांनी प्रखर विरोध केला. 'जाती व्यवस्था' हा समाजाच्या विकासातील फार मोठा अडथळा आहे. जाती व्यवस्थेमुळे व्यक्तीला स्वतःच्या सद्सदविवेक बुध्दीचा वापर करता येत नाही.

**३. कौटुंबिक स्वातंत्र्य :** रानडेंनी कौटुंबिक स्वातंत्र्याचा देखील पुरस्कार केलेला आहे. कौटुंबिक स्वातंत्र्यात स्त्री स्वातंत्र्याचा विचार मांडलेला आहे. भारतीय स्त्रीयांना वाईट परिस्थितीत जीवन जगावे लागत होते म्हणून त्यांनी आपल्या उदारमतवादात स्त्री उत्कर्षाचा विचार मांडलेला आहे. पुरुषांप्रमाणे स्त्रीयांना देखील शिक्षणाची दालने खुली करुन दिली पाहिजे. सर्वच मनुष्य प्राणी ईश्वराची लेकरे आहेत तर मग त्यांच्यात श्रेष्ठ-कनिष्ठ, स्पृश्य-अस्पृश्य स्त्री पुरुष असा फरक करणे समाजहिताच्या दृष्टीने घातक आहे. विधवा स्त्रीयांचे पुनर्विवाह झाले पाहिजे, बालविवाह पध्दत बंद झाली पाहिजे, कुटुंबाच्या संपत्तीत स्त्रीयांना देखील न्याय हक्क मिळाला पाहिजे अशा प्रकारे त्यांनी स्त्री उत्कर्षाचा विचार कौटुंबिक स्वातंत्र्यात मांडलेला आहे.

**४. कायद्याचे अधिराज्य :** रानड्यांनी उदारमतवादी श्रेणीत कायद्यानुसार राज्यकारभार चालला पाहिजे असे मत मांडले. कायद्यासमोर सर्व जनतेला समान वागणूक दिली जाते. भारतात ब्रिटीश अधिकारी जनतेवर जुलूम करतात, छळ करतात, पिळवणूक करतात. त्यांच्या या अधिकाऱ्यांना कायद्याचे राज्य मान्य नाही. मात्र ब्रिटीश पार्लमेंट सदस्यांना याची जाणीव करुन दिली तर भारतात देखील ब्रिटनप्रमाणे कायद्याचे अधिराज्य राहील तसेच धर्म, जात, प्रदेश यांच्या आधारे कायद्याच्या अधिराज्यात भेदभाव करता कामा नये.

**५. केंद्रस्थानी व्यक्ती :** न्या. रानडेंनी व्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार केलेला आहे. आपल्या राजकीय तत्वज्ञानात व्यक्ती विकासाला महत्वाचे स्थान दिले आहे. व्यक्तीच्या अंगी असलेल्या गुणांच्या विकासासाठी व्यक्तीच्या स्वायत्ततेची मागणी करणे ही उदारमतवादाची प्रमुख प्रेरणा होती. व्यक्तींचा सर्व क्षेत्रात विकास घडवून आणण्यासाठी पोषक वातावरण निर्माण झाले पाहिजे.

**६. धार्मिक उदारमतवाद :** रानडेंच्या मते धार्मिक सुधारणा करणे आवश्यक आहे. व्यक्ती स्वातंत्र्यासाठी धर्म देखील महत्वाची भूमिका पार पाडू शकतात. भारतात अनेक धर्म, जाती आहेत. त्यांच्यात समन्वय प्रस्थापित करणे गरजेचे आहे. एका धर्माने दुसऱ्या धर्माविषयी आदर ठेवला पाहिजे. धर्मातील ज्या अनिष्ठ रुढी, प्रथा असतील त्यांना विरोध केला पाहिजे.

**७. राजकीय उदारमतवाद :** भारतात प्रातिनिधीक शासन संस्थांचा उदय जलद गतीने झाला पाहिजे तरच खऱ्या अर्थाने राजकीय उदारमतवाद प्रस्थापित होईल. जनतेने या प्रातिनिधीक संस्थांमधून आपला राजकीय सहभाग वाढविला पाहिजे. स्थानिक स्वराज्य संस्था, प्रांतिक सरकार भारतीयांचे विधीमंडळ, ब्रिटनचे पार्लमेंट या सर्वांमध्ये भारतीयांचे प्रतिनिधी असावेत.

**८. हक्क आणि कर्तव्य :** रानडेंनी व्यक्तीच्या सर्वांगिण विकासासाठी हक्कांची गरज सांगितलेली आहे. त्याचप्रमाणे कर्तव्याचा देखील विचार मांडलेला आहे. लोकशिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तीमध्ये त्याच्या कर्तव्याची जाणीव करुन दिली पाहिजे. रानडेंच्या मते वैयक्तिक सुखाचा

विचार करतांना समाज हिताचा विचार करणे देखील आवश्यक आहे. समाज हितासाठी व्यक्तीने आपल्या कर्तव्याचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे.

**न्या. रानड्यांच्या उदारमतवादावरील टीका :** न्या. रानड्यांनी आपल्या उदारमतवादात व्यक्तीला केंद्रस्थान दिलेले आहे. कौटुंबिक आणि सामाजिक स्वातंत्र्याचा विचार जरी मांडलेला असला तरी त्याच्या उदारमतवादाला पाश्चात्य उदारमतवादाच्या तुलनेत काही मर्यादा पडलेल्या आहेत.

१. **ब्रिटीशांवर निष्ठा :** त्यांच्या उदारमतवादात विरोधाभास दिसून येतो. एका बाजुला रानड्यांनी व्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार केलेला आहे. तर दुसऱ्या बाजुला ब्रिटीश राजवट भारतात अजून काही काळापर्यंत असली पाहिजे असे मत व्यक्त केले. रानड्यांचा ब्रिटीशांवर जास्त विश्वास होता. मात्र ब्रिटीशांमुळे भारतीय जनतेच्या स्वातंत्र्यावर मोठ्या प्रमाणात बंधने आली.

२. **रुढी आणि परंपरांचा पगडा :** न्या. रानडे हे स्वतः जरी उदारमतवादी असले तरी रुढी आणि परंपरेच्या कार्यातून ते कधीच सुटू शकले नाही. रुढी परंपरेचा त्यांच्या मनावर दबाव होता. विधवा विवाहास प्रोत्साहन देणारे न्या. रानडेंवर वेळ आल्यानंतर विधवा विवाहापासून दूर राहिलेत अशी टिका त्यांच्यावर करण्यात आली.

३. **धर्मनिष्ठा :** न्या. रानडेंवर पाश्चिमात्य विचारांचा प्रभाव होता. ते बुध्दीमान असून देखील जुन्या रुढींचा पगडा त्यांच्यावर होता. त्यांची धर्मावर श्रध्दा होती. व्यक्तीपेक्षा धर्माला महत्वाचे मानले. न्या. रानड्यांनी व्यक्तीमध्ये विवेक पाहिला. तर समाजात ईश्वर पाहिला

**रानडेंचे ब्रिटीश राजवटीविषय विचार :**

न्या. रानडे हे नेमस्त / मवाळ पंथाचे विचारवंत होते. त्यामुळे त्यांनी देखील नेमस्त नेत्यांप्रमाणेच ब्रिटीश राजवटीचे स्वागत केले होते. न्या. रानड्यांच्या मते ब्रिटीश राजवटीमुळे भारतात अनेक सुधारणा झाल्या आहेत. रानड्यांच्या ब्रिटीश साम्राज्याविषयीच्या विचारांचा आढावा घेतांना त्यांची ब्रिटीशांवरील निष्ठा आणि त्यांनी ब्रिटीश राजवटीवर केलेली टिका असे दोन विभाग पडतात.

**ब्रिटीशांवरील निष्ठा :**

**१. बिटीशांमुळे रुढी, परंपरा नष्ट झाल्या :**

भारतीय जनतेला शिक्षण देण्याची क्षमता ब्रिटीश राजवटीत आहे. रानडेंच्या मते हे राज्यकर्ते अतिशय हुशार, चतुर आणि बुध्दीमान आहेत. तसेच ते उदारमतवादी देखील आहेत. त्यामुळेच न्या. रानडेंचा ब्रिटीश राजवटीवर मोठ्या प्रमाणात विश्वास होता. ब्रिटीश राज्यकर्ते आपल्या देशात आल्यामुळे आपली जनता काही प्रमाणात अनिष्ठ रुढी परंपरेच्या मार्गातून सुटलेली आहे.

**२. ब्रिटीश हे उदारमतवादी :**

न्या. रानडेंच्या मते ब्रिटीश लोक गुणवान आहेत. त्यांनी स्वतःच्या देशात मोठ्या प्रयत्नांनी संसदीय लोकशाहीची स्थापना करुन देशातील नागरीकांना पूर्ण स्वातंत्र्य दिलेले आहे. त्यांच्या देशात कायद्यानुसार राज्यकारभार चालतो. अधिकाऱ्याच्या लहरीनुसार राज्यकारभार चालत नाही. कायद्याच्या अधिसत्तेचा पुरस्कार त्यांनी केलेला आहे. सर्व जनतेला मुलभूत हक्क त्यांनी प्राप्त करुन दिलेले आहेत. अशा प्रकारे उदारमतवादी ब्रिटीशांचा भारतीयांना सहवास मिळाला ही भाग्याची गोष्ट आहे. त्यांच्या देशाप्रमाणेच ते आपल्या देशातही कायद्याचे राज्य प्रस्थापित करतील म्हणून ब्रिटीशांच्या हातून राज्यकारभाराची सुत्रे काढून घे`णे अयोग्य आहे.

**३. समाजहित :**

रानडें`च्या मते ब्रिटीश राजवट ही काही ईश्वरी वरदान नाही. मात्र जेव्हा राज्यकारभार चालविण्यासाठी क्षमता भारतीयांमध्ये येईल तेव्हा ब्रिटीश लोक आपल्या हातात राज्यकारभाराची सुत्रे देऊन आ ापल्या देशात जातील. ब्रिटीशांना भारतातून हाकलुन लावणे रानडेंना मान्य नव्हते. तसे केल्यास आपल्या समाजाच्या हिताच्या दृष्टीने हानीकारक ठरेल.

**४. भारताचा फायदा :**

ब्रिटनने भारताला जिंकून राजसत्ता स्वतःजवळ ठेवलेली आहे. त्यामुळे भारतीयांचा मोठा फायदा झालेला आहे. त्यांनी भारताची आर्थिक, सामाजिक प्रगती मोठ्या प्रमाणावर केली. न्या. रानडेंच्या मते भारतीय जनतेने कायद्याचे पालन करुन घटनात्मक चौकटीत राहून आपल्या जास्त मागण्या

ब्रिटीशांसमोर मांडल्या पाहिजेत त्यासाठी जनतेने राज्यकर्त्यांकडे अर्ज विनंत्या केल्या पाहिजेत त्याचप्रमाणे ब्रिटीशांना जागृत केले पाहिजे.

**ब्रिटीश राजवटीवर रानडेंनी केलेली टिका :**

रानडेंनी जरी ब्रिटीश राज्यकारभारावर निष्ठा व्यक्त केलेली असली तरी वेळोवेळी सरकारच्या अयोग्य धोरणावर टीका केली. टिका करतांना त्यांनी मागचा पुढचा विचार केलेला नाही. भारतीय जनतेच्या हितसंबंधाच्या रक्षणासाठी त्यांनी सरकारच्या धोरणांवर वेळोवेळी टीका केलेली आहे. ब्रिटीशांच्या आर्थिक धोरणांवर न्या. रानड्यांची जास्त नजर होती. आपल्या देशातील संपत्तीची लूट ब्रिटीशांनी मोठ्या प्रमाणावर केली. त्यामुळे भारतीयांच्या दारिद्रयात जास्त भर पडली. मात्र तेवढाच मुद्दा ते सांगत नाही तर ब्रिटीशांच्या अर्थनितीमुळे देशातील उद्योगधंदे बंद पडले. ब्रिटीशांनी त्यांच्या देशातून आयात केलेला माल खेडोपाडी पोहोचला आणि त्यामुळे ग्रामोद्योग बंद पडले आणि शेतीवर भार पडून दिवसेंदिवस जनता असहाय्य झाली. अशाप्रकारे आर्थिक धोरणामुळे भारतीयांची संपत्तीची लूट झाली.

ब्रिटीश राज्यकर्ते भारतात संपत्तीचे न्याय्य वाटप करीत नाहीत. जनतेकडून निरनिराळ्या मार्गांनी कर गोळा केला जातो. मात्र त्यांना विकासाची संधी उपलब्ध करुन दिली जात नाही. म्हणून रानडेंनी ब्रिटीशांना उपदेश केला आहे की, संपत्तीचे विभाजन न्याय पध्दतीने झाले पाहिजे. जनतेचा विकास घडवून आणला पाहिजे आणि त्यानंतरच त्यांच्यावर कर आकारणी केली पाहिजे.

ब्रिटीश राजवटीवर टिका करतांना रानडे म्हणतात, जेव्हा भारतात दुष्काळ पडला होता तेव्हा ब्रिटीशांचे धोरण कसे बेजबाबदारपणाचे होते, अधिकारी वर्गाचे उर्मट बोलणे आणि बेजबाबदारपणाची वागणूक हा मुद्दा देखील त्यांनी प्रखरपणे मांडलेला आहे. तसेच काही वेळा नैसर्गिक दुष्काळ पडलेला नसून अन्नधान्याचा दुष्काळ नसून संपत्तीचा दुष्काळ पडलेला आहे हे रानडेंनी ब्रिटीशांना दाखवून दिले. भारतात धान्य उपलब्ध असून देखील भारतातील जनता उपाशी होती या दारिद्रयाला सरकारचे धोरण कारणीभूत होते.

इलबर्ट बिलच्या संदर्भात युरोपियन गुन्हेगारांची चौकशी करण्याचा अधिकार किंवा खटल्याची सुनावणी करण्याचा अधिकार हिंदी मॅजेस्ट्रीटना किंवा हिंदी न्यायाधीशांना द्यावा अशी तरतूद या विधेयकात केलेली होती. हे विधेयक रद्द करण्यासाठी ॲग्लो इंडियन लोकांनी या विधेयकाला मोठ्या प्रमाणात विरोध केला. त्याचप्रमाणे त्यांनी सरकारवर दबाव आणला आणि त्यामुळे इलबर्ट बील अमान्य झाले त्यावेळेस भारतीय जनता संतापली होती. त्या परिस्थितीत रानड्यांनी ब्रिटीशांच्या या धोरणावर टिका केली होती.

काहींच्या मते रानडे स्वतःच्या विचाराने आणि आचरणाने प्रगतीशील असुन देखील ब्रिटीश राजवटीला त्यांनी परमेश्वराच्या ईच्छेचे प्रतिक मानलेले आहे.

भारताच्या स्वातंत्र्याला प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे त्यांनी विरोध केलेला आहे असे विचार त्यांच्याविरोधी मांडले गेले.

***

## प्रकरण ४

# लोकमान्य टिळक

**जीवन परिचय :**

लोकमान्य टिळकांचा जन्म २३ जुलै १८५६ मध्ये महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील चिखली या गावी झाला. पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्ये त्यांचे शिक्षण झाले. टिळकांनी डेक्कन कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज आणि न्यू इंग्लिश स्कुल येथे अध्यापन कार्य केले. लोकशिक्षण हा त्याचा हेतू होता. टिळकांनी मराठा आणि केसरी हे दोन वर्तमानपत्र काढले. आगरकर हे टिळकांचे मित्र होते. लोकमान्य टिळकांनी देशसेवेचे व्रत अंगिकारले त्याबद्दल त्यांना १९०८ मध्ये सहा वर्षांची शिक्षा झाली. मंडालेच्या तुरुंगात टिळकांनी 'गितारहस्य' नावाचा ग्रंथ लिहीला. लोकमान्य टिळक हे जहालवादी होते. त्यांनी होमरुल लीगची स्थापना केली. जनजागृती आणि लोकशिक्षण व्हावे म्हणून टिळकांनी १८९३ मध्ये पुण्यात गणेश उत्सव व शिवजयंती १८९६ मध्ये रायगडावर सुरु केला. देशद्रोहाच्या आरोपावरुन त्यांच्यावर खटले दाखल झाले. 'स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे आणि तो मी मिळविणारच' ही कल्पना होमरुल चळवळीमार्फत मांडली. त्यांनी ४० वर्ष अखंडपणे देशसेवेचे महान कार्य केले. त्यांनी स्वतःचा व्यक्तीगत सुखाचा कधीही विचार केला नाही. अशा या महान पुरुषाचे निधन १ ऑगस्ट १९२० रोजी मुंबई येथे झाले.

**लोकमान्य टिळकांचे राष्ट्र आणि राष्ट्रवादाविषयी विचार :**

टिळकांच्या मते राष्ट्र ही एक मानसिक आणि अध्यात्मिक कल्पना आहे. राष्ट्रभक्ती हा टिळकांच्या विचारांचा केंद्रबिंदू होता. त्यांच्या मते राष्ट्रप्रेम ही एक भव्य आणि उदात्त कल्पना असून धर्म, जातीयता, भाषावाद, प्रांतवाद इत्यादींना पार करुन जाणारी एक बाब आहे. टिळकांनी भारतीय जनतेत राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न केला. राष्ट्रीयता ही भावना मनुष्याच्या मानसिक अवस्थेवर अवलंबून असते व त्यात देखील वैयक्तिक मानसिक कल्पना महत्वाची आहे. टिळकांनी ब्रिटीश राजवटी संबंधीचे रानड्यांचे विचार खोडून काढले. त्यांनी भारतीय जनतेला दैन्यावस्थेतून बाहेर

काढण्याचा प्रयत्न केला. सांस्कृतीकदृष्ट्या ब्रिटीश श्रेष्ठ आहेत आणि त्यांच्या आगमनाने आपल्या उध्दाराचा मार्ग मोकळा झाला हा न्यायमूर्ती रानड्यांना विचार होता. या मनस्थितीतून राष्ट्राला बाहेर काढण्याचा प्रयत्न टिळकांनी केला. म्हणून लोकमान्य टिळकांना भारतीय राष्ट्रवादाचा "शिल्पकार" मानले जाते.

टिळकांच्या मते संस्कृतीच्या आधारे राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होऊ शकते. तसेच धर्माचा आधार घेऊन सुध्दा राष्ट्रप्रेम जागृत करता येते. त्यांच्या मते भारतीय जनतेत राष्ट्रभावना जागृत केली पाहिजे. हिंदू संस्कृतीला श्रेष्ठ आणि आदर्श संस्कृती म्हणून टिळकांनी संबोधले आहे. तसेच त्यांनी धर्माच्या बाबतीत देखील समर्थन केलेले आहे. हिंदू धर्मात उपासना पध्दती असल्यामुळे हिंदू धर्माला फार मोठी व्यापकता लाभलेली आहे. टिळकांच्या मते भारतीय जनतेच्या मनात प्रयत्नांद्वारे राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करता येईल. त्यासाठी त्यांनी असे सांगितले की, भारतात फक्त दोनच गट आहेत. एक राज्यकर्त्यांचा आणि दुसरा जनतेचा. म्हणून हिंदू आणि मुसलमान यांच्यातील द्वेषाची भावना नष्ट झाली पाहिजे. एक राष्ट्र निर्माण करण्यासाठी हिंदू मुस्लीमांनी एकमेकांना समजून घेतले पाहिजे. त्यांनी आपसात वाद घालू नये तर आदराची भावना ठेवली पाहिजे. त्यांनी गुण्यागोविंदाने राहिले पाहिजे. मुस्लिम नेत्यांनी आणि भारतीय जनतेने ब्रिटीशांच्या भूलथापांना बळी पडू नये. त्यांच्यावर विश्वास ठवू नये कारण ब्रिटीशांची निती ही हिंदू - मुस्लीमांमध्ये फुट पाडणारी होती.

१. इंग्रजी शिक्षणात हिंदू मुसलमानांच्या पुढे गेलेत.
२. एकेकाळी आपण राज्यकर्ते होतो ही भावना मुस्लीमांच्या मनात निर्माण झाली होती.
३. आपण अल्पसंख्याक आणि असुरक्षित आहोत अशी भावना मुस्लीम जनतेची झाली.
४. इंग्रजांनी हिंदू-मुसलमानांमध्ये फुट पाडण्याचा प्रयत्न केला. तसेच काही मुस्लिम नेते सुध्दा त्याला जबाबदार होते.
५. सरकारी अधिकाऱ्यांची निती ही पक्षपाती स्वरुपाची होती इ. कारणांमुळे हिंदू-मुस्लीमांमध्ये तणाव निर्माण झाला.

**उपाय :**

१. टिळकांच्या मते हिंदू-मुस्लीमांमध्ये एकी साधणे आवश्यक आहे.
२. मतभेद नष्ट करण्यासाठी दोन्ही जमातींमध्ये शिक्षणाचा प्रसार करावा.
३. मुसलमान मौलवींमार्फत त्यांच्या जनतेला समजवण्याचे कार्य झाले पाहिजे.
४. सरकारी नियमांचे काटेकोरपणे पालन झाले पाहिजे.
५. राज्यकर्त्यांनी जनतेची दिशाभूल करु नये.

लोकमान्य टिळकांच्या मते राष्ट्रीय उत्सव आणि राष्ट्रपुरुषांची पुजा यामुळे एकतेची भावना निर्माण होते. राष्ट्रीयत्वाची भावना भारतीय जनतेच्या रुढी परंपरा यावर आधारीत असावी.

**१. शिवजयंती : १५ एप्रिल १८९६**

लोकमान्य टिळकांच्या मते जनतेत राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्यासाठी समाजातील श्रेष्ठ व्यक्तींची मदत घेतली पाहिजे. शिवाजी हे महाराष्ट्रप्रमाणेच अखिल भारतीय जनतेचे फार मोठे राष्ट्रीय प्रतिक होते. टिळकांनी त्याला सामाजिक स्वरुप देण्याचा प्रयत्न केल. राष्ट्रीयत्व निर्माण करण्यासाठी शिवरायांसारखी उंच प्रतिमा आवश्यक आहे. शिवाजी हे शौर्य प्रेम, राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती यांचे प्रतीक आहे. टिळकांनी शिवाजी उत्सवाची सुरुवात प्रथम १५ एप्रिल १८९६ रोजी रायगडावर केली.

लोकमान्य टिळकांच्या मते शिवाजी हे अन्यायाच्या विरुध्द जुलुमाविरुध्द लढण्याचे प्रतिक आहे हे लक्षात ठेवूनच टिळकांनी शिवाजी उत्सवाला राष्ट्रीय उत्सव म्हणून साजरा करण्याचे ठरविले.

**२. गणपती उत्सव (१८९३)**

गणपती हे हिंदूचे दैवत आहे. टिळकांनी हिंदूंमध्ये एकता निर्माण करण्याच्या दृष्टीने गणेश उत्सवाला सामाजिक स्वरुप दिले. या उत्सवामध्ये जातीचा आणि श्रेष्ठ कनिष्ठतेचा विचार न करता सर्व व्यक्ती आपले दैवत म्हणून त्यात भाग घेऊ लागले. त्यामुळे हिंदू समाजामध्ये एकता निर्माण झाली. गणपती उत्सव हिंदू समाजात राजकीय जागृती निर्माण करण्यास उपयुक्त ठरेल. या उत्सवांमध्ये भारतीय जनता आकर्षित झाली आणि मोठ्या उत्साहाने

त्यात भाग घेऊ लागली. टिळकांच्या मते भारतीय जनतेत जागृती निर्माण करण्यासाठी गणपती उत्सवासारखे सण साजरे करणे आवश्यक आहे. गण्पती उत्सवामध्ये सर्वच जाती धर्माचे लोक भाग घेऊ शकत असल्यामुळे एकात्मता निर्माण करण्यास असे उत्सव फार उपयुक्त ठरतात असे टिळकांचे राष्ट्रमत होते.

शिवजयंती आणि गणेशोत्सव सार्वजनिकरित्या साजरे करुन त्यामार्फत लोकांना संघटीत करावयाचे आणि त्यांच्यात प्रेम निर्माण करावयाचे असा टिळकांचा मुख्य उद्देश होता. टिळकांच्या या विचारांवर मवाळ पंथियांनी टिका केली. मात्र टिळकांनी आपले कार्य सुरुच ठेवले. टिळकांनी भारतीय समाजात एकात्मता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. हिंदू मुस्लीमांमध्ये सामंजस्य निर्माण केले. समाजातील जातीभेद नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

**परीक्षण / टिका :**

लोकमान्य टिळकांनी राष्ट्रीयत्वाबाबत जे विचार व्यक्त केलेले आहेत ते कोणालाही मान्य होण्यासारखे आहेत. भारतीयांमध्ये एकात्मता निर्माण करण्यासाठी टिळकांनी प्रयत्न केला. गणपती उत्सव व शिवजयंतीमुळे समाजात जागृती निर्माण हाऊन एकात्मतेची भावना रुढ झाली. पण तरीदेखील त्यांच्या विचारांवर खालीलप्रमाणे टिका करण्यात आल्या आहेत.

१. लोकमान्य टिळकांनी सुरु केलेल्या गणेशोत्सव आणि शिवजयंती म्हणजे मुसलमानविरोधी आहे आणि त्यांना त्रास देण्याचा हेतू आहे अशी टीका करण्यात आली.
२. टिळकांच्या धर्मभावनेमुळे हिंदू-मुसलमानामध्ये फुट पडली.
३. टिळकांनी सुरु केलेले शिवाजी उत्सव म्हणजे हिंदूंना मुसलमानांविरोधी भडकविण्याचे एक साधन आहे.

**टिकेचे खंडण :**

१. लोकमान्य टिळकांनी सांगितले की, शिवजयंती म्हणजे हिंदूंना मुसलमानांविरुध्द भडकवण्याचे साधन नव्हे उलट शिवाजी हे मुसलमांनांच्या भावनांचा आदर करीत असत. शिवाजी महाराजांच्या साथीदारांमध्ये असे अनेक मुसलमान होते की त्यांनी मोगलांविरुध्द शिवाजींना मदत केली होती.

२. शिवाजी उत्सवाचा उद्देश मुसलमानांना त्रास देण्याचा नाही. वास्तवतः परकीय राजवटीत हिंदू-मुसलमान वाईट दशेत जीवन जगत होते. अशा स्थितीत शिवचरीत्रापासून दोन्ही धर्मीयांनी सारखीच प्रेरणा घेतली पाहिजे. शिवाजी हे विशिष्ट धर्माचे प्रतीक नसून अन्याय, अत्याचार याविरुध्दचे प्रतिक आहेत.

३. सन १९१६ च्या लखनौ काँग्रेस अधिवेशनात टिळकांनी मुसलमान बांधवांची जास्त सोय केली. त्यांच्यासाठी स्वतंत्र मतदारसंघ टिळकांनी मागितला. त्यामुळे कायदेमंडळात मुस्लीमांचे प्रतिनिधी वाढणार होते.

४. बॅरीस्टर महंमद अली जिना आणि अन्सारी या नेत्यांनी टिळकांच्या धोरणांची प्रशंसा केली होती.

**लोकमान्य टिळकांच्या चतुःसुत्री कार्यक्रमाची रुपरेषा**

लोकमान्य टिळकांची चतुःसुत्री कार्यक्रमाची रुपरेषा त्यांनी आपल्या राष्ट्रीय कार्यक्रमात स्पष्ट केली आहे. भारतातील काँग्रेसमधील काही नेमस्त/मवाळ नेत्यांचा ब्रिटीश सत्तेवर विश्वास होता. ईश्वराच्या कृपेमुळे ब्रिटीश राज्यकर्ते भारताला लाभले आहेत अशी त्यांची धारणा होती. मात्र ब्रिटीशांनी भारतीय जनतेचे शोषण केले होते. स्वतःची सत्ता स्थिर रहावी यासाठी ब्रिटीश राज्यकर्त्यांनी भारतीय समाजात फुट पाडण्याचा प्रयत्न केला. सन १९०५ मध्ये लॉर्ड कर्झन याने बंगालची फाळणी केली. त्यामुळे भारतीय जनतेत संतापाची लाट निर्माण झाली. फाळणी रद्द करण्याची मागणी लॉर्ड कझ्र्निकडे लोकांनी केली. ती मागणी कर्झनने फेटाळून लावली आणि भारतीय जनतेला सांगितले की, बंगालची फाळणी काळ्या दगडावरची रेषा आहे. कर्झनने आपले संपूर्ण आयुष्य आणि बुध्दी भारतीयांना गुलामगिरीत ठेवण्यात खर्ची घातली. या अशा परिस्थितीत मवाळ विचारसरणीचा पराभव झाला. राष्ट्रीय आंदोलन तीव्र करणे असे टिळकांनी भारतीय जनतेला सांगितले. तसेच १९०६ च्या कलकत्ता येथील काँग्रेस अधिवेशनात दादाभाई नौरोजींनी स्वराज्य हे भारताचे उद्दीष्ट आहे असे जाहिर केले. लोकमानय टिळकांच्या चतुःसुत्री कार्यक्रमाचा कलकत्याच्या राष्ट्रीय सभेने पुरस्कार केला. लोकमान्य टिळकांचा चतुःसुत्री कार्यक्रम पुढील प्रमाणे -

१) स्वदेशी

२) बहिष्कार

३) राष्ट्रीय शिक्षण

४) स्वराज्य

अ) राजकीय आशय

ब) नैतिक व अध्यात्मिक आशय

**१. स्वदेशी :**

लोकमान्य टिळकांनी राष्ट्रीय आंदोलनाची ज्योत स्वदेशीच्या सहाय्याने पेटविण्याचा प्रयत्न केला. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाला आर्थिक संदर्भ होता. दादाभाई नौरोजींनी भारतीय जनतेचे कसे शोषण होत आहे हे त्यांनी आपल्य आर्थिक शोषण सिध्दांतातून स्पष्ट केले आहे. टिळकांच्या मते आपल्या देशातील मालावर सरकार कर बसविते. त्यामुळे ब्रिटनचा खूप फायदा होत असे. भारतातून कच्चा माल ब्रिटनमध्ये आणि ब्रिटीश मधुन पक्का माल भारतामध्ये येऊ लागला. व्यापारी म्हणून आलेले राज्यकर्ते बनले. त्यांनी केवळ स्वतःचा स्वार्थ पाहिला. त्यांच्या राजकीय आणि अर्थ नितीमुळे भारतीयांचे उद्योगधंदे बुडाले. शेतीवर मोठ्या प्रमाणावर भार पडला. लोकांच्या दारिद्रयात मोठ्या प्रमाणात वाढ झाली.

लोकमान्य टिळकांनी भारतीय जनतेला अन्यायाविरुध्द लढण्याचा उपदेश केला. त्यासाठी स्वदेशीचा अवलंब करावा. स्वदेशी चळवळीचा मुख्य उद्देश स्वदेशी वस्तुंना आणि उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देण्याचा होता. टिळकांच्या मते भारतातील सुरक्षित वर्गाची जबाबदारी फार महत्वाची आहे. कारण भारतातील बहुसंख्य जनता ही गरीब अवस्थेत जीवन जगत आहेत. परकीय कपडे ते वापरु शकत नाही. उच्च व शिक्षित वर्गाने मनावर घेऊन स्वदेशी कापड वापरावयास सुरुवात करावी. त्यामुळे भारतातील उद्योगधंद्यांना चालना मिळेल. काही उच्च लोकांनी टिळकांच्या स्वदेशी धोरणावर टिका केली. त्यावेळी टिळकांनी स्पष्ट करुन सांगितले की, भारतातील सर्व लोकांना पुरेसा होईल इतका कापड तयार होत नसला तरी स्वदेशीची चळवळ सुरुच ठेवावी. भारतीय जनतेने आपल्या देशातील उद्योगधंदे वाचविण्यासाठी स्वदेशी मालाची मागणी करावी.

काही शिकलेल्या लोकांनी असे सांगितले की विदेशी कपडे वापरण्यात काटकसर आहे आणि स्वदेशी वापरण्यात गिऱ्हाईकाचे नुकसान आहे. तेव्हा टिळकांनी त्यांना चोख उत्तर दिलेले आहे. त्यांच्या मते स्वदेशी वस्तुंचा वापर केल्यामुळे आपल्या देशातील पैसा आपल्याच देशात राहणार आहे. त्यामुळे आपल्या देशात भांडवलाची निर्मिती होईल आणि त्यातूनच औद्योगिक विकास साधला जाईल. खेड्यापाड्यातील बहुतेक लोकांना काम मिळणार होते. तसेच स्वदेशी वस्तू वापरण्यात त्यागाची भावना असावी. स्वदेशी वस्तु जरी महाग असल्या तरी त्यांचीच मागणी भारतीय लोकांनी करावी. त्यामुळे राष्ट्राचे नुकसान होत नाही. उदा. चार कोटींचा परकीय माल आपल्या देशाने आयात केला तर ते चार कोटी रुपये आपल्या देशातून परराष्ट्रात जातील. याउलट पाच कोटी रुपयांचा स्वदेशी माल घेतला तर तो संपूर्ण पैसा आपल्याच देशात राहील आणि त्यातून उद्योगधंद्यांची निर्मिती होऊ शकेल. उद्योगधंद्यांची निर्मिती झाल्यामुळे भारतातील सुशिक्षीत बेरोजगारांना कामधंदा मिळू शकेल आणि शेतीवरचा भार कमी होण्यास मदत होऊ शकेल.

**२. बहिष्कार :**

स्वदेशीला पुरक अशी ही एक चळवळ आहे त्याचे मुख्य सुत्र म्हणजे स्वदेशी वस्तुंचा वापर करुन त्याचबरोबर परकीय मालावर बहिष्कार टाकला पाहिजे. टिळकांच्या मते जेव्हा राज्य आणि जनता यांच्यात संघर्ष सुरु होतो तेव्हा परकीय मालावर बहिष्कार टाकणे आवश्यक असते. बहिष्कारामुळे भारतातून परदेशात जाणारे लाखो रुपये आपण वाचवू शकतो. त्यासाठी टिळकांनी चीनी जनतेचे उदाहरण दिले आहे. अमेरीकन वस्तुंवर चीनी जनतेने बहिष्कार टाकल्यामुळे अमेरीकेची अर्थव्यवस्था कमकुवत झाली होती. राष्ट्रीय बहिष्कार ही एक राजकीय चळवळ सुध्दा आहे. या चळवळीमार्फत आपण ब्रिटीशांना आर्थिक कोंडीत आणू शकतो. बहिष्काराचा वापर करतांना भारतीय जनतेमध्ये जागृती निर्माण केली पाहिजे. बहिष्कारामुळे प्रामुख्याने दोन फायदे होत असतात. १) परकीय मालावर बहिष्कार टाकल्यामुळे परकीयांची अर्थव्यवस्था कमकुवत होत असते. २) देशी वस्तुंचे उत्पादन वाढून अनेक बिकट समस्या सुटतात. राष्ट्रीय बहिष्कार हा केवळ परकीय मालाचा वापर न

करण्यापूर्वी मर्यादित नव्हता तर शासनाच्या न्यायव्यवस्था, शासकीय कुचेष्टा इ. वर देखील बहिष्कार टाकला पाहिजे.

**३. राष्ट्रीय शिक्षण :**

लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्य प्राप्तीसाठी तीसरे जे साधन सांगितलेले आहे ते म्हणजे राष्ट्रीय शिक्षण होय. इंग्रजी सत्तेने सुरु केलेली शिक्षण पध्दती भारतीय जनतेत राष्ट्रीयत्वाची भावना कधीच निर्माण करु शकत नाही. म्हणून त्यांनी राष्ट्रीय शिक्षण देणे आवश्यक आहे. टिळकांच्या मते भारतीय जनतेने स्वतःच्या विचारांनी सुध्दा स्वदेशी झाले पाहिजे. ब्रिटीशांनी स्वतःच्या स्वार्थासाठी जी शिक्षण पध्दती सुरु केली त्यामुळे भारतीय जनतेत राष्ट्रीय जागृती निर्माण होत नव्हती. शिक्षणाचा दर्जा खालावलेला होता. त्यामुळे कोणत्याही प्रकारचे राष्ट्रहित व राष्ट्र उन्नतीचे तत्व शिक्षण संस्थांकडून शिकविली जात नव्हती. शाळा, महाविद्यालयातून देशाची संस्कृती, देशभती, देशप्रेम बंधुभाव इत्यादी प्रकारचे शिक्षण दिले जात नव्हते.

लोकमान्य टिळकांच्या मते भारतातील तरुण पिढीला देशाचे सामाजिक, औद्योगिक आणि राजकीय वैभव कशाप्रकारे वाढेल आणि सुरक्षित राहील अशा प्रकारचे राष्ट्रीय शिक्षण दिले पाहिजे. तसेच विज्ञान, उद्योगधंदे आणि हस्तव्यवसाय यांचाही समावेश असला पाहिजे. कारण त्यामुळे शाळा कॉलेजमधून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांनी आत्मसात केलेल्या ज्ञानानुसार तो स्वतःची उपजीवीका पूर्ण करण्यासाठी स्वतःचा व्यवसाय करु शकेल. स्वतःच्या पायावर तो उभा राहू शकेल. अशा शिक्षणामुळे त्या विद्यार्थ्यांना नोकरीसाठी सरकार पुढे भीक मागावी लागणार नाही. ब्रिटीशांच्या शिक्षण पध्दतीतून शाळा, कॉलेज आणि विद्यापीठातून कारकूनी आणि कनिष्ठ दर्जाचे अधिकारी बाहेर पडत होते. विद्यापीठ बी.ए. आणि एम.ए. चे शिक्का मारणारे टपाल खाते झाले होते. हे कारकून अधिकारी तसेच शिक्षक हे देखील ब्रिटीशांच्या ताटाखालील मांजर झाले. या शिक्षण पध्दतीतून पाश्चात्य संस्कृतीबद्दल भारतीय जनतेत आदराची भावना निर्माण करणे आणि भारतीय संस्कृतीबद्दल तिरस्कार वाटणे असे चालले होते.

भारतीय जनतेत स्वतःचा आत्मविश्वास आणि देशाभिमान जागृत करण्यासाठी राष्ट्रीय शिक्षण देणे जरुरीचे आहे. राष्ट्रीय शिक्षणाबरोबरच

धार्मिक शिक्षण देखील विद्यार्थ्यांना दिले पाहिजे. त्यामुळे इतर धर्माबद्दल आदराची भावना निर्माण होते. तसेच शिक्षण हे मातृभाषेत दिले जोव, परकीय भाषा शिकविल्या गेल्या तरी हरकत नाही मात्र त्या भाषा आपल्या राष्ट्रीय शिक्षणाला पुरक असाव्यात.

**४. स्वराज्य :**

'स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे आणि तो मी मिळविणारच' हे लोकमान्य टिळकांचे राष्ट्रीय कार्यक्रमाचे मुख्य सुत्र होते. स्वराज्य याचा अर्थ केवळ स्वातंत्र्यापुरताच मर्यादित नव्हता तर त्यासाठी त्यांनी स्वराज्य आणि सुराज्य असे दोन प्रकार देखील सांगितले आहेत. स्वराज्य प्राप्त करणे हे भारतीय जनतेचे उद्दिष्ट आहे. स्वराज्याशिवाय भारताचा सर्वांगिण विकास होऊ शकत नाही.

**अ) राजकीय आशय :**

स्वराज्य म्हणजे आपले राज्य त्या आपल्या राज्यात राज्यकर्ता आणि जनता यांचे हितसंबंध सारखे असतात. तेव्हा तेथील जनतेला आपण स्वराज्यात राहत आहोत याची जाणिव होते. मात्र जेव्हा राज्यकर्ते जुलुमशाहीने, अन्यायाने राज्यकारभार करतात तेव्हा ते स्वराज्य जनतेला नकोसे वाटते. म्हणजेच स्वराज्य असुन देखील सुराज्य नसल्यामुळे जनता दुःखात जीवन जगत असते. लोकमान्य टिळकांच्या मते देशाचा राज्यकारभार जनतेनुसार किंवा त्यांनी निवडून दिलेल्या लोकप्रतिनीधीमार्फत चालत असतो आणि जनतेच्या कल्याणासाठी यंत्रणा चालते. तेव्हा ते खरे स्वराज्य असते. ज्या राज्यात जनतेच्या स्वातंत्र्याचा, सुखाचा लोप होतो तेव्हा ते राज्य इतर दृष्टीने कितीही शिस्तबध्द आणि चांगले असले तरी त्याला स्वराज्य म्हणता येत नाही.

टिळकांच्या मते ब्रिटीश राजवटीला स्वराज्य कधीच म्हणता येणार नाही. कारण राज्यकर्ते हे परधर्मीय आणि परकीय आहेत. तसेच ते स्वतःच्या राष्ट्राच्या हितासाठी राज्यकारभार करतात. भारतीय जनतेच्या सुखाचा आणि कल्याणाचा कधीच विचार केला नाही. भारतातील राज्यकारभार त्यावेळेला राज्यघटनेनुसार चालत नव्हता तर अधिकाऱ्यांच्या मर्जीनुसार चालत होता.

**आ) नैतिक व अध्यात्मिक आशय :**

टिळकांच्या मते विश्वातील प्रत्येक घटक आपल्या गुणधर्मानुसार कार्य करीत असतो. संपूर्ण विश्व ही एक व्यवस्था आहे. प्रत्येक व्यक्ती आपल्या गुणधर्मानुसार वागत असल्यामुळे या व्यवस्थेमध्ये गोंधळ, संघर्ष निर्माण होत नाही. प्रत्येक मनुष्याला धर्मनिष्ठ बनविण्यासाठी राज्यसंस्था अस्तित्वात आली. मनुष्याला राज्य नैतिक बनवित असते. प्रत्येक व्यक्तीचा गुणधर्म असतो. त्यालाच आपण स्वधर्म म्हणतो. उदा. अग्नीचा गुणधर्म उष्णता देणे, योध्दयाचा गुणधर्म युध्द करणे हा आहे. मनुष्य हा बुध्दीनिष्ठ असल्यामुळे त्याच्याकडून धर्म आचरण झाले पाहिजे. टिळकांच्या मते प्रत्येक मनुष्याच्या जीवनाचे ते उद्दिष्ट असते. नैतिक विकास झाला पाहिजे अशी त्यांची इच्छा असते. नैतिक विकासासाठी अनुकुल परिस्थिती निर्माण झाली पाहिजे. मात्र ती परकीय राज्यात निर्माण होत नाही तर त्यासाठी स्वराज्याची गरज असते. म्हणून स्वराज्य धार्मिक आणि नैतिकदृष्ट्या आवश्यक आहे. स्वराज्य ही व्यक्तीच्या नैतिक व अध्यात्मिक विकासासाठी आवश्यक आहे.

**लोकमान्य टिळकांचे ब्रिटीश राजवटीविषयी विचार :**

लोकमान्य टिळक हे जहालवादी होते. मात्र टिळकांच्या राजकीय विचारांचा आढावा घेतल्यास टिळकांचे विचार हे मवाळ विचार सरणीशी जुळणारे होते. सुरुवातीच्या काळात त्यांची अशी धारणा होती की ब्रिटीश राज्यकर्त्यांना जनतेच्या अडीअडचणींची सतत जाणिव देत राहिल्याने राज्यकारभार लोकमतानुसार चालू लागेल. कारण राज्यकारभाराचे मुळ म्हणजे ब्रिटीश संसद आहे आणि ही संसद उदारमतवादावर आधारलेली आहे. टिळकांची भूमिका सुरुवातीला मवाळवाद्यांप्रमाणे होती. आपल्या कल्याणासाठी ब्रिटीश हे राज्यकारभार करीत आहेत. भारतीय जनतेने ब्रिटीश शासनाकडे जास्त हक्कांची मागणी केल्यास राज्यकर्ते नाराज होतील असे टिळकांचे स्पष्ट मत होते.

लोकमान्य टिळकांनी ब्रिटीश राजवटीमुळे जे काही फायदे झाले आहेत त्याची त्यांनी स्तुती केली आहे. तसेच हे फायदे ब्रिटीश भारतात आल्यामुळे झाले. ब्रिटीश राजवटीमुळे जे काही फायदे झाले ते पुढीलप्रमाणे-

**फायदे :**

१. ब्रिटीशांच्या आगमनामुळे भारतात शांतता प्रस्थापित झाली.
२. कायदेशीर व्यवस्था निर्माण झाली.
३. गुन्हेगारांचा बंदोबस्त झाला.
४. आरोग्यात सुधारणा झाली.
५. शेतीव्यवसायात सुधारणा झाली.
६. खनिज संपत्तीत वाढ झाली.
७. लेखन स्वातंत्र्याची प्राप्ती झाली.
८. दळणवळणात सुधारणा झाली.

ब्रिटीश राजवटीमुळे भारतात राष्ट्रवाद जोपासण्यात मदत झाली हे टिळकांना मान्य होते. हिंदू, मुसलमान, शिख, पारशी इतर सर्व धर्माचे लोक ब्रिटीशांच्या एकछत्री अंमलाखाली आले. विविधतापूर्ण असलेल्या भारतीय समाजात ब्रिटीशांच्या एकाच वर्गात दाखल झाला. अशा प्रकारे ब्रिटीश राजवटीमुळे भारतीय जनतेचा फायदा झाला. परंतु काही कालावधीनंतर ब्रिटीशांनी भारतीय जनतेवर मोठ्या प्रमाणात अन्याय, अत्याचार करण्यास सुरुवात केली. ब्रिटीश राजवटीमुळे भारतावर काही दुष्परीणाम झालेत. म्हणून लोकमान्य टिळक ब्रिटीश राज्यकर्त्यांच्या विरोधी बनले. त्याप्रमाणे ब्रिटीश राजवटीचे फायदे टिळकांनी सांगितले तसेच त्या राजवटीमुळे भारतावर झालेले दुष्परीणाम त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहेते.

**तोटे / दुष्परिणाम :**

१. राजकीय अधोगती
२. आर्थिक अवनती
३. नैतिक अवनती
४. ब्रिटीश अधिकाऱ्यांची हुकुमशाही

**१. राजकीय अधोगती :**

टिळकांच्या मते, ब्रिटीश राजवटीत भारतीय जनतेची राजकीय अवनती झाली. राजकीय क्षेत्रात भारतीयांना ब्रिटीश अधिकाऱ्यांकडून सतत अपमानकारक वागणूक दिली जात होती. राज्यकारभार कायद्यानुसार न चालता अधिकारी वर्गाच्या मर्जीनुसार चालत होता. सरकारने भारतीयांच्या भावनांची

कदर केली नाही. लेखन स्वातंत्र्य आणि भाषण स्वातंत्र्य भारतीय जनतेला दिले. मात्र दुसरीकडून सरकारने त्यांच्यावर मर्यादा टाकल्या. ज्यांनी या स्वातंत्र्याचा वापर करण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्यावर लगेच राष्ट्रद्रोहाचे खटले भरले गेलेत.

**२. आर्थिक अवनती :**

टिळकांच्या मते ब्रिटीशांच्या आर्थिक धोरणामुळे भारतीय जनतेचे शोषण झाले होते. त्यांच्या अर्थनितीमुळे भारतीय समाज दरीद्री बनला होता. मात्र राज्यकर्त्यांना जनतेच्या दारिद्र्याबद्दल चिंता नव्हती. ब्रिटीश राज्यकर्ते स्वतःची जबाबदारी पूर्ण करु शकले नाही. टिळकांच्या मते या परिस्थितीत इंग्रजांचे राज्य हे वरदान नसून शाप आहे. एकीकडे भारतीय जनता दारीद्रयात जीवन कंठत होती तर दुसरीकडे राज्यकर्ते व्हिक्टोरीया राणीचा वाढदिवस साजरा करीत होते.

**३. नैतिक अवनती :**

भारतीय जनतेत बुध्दीकौशल्य, श्रमशक्ती आणि स्मरणशक्ती असे विविध गण आहेत असे असूनही सरकारी नोकरी मधील वरीष्ठ पदाची जागा केवळ ब्रिटीशांनाच दिल्या जातात तर कनिष्ठ श्रेणीच्या जागा भारतीयांना देऊन त्यांचा अपमान केला जातो. भारतीयांच्या अंगी जे गुण कौशल्य आहेत त्यांचे खच्चीकरण करण्याचा प्रयत्न ब्रिटीश करतात. त्यामुळे भारतीयांचे मनोधैर्य मोठ्या प्रमाणावर खचत, ढासळत आहे. जे बुध्दीमान भारतीय आहेत ते देखील नैतिक दृष्टीने घसरले आहेत. त्यांना स्वतःच्या धर्माबद्दल आणि संस्कृतीबद्दल अभिमान वाटत नव्हता. त्यांना पाश्चात्य संस्कृती श्रेष्ठ वाटते असे लोकमान्य टिळकांनी त्यावेळी सांगितले अशा प्रकारे भारतीय जनतेचे नैतिक पतन झालेले दिसते.

**४. ब्रिटीश अधिकाऱ्यांची हुकुमशाही :**

ब्रिटीश अधिकाऱ्यांची हुकुमशाही निर्माण होऊन त्याचे दुष्परीणाम भारतीय जनतेला सोसावे लागत होते. कारण हा अधिकारी वर्ग गर्विष्ठ आणि स्वार्थी हाता. तसेच सत्तेसाठी तो हपापलेला होता. ब्रिटीश अधिकारी हे चैन, विलासात जीवन जगत होते. भारतीय जनतेच्या कल्याणाकडे त्यांनी लक्ष दिले नाही.

टिळकांच्या मते ब्रिटीशांच्या न्यायबुध्दीवर अवलंबून राहून त्यांना अर्ज विनंत्या करुन भारतीय जनतेच्या समस्या सुटणार नव्हत्या. लॉर्ड कझ र्नसारख्या बुध्दीमान आणि उर्मट अधिकाऱ्याने आपली संपूर्ण बुध्दी आणि शक्ती भारतीय जनतेला गुलाम बनविण्यात खर्च केली. अनेक जुलमी कायदे त्याने मंजुर केले. ब्रिटीश राजवटीमुळे काही प्रमाणात फायदे झाले, त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात ब्रिटीश राजवटीचे दुष्परीणाम भारतीय जनतेला भोगावे लागले. ब्रिटीश शासन हे सुरुवातीला ईश्वरी वरदान वाटत होते. नंतर ब्रिटीश शासनाने भारतीय जनतेवर मोठ्या प्रमाणावर अन्याय, अत्याचार केले. त्यामुळे ब्रिटीश शासन एकप्रकारे ईश्वरी वरदान नसून शाप आहे असे वाटायला लागले. भारताच्या औद्योगिक ऱ्हासाला ब्रिटीश सरकार मोठ्या प्रमाणावर जबाबदार होते. त्यांच्या स्वार्थी धोरणामुळे भारतात बहुसंख्य जनता बेकार झाली. त्यांनी आपल्या देशात रस्ते, पुल, रेल्वे पोस्ट इ. स्वरुपाच्या सुधारणा केल्यात. त्या भारतीयांचे कल्याण होण्याच्या दृष्टीने नव्हे तर ब्रिटीश प्रशासनाला सोयीस्कर ठरतील अशा होत्या. अशा प्रकारे लोकमान्य टिळकांचे ब्रिटीश राजवटीविषयी विचार स्पष्ट करता येतील.

**लोकमान्य टिळकांचे सामाजिक विचार :**

स्वातंत्र्यपूर्व काळात राजकीय रंगमंचावर दोन गट होते. एक जहालवादी गट व दुसरा मवाळवादी गट. त्याकाळात आधी सामाजिक सुधारण अगोदर की राजकीय स्वातंत्र्य हा वाद फार गाजला होता. काँग्रेसमधील मवाळ नेत्यांनी समाज सुधारणेवर जास्तीत जास्त भर दिला. सामाजिक दोष नष्ट झ ाल्याशिवाय स्वराज्याची मागणी करणे योग्य नाही असे त्यांचे मत होते. म. गांधी, न्यायमुर्ती रानडे, आणि आगरकर यांच्या मते समाजिक सुधारणेशिवाय राजकीय परिवर्तन धोक्याचे ठरेल. सामजिक सुधारणा घडवून राजकीय अधिकारासाठी आवश्यक असलेली पात्रता संपादन करता येईल. तसेच समाज सुधारणेसाठी परकीय राजवटीच्या कायद्यानुसार त्यांची हकरत नव्हती. मात्र लोकमान्य टिळकांना या मवाळवाद्यांची भूमिका मान्य नव्हती. त्यांच्या मते समाज सुधारणा आणि राजकीय सुधारणा जर एकदम सुरु केल्या तर स्वातंत्र्यासाठी संघटीत शक्ती निर्माण होणार नाही. भारतीय समाजातील उणिवांची टिळकांना जाणिव होती. भारतीय समाजातील दोष टिळकांना माहित

होते आणि ते दोष दूर केले पाहिजेत. राजकीय सुधारणांना अग्रक्रम द्यावा की सामाजिक सुधारणांना अग्रक्रम द्याया याबद्दल मवाळ नेते आणि जहाल नेते यांच्यात मतभेद हाते. भारतीय जनतेने अगोदर राजकीय स्वातंत्र्य मिळविले पाहिजे असे जहालवाद्यांचे मत होते.

लोकमान्य टिळकांना राजकीय स्वातंत्र्य अगोदर मिळवायचे हाते आणि म्हणून लेकमान्य टिळकांचे विरोधक त्यांच्यावर टिका करु लागले की टिळक हे रुढीवाद्यांचे नेते आहेत. त्यांना सामाजिक सुधारणा मान्य नाहीत. त्यासंदर्भात पुढील मुद्यांना टिळकांनी उत्तर दिलेले नाही.

**१. शारदा सदन (पंडीता रमाबाई) :**

लोकमान्य टिळक हे स्त्री शिक्षणाच्या विरोधी होते अशी त्यांच्यावर टिका केली जात होती. याला कारण की पंडीता रमाबाईंमार्फत शारदा सदन या नावाने मुलींची शाळा चालविली जात होती लोकमान्य टिळकांनी शारदा सदनमधील शिक्षणाबाबत रमाबाईंवर टिका केली म्हणून त्यांना स्त्री शिक्षणाविरोधी म्हटले गेले. या आरोपाचे टिळकांनी खंडण केले आणि काही दिवसातच शारदा सदनमध्ये पंडीता रमाबाई स्त्री शिक्षणाच्या नावाखाली तेथील मुलींना ख्रिश्चन धर्म स्विकारण्यास भाग पाडत आहे हे पुराव्यानिशी लोकमान्य टिळकांनी केले आणि त्यानंतर टिळकांबद्दलचा चुकीचा समज नष्ट झाला.

**२. दादाजी रुख्माबाई खटला :**

रुख्माबाई विरुध्द दादाजी या खटल्यात न्यायालयाने दादाजीच्या बाजूने निकाल दिला आणि लोकमान्य टिळकांनी त्या निकालाचे स्वागत केले. कारण उच्च न्यायालयाने हिंदू कायद्याला महत्वाचे स्थान दिले होते. त्याचवेळी लोकमान्य टिळक समाज सुधारणा विरोधी आहेत अशी त्यांची गणना होऊ लागली.

**३. संमती वयाचा कायदा :**

संमती वयाच्या कायद्याच्या संदर्भात १८९१ मध्ये हे विधेयक मांडण्यात आले. त्यात बारा वर्षाखालील पत्नीबरोबर संभोग करण्यास बंदी करण्यात आली. तसेच मुलगी वयात आल्यानंतर तिची इच्छा नसतांना ती आपल्या पतीचा त्याग करु शकते. लोकमान्य टिळकांनी या कायद्याला मोठ्या प्रमाणावर विरोध केला. त्यासाठी त्यांनी जन आंदोलन केली. खरे पाहता

टिळकांचा या विधेयकाला विरोध नव्हता. परंतु हिंदू धर्मात ब्रिटीशांचा होत असलेला हस्तक्षेप त्यांना मान्य नव्हता. राजकीय सत्ता प्राप्त केल्यानंतर हिंदूंनी स्वत: कायद्यात सुधारणा करावी. लोकमान्य टिळकांना समाज विरोधी म्हटले गेले. परंतु त्याचबरोबर टिळकांनी समाज सुधारकांसमोर आणि भारतीय जनतेसमोर नविन प्रस्ताव मांडले. त्या प्रस्तावातील घटक पुढीलप्रमाणे -

१. मुलीचा विवाह अठरा वर्षापूर्वी करु नये.
२. एकविस वर्ष पूर्ण झाल्यानंतर मुलांचे विवाह करावेत.
३. चाळीस वर्ष पूर्ण झालेल्या व्यक्तीने नंतर विवाह करु नये.
४. चाळीस वर्षानंतरच्या व्यक्तीला विवाह करावयाचा असेल तर त्याने विधवेशी विवाह करावा.
५. हुंडा पध्दत बंद झाली पाहिजे.
६. विधवा स्त्रियांचे केशवपन करण्यात येऊ नये.

या सर्व वरील बाबींचा विचार केला तर लोकमान्य टिळकांना समाज सुधारणाविरोधी म्हणता येणार नाही. ज्या लोकांनी टिळकांना समाजविरोधी म्हटले त्यांनी टिळकांच्या वरील प्रस्तावाचे समर्थन केले नाही उलट विरोध केला होता.

लोकमान्य टिळकांनी समाज सुधारणेबाबतची विशिष्ट मते खालीलप्रमाणे आहेत

**१. राजकीय स्वातंत्र्य :**

लोकमान्य टिळकांनी समाज सुधारणेच्या संदर्भात सर्वात महत्वाचा मुद्दा सांगितला तो म्हणजे राजकीय स्वातंत्र्याचा होय. राजकीय स्वातंत्र्य मिळविण्यापूर्वी समाजसुधारणा करण्याचा प्रयत्न केला तर या अखंड समाजाचे विभाजन होईल आणि त्यामुळे राजकीय स्वातंत्र्याचा आपला हेतू साध्य होणार नाही. टिळकांच्या मते आपल्या देशातील समाज सुधारकांना दोन अत्यंत अवघड किल्ले जिंकावयाचे आहेत ते म्हणजे १) राजकीय स्वातंत्र्याचा आणि

**२) सामाजिक स्वातंत्र्याचा**

यातील पहिला किल्ला घेणे सोपे आहे तर दुसरा किल्ला घेणे कष्टदायक आहे. राजकीय स्वातत्र्य प्रथम मिळवावे नंतर आपोआपच सामाजिक सुधारणा घडवून आणता येतील. यासाठी लोकमान्य टिळकांनी

आणि सिलोन आणि ब्रम्हदेश इ. देशांचे उदाहरण दिले आहे. पण बऱ्याच काळापर्यंत ह देश राजकियदृष्ट्या मागासलेले होते.

**२. लोकमत :**

समाज सुधारणा करण्यासाठी सर्वप्रथम लोकमत तयार करावे लागते. केवळ कायद्याच्या जोरावर समाज सुधारणा होऊ शकत नाही. समाज सुधारण्याच्या कार्यक्रमात लोकांना बरोबर घेऊन सुधारणा कराव्या लागतात. समाज सुधारणा घराघरातून झाली पाहिजे. आजचे समाजसुधारक केवळ भाषणबाजी करतात तर त्यांनी कृतीशिल बनले पाहिजे. लोकमान्य टिळक म्हणतात की समाजसुधारकाने अगोदर स्वतःमध्ये सुधारणा करावी आणि नंतर जनतेला उपदेश करावा.

**३. संस्कृतीची जपणूक :**

समाजसुधारणा करण्यासाठी आपल्या देशाची संस्कृती सोडून परकीय विचारांचे अनुकरण करु नये. पाश्चिमात्य संस्कृतीबद्दल जास्त श्रध्दा ठेवून त्यानुसार समाजसुधारणा करण्याचा तसा प्रयत्न केला तर भारत राष्ट्र म्हणून जगू शकणार नाही.

**४. परिस्थितीचा विचार :**

टिळकांच्या मते समाजसुधारणा ह्या देशाला अनुकुल असलेल्या काळानुसार, परिस्थितीनुसार केल्या पाहिजेत. समाजाची इच्छा आणि व्यक्तींची ईच्छा यांच्यात योग्य तो समन्वय साधला पाहिजे.

**५. लोकशिक्षण :**

समाजसुधारणेसाठी लोकशिक्षणाची गरज असते. शिक्षणामुळे लोकांवर चांगले संस्कार घडत असतात आणि त्यातूनच चांगल्या संस्कृतीचा उदय होत असतो. शिक्षणामुळे समाजातील अनिष्ठ रुढी, प्रथा, परंपरा नष्ट होऊ शकतात. कायद्यामार्फत सुधारणा करण्याचे ठरविले तर दोन गट निर्माण होत असतात. i) कायद्याला पाठींबा देणारे, ii) कायद्याला विरोध करणारे. म्हणूनच लोक शिक्षणाद्वारे सुधारणा कराव्यात.

**६. धर्माविषयी आदर :**

त्यांना समाजसुधारणेच्या सुचना / आदेश करण्याचा अधिकार दिला जावा. ब्रिटीश राज्यकर्त्यांना आपल्या समाज सुधारणेत हस्तक्षेप करु देऊ नये

कारण की अगोदरच त्यांनी आर्थिक आणि राजकीय क्षेत्र काबीज केले आहे. धार्मिक व सामाजिक क्षेत्रात त्यांचा हस्तक्षेप भारताच्या दृष्टीने अयोग्य आहे.

**७. श्रमविभाजन :**

समाज सुधारणेसाठी श्रमविभाजन तत्वाचा अवलंब केला पाहिजे. काहींनी स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन द्यावे तर काहींनी बालविवाहविरोधी चळवळीत संघर्ष भाग घेतला पाहिजेतर काही लोकांनी जातीभेद नष्ट करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

अशाप्रकारे लोकमान्य टिळकांनी समाज सुधारणेच्या अंतर्गत महत्वपूर्ण विचार मांडलेले आहेत.

**१) प्रतियोगी/ सहकारीता :**

१९९१ मध्ये मॉन्टेस्क्यू चेम्सफर्ड या घोषणेद्वारे ब्रिटीश सरकारने भारतीय लोकांना असे आवाहन केले की, इंग्रज सरकार भारतीय लोकांसाठी टप्प्या-टप्प्याने प्रत्येक क्षेत्रात सुधारणा करणार आहे. म्हणून भारतीय जनतेने इंग्रज प्रशासनाला सहकार्य करावे. ब्रिटीशांच्या या सुधारणावादी धोरणाविषयी भारतीय नेत्यांमध्ये मोठे मतभेद निर्माण झाले. मवाळ नेत्यांनी इंग्रजांच्या धोरणाला प्रतिसाद दिला आणि त्यांनी या सामाजिक सुधारणांना बिनशर्त पाठींबा दिला आणि भारतीय जनतेने देखील इंग्रजांना सहकार्य करावे असे आवाहन म. गांधी, आगरकर यांनी केले. मवाळ पंथीय नेते या सुधारणांना मॅग्नाचार्य असे म्हणू लागले. या नेमसत नेत्यांचा इंग्रजांच्या न्यायबुध्दीवर आणि उदारमतवादावर विश्वास होता. इंग्रज प्रशासनाला संपूर्ण सहकार्य करण्याचे त्यांनी जाहिर केले. या मवाळ पंथीयांच्या विरोधी दुसऱ्या बाजुला एक जहाल पंथीयांचा गट होता. त्यात प्रामुख्याने लोकमान्य टिळक, चित्तरंजन दास गुप्ता यांचा समावेश होता. त्यांच्या मते ब्रिटीशांनी भारतीय जनतेसमोर ठेवलेल्या सुधारणांचा पूर्णपणे धिक्कार करावा. मवाळ पंथीयांचा दृष्टीकोन त्यांना मान्य नव्हता. जहाल आणि मवाळ यांच्यात संघर्ष निर्माण झाले. तीव्र मतभेद निर्माण झाले. अशा या बिकट परिस्थितीत लोकमान्य टिळकांनी मधला मार्ग काढला. लोकमान्य टिळकांच्या मते इंग्रजांनी भारतीय जनतेसमोर ज्या सुधारणा ठेवल्या आहेत त्यांचा स्विकार करावा आणि त्यांच्याकडून जास्त सुधारणा प्राप्त करण्याचा प्रयत्न करावा तसेच सरकारला बिनशर्त सहकार्य न करता

प्रतियोगिक सहकार्य करावे याचा अर्थ ब्रिटीश सरकार जेवढ्या प्रमाणात उदार बुध्दीने आणि न्याय बुध्दीने भारतीय जनतेसाठी सुधारणांच्या घोषणा करत तेवढ्या प्रमाणात भारतीय जनतेने ब्रिटीशांना सहकार्य करावे अशा प्रकारे या सुत्राला प्रतियोगीता सहकारीत असे नाव देण्यात आले.

लोकमान्य टिळकांच्या मते इंग्रजांनी जाहिर केलेल्या सुधारणा पदरात पाडून घ्याव्यात. त्यांना विरोध करु नये. मात्र तेवढ्यावरच जनतेने समाधान मानू नये. पुढे जेव्हा आपल्या मागण्यांच्या संदर्भात इंग्रजांनी सहकार्य केले नाही तर तेव्हा जनतेने देखील असहकाराचे धोरण स्विकारले. टिळकांच्यामते ब्रिटीशांचे यश भारतीय जनतेच्या सहकार्यावरच अवलंबून आहे. जनतेने जर त्यंच्याशी असहकार केला तर इंग्रजांना त्यांचा राज्यकारभार योग्यरित्या करता येणार नाही आणि त्यांना जास्त सुधारणा कराव्या लागतील. इंग्रज ससरकार सुधारणेची जेवढी पाऊले उचलतील तेवढीच सहकार्यांची पावले उचलावीत. टिळकांच्या मते भारतीय जनता निशस्त्र आहे. परंतु शस्त्राशिवाय त्यांची अडणार नाही. कारण बहीष्कार आणि असहकार ही दोन साधने जनतेच्या हक्काची आहेत अशा प्रकारे ले ाकमान्य टिळकांच्या सुधारणा विषयींचा मधला मार्ग म. गांधींना मान्य झाला.

वास्तविक पाहता भारतीय जनतेसाठी सुधारणांचा जो ठराव ठेवण्यात आला त्यात सुधारणा ह्या अपुऱ्या, असमाधानकारक होत्या. तरीदेखील भारतीय जनतेचा अमंलबावणीसाठी पूर्ण सहकार्य करावे कारण लवकरात लवकर स्वराज्य आणण्याचा तो एक मार्ग होता. लोकमान्य टिळक म्हणतात आपल्याला स्वातंत्र्य हवे आहे आणि ते आपण मिळवू शकतो. परंतु स्वतंत्र होण्याची आपणाजवळ इच्छा नसेल तर आपण कायमचेच पारतंत्र्यात राहु. टिळकांचे प्रतियोगीता सहकार्याचे तत्व आणि स्वराज्याचा कार्यक्रम संयुक्ती आहे. टिळक म्हणतात की आवश्यक असेल तेथेच सहकार्य करावे हे प्रतियोगी सहकार्याचे धोरण अत्यंत प्रभावी होते.

**होमरुल लीग / चळवळ :**

स्वराज्याशिवाय व्यक्तीविकास अशक्य आहे. टिळकांच्या मते भारताला जर स्वातंत्र्य मिळाले नाही तर भारताचा औद्योगिक, सामाजिक, शैक्षणिक विकास घडवून आणणे अशक्य आहे. टिळक म्हणतात आम्हाला

स्वराज्य पाहिजे. आमचे स्वतःचे सरकार असले पाहिजे. टिळकांच्या मते भारतीय जनतेवर जे राज्य करीत आहेत ते परकीय आणि परम धर्मीय आहेत. भारतातील राज्यकारभार ब्रिटीश संसदेला जबाबदार आहे. ते भारतीय जनतेने निर्माण केलेले नसल्याने भारतीय जनतेला जबाबदार राहत नाही.

"इंग्रजांना त्यांच्या देशात जसे मानाचे स्थान आहे तसेच स्थान भारतीय जनतेला भारतात मिळाले पाहिजे, स्वराज्यासाठी भारतीय जनतेत जनमत संघटीत केले पाहिजे. तसेच एका नविन संस्थेची स्थापना केली पाहिजे आणि लोकमान्य टिळकांनी १९१६ मध्ये होमरुल लीगची स्थापना केली. त्यानंतर टिळकांच्या प्रभावामुळे होमरुल चळवळ यशस्वीरित्या कार्य करु लागली. टिळकांच्या आशिर्वादाने काही राष्ट्रवादी लोकांनी बेळगाव येथे होमरुल लीगची स्थापना केली.

होमरुल लीगची स्थापना झाल्याने लगेच स्वराज्य मिळणे शक्य नव्हते. टिळकांच्या मते या संस्थेच्या शाखा इतर राज्यात स्थापन करुन या संस्थेची सदस्य संख्या बनविणे हे महत्वाचे कार्य आहे ही संपूर्ण जबाबदारी लोकमान्य टिळकांवर येऊन पडली. होमरुल लीग सारख्या संस्था स्वराज्य प्राप्त करण्यासाठी स्थापन करणे आवश्यक आहे. होमरुल चळवळ या संस्थेला लोकप्रिय करण्यासाठी लोकमान्य टिळकांनी निरनिराळ्या भागांचा दौरा केला. प्रत्येक व्यक्तीला त्यांनी स्वराज्याची कल्पना समजावून सांगितली. लोकमान्य टिळकांना जनतेकडून भरपूर प्रतिसाद मिळाला.

बेळगाव व अहमदाबाद येथे टिळकांनी केलेल्या भाषणामुळे टिळकांनी जनतेला सरकारविरुध्द कार्य करण्यास प्रोत्साहन दिले असा आरोप ब्रिटीश सरकारने टिळकांवर लावला. त्यांच्याविरुध्द न्यायालयात खटला दाखल करण्यात आला. परंतू न्यायालयाने लोकमान्य टिळकांच्या बाजुने निर्णय दिला. त्यानंतर होमरुल लीग आंदोलनाचा सतत विकास होत गेला. याच काळात श्रीमती ॲनी बेझंट यांच्या अध्यक्षतेखाली मद्रास येथे होमरुल लीगची स्थापना करण्यात आली. होमरुल लीगचा मुख्य हेतू स्वराज्याची मागणी लोकप्रिय करणे आणि तिला जनतेचा पाठींबा मिळवून देणे हा होता. टिळक म्हणतात स्वराज्यातच व्यक्ती विकास सामाजिक सुधारणा औद्योगिक प्रगती आणि राष्ट्रीय शिक्षण शक्य आहे.

## प्रकरण ५

# महात्मा गांधी

**जीवन परिचय :**

महात्मा गांधी यांचा जन्म गुजरातमधील पोरबंदर येथे २ ऑक्टो. १८६९ मध्ये झाला. १८८७ मध्ये ते मॅट्रीकची परीक्ष पास झाले आणि पुढील शिक्षणासाठी ते इंग्लंडला गेले. १८९१ मध्ये त्यांनी बॅरीस्टर ही पदवी बहाल केली. १८९४ ते १९१५ पर्यंत गांधीजींनी अहिंसा व सत्याग्रहाच्या मार्गाने ब्रिटीशांविरुध्द लढा सुरु केला. १८९४ ते १९१५ पर्यंत गांधीजींनी अहिंसा व सत्याग्रहाच्या मार्गाने ब्रिटीशांविरुध्द लढा सुरु केला. १९२० मध्ये लोकमान्य टिळकांचा मृत्यु झाला. टिळकांचा मृत्यु भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील महत्वाची घटना होती. टिळकांच्या मृत्युनंतर काँग्रेसचे नेतृत्व म. गं ाधींकडे आले. १९२० ते १९४८ चा कालखंड म्हणजे भारतातील गांधीयुग होय. १९२० ते १९३३ या काळात गांधीजींनी दांडी यात्रा आणि कायदेभंग चळवळ सुरु केली. १९४२ मध्ये गांधीजींनी 'छोडो भारत' ही चळवळ सुरु केली. अशा या थोर महात्म्याची ३० जानेवारी १९४८ रोजी हिंसक प्रवृत्तीने हत्या करण्यात आली.

**महात्मा गांधी यांचे सत्य व अहिंसा याविषयी विचार :**

महात्मा गांधीवर बौध्द धर्म आणि जैन धर्म याचा प्रभाव पडलेला होता. त्यातूनच त्यांनी सत्य आणि अहिंसेचे विचार प्रकट केले. गांधीजींच्या सर्वविचारांचा आधार सत्य हे तत्व आहे. सत्याशिवाय कोणतेही तत्व पुर्ण होऊ शकत नाही. महात्मा गांधींनी सत्याचे दोन प्रकार सांगितले आहेत.

**१. सापेक्ष सत्य :**

विशिष्ट परिस्थितीत एक विशिष्ट गोष्ट सत्य आहे असे जेव्हा वाटते तेव्हा तिला सापेक्ष सत्य असे म्हणतात. व्यक्तीपरत्वे आणि परिस्थिती प्रमाणे सापेक्ष सत्याची कल्पना बदलू शकते. उदा. सुखाची कल्पना ही सापेक्ष सत्यामध्ये येते.

**२. निरपेक्ष सत्य :**

जीवनातील निरनिराळ्या अनुभवावरुन सापेक्ष सत्याच्या सहाय्याने व्यक्ती निरपेक्ष सत्याकडे जात असते. अशा सत्याकडे पोहोचण्यासाठी व्यक्तीचे मनोबल / नैतिकता / त्यागी प्रवृत्ती पूर्णपणे असावी लागते. अशा प्रकरचे सत्य हे शाश्वत स्वरुपाचे असते. सार्वभौम असते. सापेक्ष सत्याच्या कल्पनेमुळे व्यक्तीकडुन काही चुका होण्याचा संभव असतो. त्या लक्षात येताच व्यक्तीने त्या मान्य केल्या पाहिजेत.

**३. अहिंसा : व्याख्या**

कोणत्याही व्यक्तीला शारिरीक आणि मानसिक ताण न देणे म्हणजे अहिंसा होय किंवा शरीर आणि मन यावर आघात न करणे म्हणजे अहिंसा होय.

सत्याप्रमाणेच गांधीजींनी आपल्या राजकीय तत्वज्ञानात अहिंसेचा विचार केलेला आहे. सत्य आणि अहिंसा ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. अहिंसेच्या मार्गाशिवाय सत्य प्राप्त होणे कठीण आहे. सत्य आणि अहिंसा एकमेकांपासून अलग करणे कठीण आहे. सत्य म्हणजे परमेश्वर आणि त्या परमेश्वराचा शोध अहिंसा या मार्गाने होऊ शकतो. सत्यापासू दूर जाणे म्हणजे परमेश्वरापासून दूर जाणे.

- **अहिंसेचे प्रकार :**
  १. नकारात्मक अहिंसा
  २. विधायक अहिंसा
  ३. निरपेक्ष अहिंसा
  ४. विरपुरुषांची अहिंसा
  ५. दुर्बल व्यक्तींची अहिंसा
  ६. भित्र्या व्यक्तींची अहिंसा

**१. नकारात्मक अहिंसा :**

कोणत्याही प्रकारची हिंसा न करणे, आपले विचार, आपली कृती, आपले मन याद्वारे इतरांना त्रास न देणे म्हणजे नकारात्मक अहिंसा होय. या अहिंसेत हत्या न करणे, अपमान न करणे इ. चा समावेश होतो. परंतु गांधीजींनी या अहिंसेच्या बाबतीत एक अपवाद सांगितलेला आहे. एखादी

व्यक्ती एखाद्या रोगाने त्रस्त असेल तर सर्व प्रकारचे उपचार करुन तिचा रोग बरा होत नसेल तर अशा वेळेस त्या व्यक्तीस विष देऊन मारणे अहिंसेच्या विरोधी नाही. कारण अशा कृतीमुळे त्या रोग्याच्या आत्म्याला मुक्ती मिळत असते. म्हणून गांधीजींनी अपवाद म्हणूनच प्रयोग सांगितलेला आहे.

**२. विधायक अहिंसा :**

गांधीजींच्या मते ही खऱ्या अर्थाची अहिंसा होय. या प्रकारात दुसऱ्या व्यक्तीला त्रास न देणे, अपमान न करणे यांचा समावेश होत नसून तर स्वतः त्रास सहन करुन, कष्ट सहन करुन इतरांवर जो अन्याय होत आहे त्या अन्यायाचे निवारण करण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न करणे म्हणजे विधायक अहिंसा होय. उदा. समाजातील दुर्बल घटकांवर तसेच स्त्रीया आणि मुले इ. वर बलवान घटक अन्याय करीत असेल तर अशा दुर्बल घटकांच्या मदतीला धाऊन गेले पाहिजे तरच खऱ्या अर्थाने विधायक अहिंसा झाली असे समजावे.

**३. निरपेक्ष अहिंसा :**

निरपेक्ष अहिंसा ही सर्वात श्रेष्ठ दर्जाची अहिंसा होय. अशा प्रकारच्या अहिंसेला राग, द्वेष, क्रोध व स्वार्थ इ. ची भावना नसते. तिरस्कारयुक्त भावना असेल, स्वार्थी प्रवृत्ती असेल, मी पणा असेल तर त्या गोष्टी निरपेक्ष अहिंसेत बसू शकत नाही.

**४. वीरपुरुषांची अहिंसा :**

वीरपुरुषांच्या अहिंसेला म. गांधींनी जास्त महत्व दिलेले आहे. कारण वीरपुरुषांच्या मनाच्या नैतिकतेमुळे आत्मबलामुळे हिंसा करण्याची शक्ती असतांना देखील त्यांनी अहिंसा या तत्वांचा स्विकार केलेला असतो. असे अहिंसाधारक वीर पुरुष खऱ्या अर्थाने राजकारणाला विधायक असे वळण देऊ शकतात असे त्यांचे मत होते.

**५. दुर्बल व्यक्तींची अहिंसा :**

काही क्षेत्रात व्यक्तींकडून स्वतःची आवश्यकता म्हणून अहिंसेचा स्विकार केला जातो. काही व्यक्ती स्वतःच्या मानसिक आणि शारिरीक दुर्बलतेमुळै अहिंसा स्विकारतात. त्याचप्रमाणे दुर्बल व्यक्ती एखाद्या व्यक्तीचा प्रतिकार करु शकत नाही किंवा दुर्बल व्यक्ती अहिंसेचा आधार घेत असते.

**६. भित्र्या व्यक्तीची अहिंसा :**

अहिंसेचा हा प्रकार मानवाला न शोभणारा आहे. भित्र्या व्यक्तींची अहिंसा ही विश्वासघातकी असते. या प्रकारात कोणत्याही प्रकारची नैतिकता नसते. गांधीजींच्या मते कोणतीही एक व्यक्ती समोरच्या परिस्थितीचा सामना करु शकत नाही. तेव्हा ती व्यक्ती भीतीपोटी अहिंसेचा स्विकार करीत असते.

म. गांधींनी व्यावहारीक क्षेत्रात अहिंसेच्या बाबतीत काही तडजोडीची भूमिका स्विकारलेल्या आहेत. उदा. एखाद्या व्यक्तीने अनेक व्यक्तींची कत्तल केली असेल आणि अशा व्यक्तीचा जर खून केला गेला तर ती व्यावहारीक दृष्टीकोनातून अहिंसा असते. तसेच देशात परकीय संकट आले असेल देशाच्या संरक्षणासाठी देशातील सैनिकांनी दुसऱ्या देशातील सैनिकांना ठार मारले तर ती हिंसा नसून अहिंसा असते.

- **म. गांधींची सत्याग्रहाची साधने :**

म. गांधींनी सत्याग्रहाला सर्वश्रेष्ठ महत्व दिलेले आहे. सत्याग्रहाचा सिध्दात राजकीय वाटत असला तरी त्यात खरे सुख नैतिक आहे. सत्याग्रह म्हणजे सत्याचा आग्रह करणे. सत्याग्रहात हिंसेच्या साधनांना महत्व दिले जात नाही. सत्याग्रहाची कल्पना राजकीय क्षेत्रातच आणातयेत नाही तर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात लागू करता येते.

गांधींच्या सत्याग्रहाच्या विचारात स्वतः ताण सहन करुन इतरांनी जरी ताण दिला असेल तो देखील सहन करुन त्याचे हृदय परिवर्तन घडवून आणले पहिजे. सत्याग्रह हा व्यक्तींचा जन्मसिध्द हक्क आहे. त्याचप्रमाणे सत्यासाठी संघर्ष करणे हे व्यक्तीचे नैतिक कर्तव्य देखील आहे. म. गांधींनी सत्याग्रही व्यक्तींच्या अंगी कोणकोणते गुण असावेत ते खालील प्रमाणे सांगितले आहेत.

१. सत्याग्रही व्यक्तीं ची ईश्वरावर श्रध्दा असली पाहिजे.
२. सत्याग्रही व्यक्तींमध्ये संपत्तीची आणि प्रसिध्दीची हाव असता कामा नये.
३. सत्याग्रही व्यक्ती निर्भय असली पाहिजे.
४. सत्याग्रही व्यक्तीने ब्रम्हचर्याचे पालन करावे.
५. सत्याग्रहीमंध्ये राग, द्वेष, क्रोध या गोष्टी असू नयेत.
६.

**म. गांधींनी सत्याग्रहाचे मार्ग पुढीलप्रमाणे सागितलेले आहेत -**

१. असहकार
२. सविनय कायदेभंग
३. उपोषण
४. स्थलांतर किंवा देशत्याग
५. बहिष्कार
६. हरताळ
७. धरणे किंवा घेराव
८. संप
९. प्रवेश रोध
१०. करबंदी

**१. असहकार :**

दृष्ट प्रवृत्तीच्या शासनाला कोणत्याही प्रकारचे सहकार्य केले नाही तर त्या शासनाची दृष्ट प्रवृत्ती जाऊ शकते. ब्रिटीशांच्या अत्याचारांनी भारतीय जनता अत्यंत त्रासून गेली होती. परंतु या ठिकाणी भारतीय जनतेचे सहकार्य ब्रिटीशांना प्राप्त होत असल्यामुळे त्यांचे अत्याचारांचे प्रमाण अधिक प्रमाणात वाढत होते, म्हणून गांधीजींनी १९२० मध्ये असहकाराचा मंत्र सांगितला.

**२. सविनय कायदेभंग :**

सत्याग्रहाच्या या साधनात गांधीजींनी चांगले कायदे पाळू नयेत असा मंत्र सांगितलेला नाही. सरकारचे चांगले कायदे लोकांनी पाळणे हे लोकांचे नैतिक कर्तव्यच आहे. परंतु सरकारचे कायदे जर अन्यायकारक असतील, अत्याचारी घटकांना पाठींबा देणारे असतील असे कायदे लोकांनी पाळू नयेत. अशा वेळेला लोकांनी सविनय कायदेभंग करावा. कायदेभंग केल्यामुळे सरकार जी शिक्षा करील ती शिक्षा सत्याग्रहींनी भोगली पाहिजे. शिक्षा भोगून झ ाल्यानंतर अयोग्य कायद्यांना प्रतिकार करावा. अशा कृतींमुळे सरकार आपल्या निर्णयाला किंवा कायद्यात निश्चितपणे बदल करु शकेल.

**३. उपोषण :**

गांधीजींनी वैयक्तिक शुध्दीकरणासाठी आणि इतरांच्या शुध्दीकरणासाठी एक महत्वपूर्ण नैतिक साधन सांगितले आहे ते म्हणजे उपोषण

होय. १९२४ मध्ये हिंदू आणि मुसलमान यांच्यात राष्ट्रभावना वाढीस लागली. यासाठी त्यांनी २१ दिवसांचे उपोषण केले होते. उपोषण हे स्वतःच्या स्वार्थासाठी असता कामा नये. उपोषणामुळे जरी शारीरिक कष्ट होत असले तरी उपोषणकर्त्याचे नैतिक मनोबल अधिक प्रमाणात वाढीस लागते. त्यामुळे विरोधकांना त्यांच्या मागण्यांच्या संदर्भात विचार करावाच लागतो. म्हणजेच त्यांचे हृदय परिवर्तन होते.

**४. स्थलांतर / देशत्याग :**

सत्याग्रहाच्या या साधनात गांधी म्हणतात जेव्हा एखाद्या भागात राहत असलेल्या लोकांना जीवन जगणे अशक्य वाटत असेल त्या ठिकाणी त्यांचा सतत अपेक्षाभंग होत असेल, आणि अहिंसात्मक मार्गाने अन्याय करणाऱ्या घटकाला प्रतिकार करुन उपयोग होत नसेल तर अशावेळी तेथे राहणाऱ्या लोकांनी तो प्रदेश सोडून दुसरीकडे गेले पाहिजे. गांधीजींनी प्रदेश सोडण्यासंबंधीचा सल्ला बारडोली, जुनागड येथील लोकांना दिला होता. कारण त्या ठिकाणच्या लोकांवर व हरीजनांवर मोठ्या प्रमाणात अत्याचार केले गेले. म्हणून त्यांनी प्रदेश सोडण्याविषयी सल्ला दिला.

**५. बहिष्कार :**

गांधीजींनी या साधनात परदेशी मालावर बहिष्कार तसेच सरकारी कचेऱ्या, न्यायालय यावर देखील त्यांनी बहिष्कार टाकण्याचा मंत्र दिला होता. बहिष्कार हे साधन एक प्रकारे दृष्ट प्रवृत्तीच्या सरकारला कोणत्याही प्रकारचे सहकार्य करावयाचे नाही या अर्थानेच वापरावे. राजकीय क्षेत्राप्रमाणेच सामाजिक क्षेत्रात देखील हे तंत्र वापरता येऊ शकते. एखादी व्यक्ती दृष्ट प्रवृत्तीची असेल आणि समाजाने तिच्यावर बहिष्कार टाकावा कारण त्यामुळे दृष्ट प्रवृत्तीच्या व्यक्तीत बदल होऊ शकतो.

**६. हडताळ :**

हरताळ याचा अर्थ संपूर्ण कामकाजावर बहिष्कार टाकणे. कामकाजावर पूर्णपणे बहिष्कार टाकल्यामुळे विरोधी पक्ष वठणीवर येऊ शकतो. विद्यार्थी, शिक्षक, व्यापारी यांनी ठराविक वेळेत कामकाज बंद करुन असहकार करावा. हरताळामुळे प्रतिपक्षांकडून होणारी पिवळवणूक थांबत असते. हरताळामध्ये हिंसा घडत नाही. परंतू प्रतिपक्षावर मात्र दडपण येते.

गांधीजींनी या साधनाला नैतिक साधन मानले आहे. असे जरी असले तरी हरताळ या मार्गाचा वापर वारंवार करता कामा नये. कारण त्यामुळे त्याची परिणामकारकता कमी होते आणि लोकांचा देखील विश्वास राहू शकत नाही. या साधनाचा वापर विचारपूर्वक करुन करावा.

**७. धरणे किंवा घेराव :**

कोणत्याही व्यक्तीला संकटात टाकून तिला पूर्णपणे अडचणीत आणणे हे गांधीजींना मान्य नव्हते. धरणे याचा अर्थ असा की जी व्यक्ती किंवा सरकार अन्याय करीत असेल तर तो अन्याय तिच्या लक्षात आणून देण्यासाठी धरणे धरले जाणे जरुरीचे असते. गांधीजींनी या मार्गाला देखील नैतिक मानले आहे. म्हणून त्याचा वापर सनदशीर किंवा विधायक दृष्टीकोनातून करावा.

**८. संप :**

संप ही कल्पना आज अतिशय लोकप्रिय ठरलेली आहे. परंतु सर्वच संप गांधीप्रणीत मार्गानेच चालत असतात असे नाही. अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी संपाचे हत्यार कामगारांनी वापरावे असे गांधीजींचे मत होते. सत्ता प्राप्त करण्यासाठी किंवा स्वार्थ हेतू साध्य करण्यासाठी संप या मार्गाचा वापर करु नये. कामगारांनी कारखान्याच्या सर्वांगिण प्रगतीसाठी संपाचा वापर केला पाहिजे. परंतु संपाचा वापर करतांना हिंसा होता कामा नये. कामगारांनी लाचारीची तडजोड करता कामा नये. सत्य आणि तत्व या गोष्टी कामगारांनी लक्षात घेतल्या पाहिजेत.

**९. प्रवेश रोध :**

गांधीजींच्या मते विशिष्ट गोष्टींची खरेदी विक्री करण्यावर नैतिक दडपण आणून हे उद्दिष्ट साध्य करुन घ्यावे. सत्याग्रहाने या साधनांचा वापर करतांना कोणत्याही प्रकारे दुसऱ्याला धाक दाखवू नये. भारतात परदेशी कापडाच्या खरेदी विक्रीसाठी शांततेच्या मार्गाने प्रवेश रोध या मार्गाचा अवलंब केला होता. सत्याग्रहाने हिंसक मार्गाचा त्याग करावा. अहिंसक मार्गाने विरोधकांचे हृदय परिवर्तन घडवून आणावे.

**१०. करबंदी :**

शासनाने लादलेले अन्यायकारक कर भरण्यास लोकांनी नकार द्यावा. या चळवळीला अनैतिक स्वरुप देऊ नये म्हणून प्रथम लोकांना

सत्यासाठी प्रणालीचे लोकशिक्षण दिले पाहिजे. या प्रकारचा सत्याग्रह उद्योगांशी किंवा जमीनदार याविरुध्द करता येईल.

**महात्मा गांधीची आदर्श राज्याची कल्पना :**

म. गांधींनी आपल्या आदर्श राज्यात रचनात्मक विचारांना महत्वाचे स्थान दिलेले आहे. परकीय सत्तेपासून देश स्वतंत्र बनविणे हे स्वातंत्र्याची पहिली पायरी होय आणि स्वातंत्र्य प्राप्तीनंतर अहिंसक समाज निर्माण करणे म्हणजे खऱ्या अर्थाने लोकशाहीची स्थापना करणे होय. त्यांच्या लोकशाही विचारात विकेंद्रीकरणाला महत्वपूर्ण स्थान आहे. खेडे हा लोकशाहीचा पाया आहे. म्हणून ग्राम स्वराज्यातील खेडे स्वयंपूर्ण बनले पाहिजे. महात्मा गांधीजींच्या राज्य या संकल्पनेत लोकशाही प्रमाणेच 'रामराज्य' हा शब्दप्रयोग महत्वाचा वाटतो. त्यांनी रामराज्य हा शब्द पारंपारीक अर्थाने वापरलेला असला तरी त्याचा आशय आधुनिक आहे. रामराज्याचा रामायणातील राज्याशी किंवा धर्माधिष्ठीत राज्याशीकोणताही संबंध नाही. रामराज्य म्हणजे आदर्श राज्य आणि आदर्श राज्य म्हणजे स्वातंत्र्य प्राप्तीनंतरची नवी समाजरचना होय. रामराज्याचा अर्थ म्हणजे जेथे व्यक्ती स्वातंत्र्याला सर्वश्रेष्ठ मुल्य मानले जाते अशी विकेंद्रीत लोकशाही व्यवस्था असलेले राज्य म्हणजे रामराज्य होय. या व्याख्येवरुन महात्मा गांधींनी रामराज्याचे किंवा आदर्श राज्याचे घटक सांगितले आहेत ते पुढीलप्रमाणे-

१. राजकीय विकेंद्रीकरण
२. आर्थिक विकेंद्रीकरण
३. राज्याला विरोध करण्याचा अधिकार
४. राज्याचे कार्यक्षेत्र
५. संरक्षण व्यवस्था
६. न्यायव्यवस्था
७. तुरुंग व्यवस्था
८. शारीरिक श्रम
९. वर्ण व्यवस्था
१०. वर्गविहीन व राज्यविहीन समाज

**१. राजकीय विकेंद्रीकरण :**

राजकीय विकेंद्रीकरणात त्यांनी लोकशाही विकेंद्रीकरणाची संकल्पना मान्य केलेली आहे. लोकशाहीची प्रक्रिया समाजातल्या कमी घटकांमध्येच निर्माण न करता ती समाजाभिमुख बनविली गेली पाहिजे. म्हणूनच त्यांनी राज्याची सार्वभौम सत्ता खेड्यांमध्ये विभागली पाहिजे असे मत मांडले होते. आणि ज्या गोष्टी खेड्यातील लोकांना करता येऊ शकतील त्याबाबतीत त्यांना पूर्णपणे संधी देणे किंवा अधिकार देणे म्हणजे खरे विकेंद्रीकरण होय. खेड्यातील कारभार पंचायतीद्वारे चालविला जाऊ शकेल.

**२. आर्थिक विकेंद्रीकरण :**

आर्थिक विकेंद्रीकरणात त्यांनी मोठमोठ्या उद्योगधंद्यांना विरोध केलेला आहे. कारण सत्तेचे केंद्रीकरण विशिष्ट अशा एका गटांकडेच जात असते. मोठ्या प्रमाणावर यांत्रिकीकरणामुळे लहान लहान उद्योगधंदे त्यामुळे बंद होतात. म्हणून त्यांनी खेडे स्वयंपूर्ण बनविण्यासाठी आर्थिक विकेंद्रीकरणात उद्योगधंद्यांचे विकेंद्रीकरण खेड्यांमध्ये झाले पाहिजे. त्यामुळे खेड्यातील युवक शहराकडे जाणार नाहीत. लहान लहान उद्योगधंद्यामुळे बेकारीची समस्या कमी होईल.

**३. राज्याला विरोध करण्याचा अधिकार :**

आदर्श राज्यात लोकांना राज्याला विरोध करण्याचा अधिकार सांगितलेला आहे. जर राज्य जनतेच्या इच्छेचे प्रतिनिधीत्व योग्य प्रकारे करीत नसेल, अन्यायकारी कायदे करीत असेल, दहशतवादी गटांना पाठींबा देत असेल तर अशा कायद्याला लोकांनी विरोध करावा ते लोकांचे कर्तव्यच आहे. राज्याला विरोध केल्यामुळे अराजकता निर्माण होण्याची शक्यता असते. गांधीजींनी अशा अराजकतेलाही मान्यता दिलेली आहे.

**४. राज्याचे कार्यक्षेत्र :**

रामराज्यातील राज्याचे कार्यक्षेत्र मर्यादीत असावे असे त्यांचे मत होते. प्रत्येक व्यक्ती सरकारच्या नियंत्रणापासून जास्तीत जास्त स्वतंत्र असेल. राज्याने व्यक्तीच्या प्रत्येक क्षेत्रात हस्तक्षेप करु नये. राज्यात समजाता कायदा व सुव्यवस्था प्रस्थापीत करण्यासाठी प्रयत्न करावा. रामराज्यात जे

समाजविघातक घटक असतील त्यांना नियंत्रीत करण्याचे काम राज्याने कायद्याद्वारे करावे.

**५. संरक्षण व्यवस्था :**

आदर्श राज्यात प्रत्येक व्यक्ती स्वयंशिस्त, सद्‌गुणी असेलच असे नाही. समाजात काही व्यक्ती स्वार्थी व दुष्ट प्रवृत्तीच्या असु शकतात. अशा व्यक्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस दलाची आवश्यकता असते. परंतू पोलीस दलातील व्यक्तींनी आपले काम समाजसेवा भावनेने करावे. पोलीस दलाने हंसेच्या मार्गाचा वापर न करता अहिंसक मार्गाने दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांमध्ये हृदय परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न करावा.

**६. न्यायव्यवस्था :**

गांधीजींनी रामराज्यात न्यायव्यवस्थेचा उल्लेख केलेला आहे. गंभीर स्वरुपांच्या खटल्यांच्या बाबतीत उच्च न्यायालय निर्णय देईल आणि सर्वसामान्य खटल्याच्या बाबतीत पंचायतीद्वारे निर्णय दिला जाईल. या खटल्याच्या बाबतीत पंचायतीने दिलेला निर्णय अंतिम राहील. उच्च न्यायालय आणि पंचायती यांच्यामध्ये इतर कोणतेही न्यायालय असणार नाही. वकीलाची फी ही कायद्याद्वाने निश्चित केली जाईल. तसेच समाजसेवा ही वकीलाची मुख्य पात्रता असेल.

**७. तुरुंगव्यवस्था :**

गुन्हेगारांना जी शिक्षा दिली जाईल तिचा उद्देश बदला घेण्याचा न राहता त्याच्यात सुधारणा व्हावी हा असेल. तुरुंगात शिक्षेवर भर न देता शिक्षणाद्वारे आणि मानसिक उपचाराने गुन्हेगारांमधील दोष दूर करण्याचा प्रयत्न केला जाईल.

**८. शारीरिक श्रम :**

महात्मा गांधीजींच्या मते रामराज्यातील प्रत्येक व्यक्तीने स्वतःची उपजीविका भागविण्यासाठी आवश्यक ते श्रम केले पाहिजेत. रामराज्यातील व्यक्ती ही श्रीमंत असो की गरीब असो सगळ्यांनी कष्ट करावे. त्यामुळे कोणाचेही शोषण होणार नाही.

**९. वर्ण व्यवस्था :**

महात्मा गांधीजींची रामराज्यातील समाजव्यवस्था ही वर्णव्यवस्थेवर आधारीत आहे. समाजात पुढील चार वर्ण असतील - ब्राम्हण, क्षत्रीय, क्षुद्र व वैश्य. मनुष्य हा त्याच्या कार्यानुसार ओळखला जाईल. प्रत्येक व्यक्तीने आपल्या कुटूंबातील व्यवसाय सुरु ठेवावा. कारण व्यक्तीहिताबरोबरच समाज हित देखील साधले जाते. गांधींजीच्या मते सर्व व्यवसाय हेसारखे आहेत. त्यात फरक नाही.

**१०. वर्गविहीन व राज्यविहीन समाज :**

गांधीजी म्हणतात भारत हा खेड्यांचा देश आहे. भारताचा विकास करावयाचा असेल तर प्रत्येक खेड्यात उद्योगधंद्यांची निर्मिती झाली पाहिजे. प्रत्येक गाव स्वयंपूर्ण, स्वावलंबी आणि स्वयं शासित झाले पाहिजे. त्यामुळे रामराज्यात सर्वांचे राजकीय, आर्थिक आणि सामाजिक कल्याण साधले जाईल.

अशाप्रकारे गांधीजींनी रामराज्याच्या संकल्पनेत जे विचार प्रकट केले आहेत ते ग्रीक विचारवंत प्लेटोचा आदर्श राज्य सारखी वाटतात. परंतु प्लेटोचे आदर्श राज्य स्वप्नरंजक स्वरुपाचे होते. गांधींच्या आदर्श राज्यातील काही गोष्टी प्रत्यक्ष व्यवहारात आणता येऊ शकतील. परंतु त्यांनी अहिंसक शांतीसैनिकांचा जो उल्लेख केलेला आहे तो आधुनिक काळातील शस्त्रस्पर्धा असलेल्या युगात मान्य करता येत नाही. सैन्यातील व्यक्तींनी बलिदान केल्यावर शत्रुचे हृय परीवर्तन होईल असे त्यांचे मत होते. परंतू हिटलर किंवा मुसोलिनी सारख्या शत्रुपुढे कितीही अहिंसक सैनिक मारले गेले किंवा जनरल डायर सारख्या शत्रुपुढे कितीही सैनिक मारले गेले तरी त्यांचे हृदय परीवर्तन होणे शक्य नाही.

**महात्मा गांधींचे साध्य आणि साधने याविषयी विचार :**

म. गांधीजींचा सत्याग्रहाचा विचार पूर्णपणे नैतिक मुल्यांवर आधारीत आहे. सत्य आणि अहिंसा या दोन साधनांवर सत्याग्रहाची उभारणी झाली पाहिजे. म. गांधींच्या मते मानवाचे मन जसे शुध्द असते तशाच प्रकारे जर मानवाला एखादे उद्दिष्ट प्राप्त करावयाचे असेल तर त्याच्यासाठी लागणारी साधने शुध्द असतील. उद्दिष्ट कितीही शुध्द असेल परंतू साधने अशुध्द

असतील, स्वार्थाने प्रेरीत असतील तर ते उद्दिष्ट कलंकित होते. कोणताही डॉक्टर आपॅरेशन करण्यापूर्वी साधने निर्जंतुक करुन घेतो तसे जर त्याने केले नाही तर आलेल्या पेशंटचा मृत्युदेखील होऊ शकतो. यावरुन असे स्पष्ट होते की साधन शुध्द नसेल तर साध्य पराभूत होऊ शकते. गांधीजींना राजकारणाविषयीचा दृष्टीकोन मान्य नाही ते म्हणतात राजकारणाचे केंद्र सत्ता असू नये तर जनकल्याण असावे. राजकारण हे साध्य नसून साधन आहे. साध्य आणि साधन यांचे अतुट नाते आहे. झाडाचे बीज आणि झाड यांचे ज्याप्रमाणे नाते आहे त्याचप्रमाणे साध्य आणि साधने यांचे एक नाते आहे. साध्य चांगले असले की मग साधने कशीही असता कामा नये. म्हणून ते म्हणतात फॅसिस्ट आणि नाझी यांचे साध्य चांगले आहे. परंतु साधने मात्र चांगली नाहीत. म्हणून त्यांनी हिटलर आणि मुसोलिनी यांना विरोध केला आहे. मानवाने लोकहिताची कामे करावीत. म. गांधी व मॅकीया व्हेली यांच्या विचारात बराच फरक आहे. मॅकीया व्हेलीच्या मते उद्दिष्टांच्या पुर्तीसाठी कोणतेही साधन वापरावयास हरकत नाही. हे मत गांधीजींना मान्य नाही. गांधीजींच्या मते साध्य दूर असते, साधने आपल्या हातात असते. म्हणून साधनांबद्दल काळजी घ्यावी लागते. परीक्षेत पास होणे चांगले आहे परंतू पास होण्यासाठी कॉपी करणे मात्र चुकीचे आहे तसेच गरीब जनतेला कपडे वाटणे चांगले आहे, मात्र ते कपडे आपण चोरुन आणून वाटले तर ते अनैतिक आहे. हिंसाचार, रक्तपात यांच्या सहाय्याने आपले ध्येय प्राप्त करण्यास म. गांधींचा विरोध होता.

***

## प्रकरण ६

# पंडीत जवाहरलाल नेहरु

**जीवन परिचय -**

पंडीत जवाहरलाल नेहरु यांचा जन्म ४ नोव्हेंबर १८८९ मध्ये अलाहाबाद येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण अलाहाबाद येथे झाले. नंतर ते उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. १९१२ मध्ये त्यांनी कायद्याची पदवी संपादन केली. पं. नेहरु यांचे वडील मोतीलाल नेहरु हे भारताच्या राष्ट्रीय चळवळीचे एक प्रमुख नेते होते. नेहरुंवर त्यांचा प्रभाव होता. त्याचप्रमाणे म. गांधींचा देखील पंडीत नेहरुंवर प्रभाव होता. म. गांधींनी सुरु केलेल्या चळवळीत त्यांनी सहभाग घेतला होता. १९२१ मध्ये गांधीजींनी सुरु केलेल्या चळवळीत त्यांनी भाग घेतला. तसेच १९२२ मध्ये काँग्रेसने सुरु केलेल्या चळवळीत त्यांनी भाग घेतल्यामुळे त्यांना अटक करण्यात राजकीय सहभागाला त्यांनी खरी सुरुवात १९२३ मध्ये केली. १९२३ मध्ये ते अलाहाबाद नगर पालिकेत निवडून आले आणि १९२३ मध्ये ते अलाहाबाद नगरपालिकेचे अध्यक्ष झाले. १९२९ च्या लाहोरच्या काँग्रेस अधिवेशनात ते अध्यक्ष झाले. १९४२ मध्ये चलेजावची चळवळ सुरु झाली. त्यावेळी पं. नेहरुंना तीन वर्ष तुरुंगवासाची शिक्षा झाली. १९४६ मध्ये त्यांनी हंगामी सरकार निर्माण केले आणि ते हंगामी सरकारचे पंतप्रधान झाले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते भारताचे पहिले पंतप्रधान झाले. पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले. जमीनदार पध्दत त्यांनी बंद केली. पं. नेहरुंना परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार म्हणतात. त्यांनी जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केलेत. त्यांनी राष्ट्रवाद व आंतरराष्ट्रवाद लोकशाही समाजवाद याविषयी विचार मांडले. १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले याचे त्यांना फार दु:ख झाले. अशातच त्यांचे शरीर खचले आणि २७ मे १९६४ मध्ये त्यांचा मृत्यु झाला.

**पंडीत जवाहरलाल नेहरु यांचे राष्ट्रवाद आणि आंतरराष्ट्रवादाविषयी विचारः**

नेहरुंनी राष्ट्रवादाविषयी विचार मांडले आहेत. पं. नेहरु यांच्यावर लहानपणी त्यांच्या वडीलांचा प्रभाव असल्यामुळे आणि त्यांच्या घरातील

वातावरण राष्ट्रवादाला पोषक असल्यामुळे त्यांना राष्ट्रवादाविषयी आत्मियता होती. म्हणून स्वातंत्र्य, उदारमतवाद, लोकशाही वरील निष्ठा इ. गोष्टींचा नेहरुंवर प्रभाव पडला होता. या गोष्टी मिळविण्यसाठी भारतीय समाजामध्ये जेव्हा एकात्मतेची भावना निर्माण होईल तेव्हाच खऱ्या अर्थाने त्या समाजात राष्ट्रवादाविषयी जागृती निर्माण होईल. आपल्या भारतात देखील आपण राष्ट्रवादी चळवळ उभी करावी असे नेहरुंना वाटत असे. त्यावेळी भारतात म. गांधींच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय चळवळ सुरु झाली होती आणि त्यात ते सहभागी झाले. त्यांच्या राष्ट्रवादी विचारात त्यांनी भूमी या घटकाला विशेष महत्व दिले आहे. म्हणून ते त्यांच्या मृत्युपत्रात म्हणतात की, माझा मृत्यु झाल्यानंतर माझी रक्षा विमानातून नेऊन भारताच्या भूमीवर टाकावी. म्हणजे ती भारताच्या मातीत मिसळुन जाईल. तसेच काही रक्षा ही गंगेच्या पाण्यात सोडावी म्हणजे ती रक्षा गंगेच्या पाण्याशी एकरुप होऊ शकेल.

**राष्ट्रवादाची वैशिष्ट्ये :**

१) स्वराज्य
२) लोकशाहीला महत्व
३) एकतेला महत्व
४) सामाजिक आणि आर्थिक राष्ट्रवाद
५) मर्यादित राष्ट्रवाद

**१) स्वराज्य :**

पं. नेहरु यांच्या राष्ट्रवादाचे प्रमुख उद्दीष्ट म्हणजे स्वराज्य होय आणि स्वराज्य म्हणजे स्वयंशासन होय. भारतीय लोकांच्या हाती भारताचे संपूर्ण नियंत्रण असावे. पं. नेहरु यांना वसाहतवाद स्वरुपाचे स्वातंत्र्य अमान्य होते. वसाहतीच्या राज्यात अंतिक अधिकार ब्रिटीशंकडे राहणार होता. म्हणून नेहरुंच्या मते भारतातील अनेक समस्यांच्या संदर्भात भारतीय लोकांकडे निर्णायक स्वरुपाचा अधिकार असला पाहिजे. म्हणजे भारताचे सार्वभौमत्व भारतीय समजाच्या ठिकाणी असेल तरच राष्ट्रवादाचे स्वराज्य हे उद्दीष्ट यशस्वी होऊ शकेल.

**२) लोकशाहीला महत्व :**

पं. नेहरु यांनी आपल्या राष्ट्रवादी विचारात लोकशाहीला जास्त महत्व दिलेले आहे. स्वतंत्र भारतात लोकशाही शासन पध्दती असावी. कोणत्याही प्रकारे सामाजिक भेदभाव न मानता प्रत्येक भारतीय नागरीकाचा समान राजकीय सहभाग असेल, त्याचप्रमाणे प्रत्येकाला हक्क दिले. पं. नेहरुंचा राष्ट्रवाद व्यक्ती स्वातंत्र्यवादी होता.

**३) धर्मनिरपेक्षता :**

पं. नेहरुचा राष्ट्रवाद धर्मनिरपेक्ष स्वरुपाचा होता. कारण त्यांच्यामते धर्मामुळे समाज खंडीत होतो. संघर्ष वाढत असतो. अंतर्गत संघर्षामुळे समाजाची एकात्मता नष्ट होत असते. त्याचवेळी द्विराष्ट्रवादाच्या संकल्पनेमुळे हिंदु-मुस्लिम यांच्यातले संघर्ष वाढीस लागले होते. म्हणून व्यक्ती हिंदू आहे की मुस्लिम यास महत्व न देता आपल्याला परकीयांच्या गुलामगिरीतून कसे मुक्त होता येईल आणि स्वतंत्र होऊन भारतीय समाजाचा सर्वांगिण विकास कसा करता येईल याचा विचार करण्याची गरज आहे. म्हणून त्यांनी धर्माला महत्व दिले आहे.

**४) एकतेला महत्व :**

नेहरुंचा राष्ट्रवाद विषमतेत एकात्मता निर्माण करणारा होता. भारतात भिन्न धर्मीय, भिन्न भाषीक असलेले लोक आहेत. त्यांच्यातील रुढी, प्रथा, परंपरा ह्यांच्यात भिन्नता आहे. म्हणजे भारतीय समाज विविधतेने भरलेला आहे.

**५) सामाजिक व आर्थिक राष्ट्रवाद :**

पं. नेहरुंचा राष्ट्रवाद हा फक्त राजकीय स्वरुपाचा नव्हता तर सामाजिक व आर्थिक स्वरुपाचा होता. सामाजिक स्वरुपात सामाजिक भेदांना वाव नसावा. आर्थिक दृष्टीने भारतीय समाज स्वयंपूर्ण बनला पाहिजे. औद्योगिकरणाचा विकास करावा असे त्यांचे मत होते.

**६) मर्यादित राष्ट्रवाद :**

पं. नेहरुंचा राष्ट्रवाद हा मर्यादित स्वरुपाचा होता. फॅसीस्ट विचारसरणी आणि नाझी विचारसरणी पं. नेहरुंना मान्य नव्हती.

**७) आंतरराष्ट्रीय विचार :**

पं. नेहरुंच्या मते राष्ट्रवाद व आंतरराष्ट्रवाद ह्या संकल्पना परस्पर विसंगत नाही. त्यांनी आपल्या राष्ट्रवादी संकल्पनेला मर्यादा घालून आंतरराष्ट्रवाद या विषयी विचार मांडले आहेत. पं. नेहरुंना अतिरेकी राष्ट्रवाद मान्य नव्हता. कारण या राष्ट्रवादामुळे आंतरराष्ट्रीय संघर्ष वाढीस लागला असता. पं. नेहरुंना विधायक राष्ट्रवाद मान्य होता. कारण या राष्ट्रवादातून आंतरराष्ट्रीय सहकार्य, शांतता प्रस्थापीत होऊ शकेल म्हणून विधायक राष्ट्रवाद म्हणजे आंतरराष्ट्रवाद निर्माण करण्याची पुढची पायरी होय. नेहरु हे आंतरराष्ट्रवादाचे पुरस्कते का बनले ते आपल्याला पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**१) सामाजिक सुरक्षितता :**

पंडित नेहरुंवर म. गांधींचा प्रभाव पडलेला आपल्याला दिसून येतो. आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी पं. नेहरुंनी प्रयत्न केले होते. जगात कोणत्याही देशाची पिळवणूक होणार नाही. यासाठी सहकार्य व समन्वय प्रस्थापित केला पाहिजे.

**२) आर्थिक स्वरुपांचा आंतरराष्ट्रवाद :**

नेहरुंचा आंतरराष्ट्रीय दृष्टीकोन आर्थिक स्वरुपाचा होता. त्यांच्या मते आर्थिक दृष्टीने जग हे लहान बनले आहे. जगातील कोणताही देश आर्थिक बाबतीत स्वयंपूर्ण नाही. प्रत्येक लहानमोठ्या देशाला दुसऱ्या देशाची आर्थिक सहकार्याची गरज आहे. त्यासाठी विकसित देशांनी अविकसित देशांना आणि विकसनशील देशांना मदत केली पाहिजे यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य समन्वय प्रस्थापित करुन आंतरराष्ट्रवाद विकसीत करावा असे त्यांचे मत होते.

**३) बुध्दीप्रामाण्य आणि व्यवहारवादी आंतरराष्ट्रवाद :**

पं. नेहरुंचा आंतरराष्ट्रवाद बुध्दीप्रामाण्य आणि व्यवहारवादी आहे. त्यांच्यामते मानवाच्या सुखासाठी आणि कल्याणासाठी आंतरराष्ट्रवादाचा स्विकार करावा. कारण मानवाने आज इतकी विध्वंसक शस्त्रे निर्माण केली आहेत की त्या शस्त्रांद्वारे संपूर्ण मानवजातीचा विनाश होऊ शकेल, म्हणून आंतरराष्ट्रीय संघर्ष नष्ट करुन शांतता सहकार्य सुरक्षा या तत्वांचा पुरस्कार करावा.

**पंडीत नेहरु यांचे लोकशाही समाजवादाविषयी विचार :**

पं. नेहरुचा समाजवादी दृष्टीकोन मानवतावादी होता. इंग्लंडमध्ये असतांनाच त्यांना समाजवादाचे आकर्षण वाटू लागले. जेव्हा ते भारतात आले तेव्हा त्यांनी भारतीय समाजाच्या दारीद्रयाचे निरीक्षण केले. आर्थिक व सामाजिक गुलामगिरीतून भारतीय लोकांना कसे मुक्त करता येईल याचा त्यांनी विचार केला. भारत हा पारतंत्र्याच्या काळात आर्थिक दृष्टीने मागासलेला होता. सामाजिक अवनती झालेली होती. भारतामध्ये उद्योगधंद्यांची निर्मिती झालेली नव्हती. लहान लहान उद्योगधंदे नष्ट झाले होते. भारतातला कच्चा माल इंग्लंडकडे मोठ्या प्रमाणावर जाऊ लागला आणि तेथील पक्का माल भारतातील बाजारपेठेत आला. म्हणजेच भारतातील संपत्ती इंग्लंडकडे जाऊ लागली. त्यामुळे भारतीय लोकांचे दारिद्रय वाढून बेकारी वाढत गेली. भारताच्या दारिद्रयाला परकीय सत्ता जबाबदार नाही तर भारतातील भांडवलदार आणि जमीनदार हे देखील जबाबदार आहेत. म्हणून परकीय सत्ता तसेच भारतातील भांडवलदार आणि जमिनदार यांच्या विषयीचा राग पं. नेहरुंच्या मनात होता आणि त्यातून ते समाजवादी बनले. त्यांच्या समाजवादाचे क्षेत्र राजकीय, सामाजिक, आर्थिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्वरुपाचे होते.

**लोकशाही समाजवादाची तत्वे :**

१. भांडवलशाहीला विरोध
२. उत्पादन क्षेत्राचे राष्ट्रीयकरण
३. वस्तुच्या वाटपाचे नियंत्रण
४. आर्थिक नियोजन
५. खाजगी मालमत्तेला मर्यादा / विरोध

**१. भांडवलशाहीला विरोध :**

भांडवलशाही ही आर्थिक क्षेत्रातील मुक्त स्पर्धेवर आधारलेली व्यवस्था आहे. भांडवलदारांचा प्रयत्न नफा कमविणे आणि कामगारांना कमीत कमी वेतन देणे असा असतो. त्यामुळे कामगारांची पिळवणूक होत असते. कामगारांच्या श्रमातून निर्माण झालेल्या वस्तुंवर मुठभर भांडवलदारांची मालकी असणे ही गोष्ट अन्यायकारक आहे. भांडवलशाही व्यवस्था फक्त श्रमिकांच्या दृष्टीने घातक नाही तर एकूण समाजाच्या दृष्टीने देखील घातक आहे. कारण

भांडवलदार समाज हिताच्या दृष्टीने वस्तुंची निर्मिती करतातच असे नाही. ज्या ठिकाणी जास्तीत जास्त नफा मिळेल हा त्यांचा प्रमुख उद्देश असतो.

**२. उत्पादन क्षेत्राचे स्पष्टीकरण :**

**पं.** नेहरुंनी मिश्र अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केलेला आहे. त्यांच्या मते काही उद्योगधंदे सरकारच्या मालकीचे असावेत आणि त्याचबरोबर काही उद्योगधंद्यांच्या बाबतीत खजगी क्षेत्र असावे. लोकांच्या हिताच्या दृष्टीने खाजगी क्षेत्रातील उद्योगधंद्यांवर सरकारचे नियंत्रण असावे. कोणत्या वस्तु किती प्रमाणात निर्माण कराव्यात, त्या वस्तुंच्या किंमती किती असाव्या इ. निर्णय समाज हिताच्या दृष्टीने घेतला गेला पाहिजे. उत्पादनांचे खाजगी क्षेत्र असावे असे नेहरुंना वाटत असे. कारण ज्या लोकांच्या अंगी व्यवसायिक कौशल्य, उद्योगशीलता हे गुण असतात त्यांना असे उद्योगधंदे चांगल्या प्रकारे चालविता येतील. परंतु अशा उद्योगधंद्यांवर सरकारचे नियंत्रण असले पाहिजे. समाज विघातक वस्तुंची निर्मिती होणार नाही, कामगारांची पिळवणूक होणार नाही इत्यादी बाबतीत सरकारचे खाजगी क्षेत्रातील जे कोणते उद्योगधंदे असतील त्यांच्यावर कडक नियंत्रण असावे.

**३. वस्तुच्या वाटपांचे नियंत्रण :**

**नेहरुंच्या** मते उत्पादन क्षेत्राच्या राष्ट्रीयकरणामुळे दारिद्रयाची समस्या सुटत नाही तर ज्या वस्तुंचे उत्पादन झाले आहे त्या वस्तु योग्य दराने आणि पुरेशा प्रमाणात सर्वत्र उपलब्ध झाल्या पाहिजेत म्हणून एकूण समाजाची गरज लक्षात घेऊन वस्तुंची निर्मिती केली गेली पाहिजे. सरकारने वस्तुच्या वितरणाचे नियंत्रण करावे त्याचप्रमाणे वितरक म्हणून सरकारने बाजारपेठेत उतरले पाहिजे.

**४. आथिर्क नियोजन :**

नेहरुंनी लोकशाही समाजवादात आर्थिक नियोजनाला अग्रक्रम दिलेला आहे. देशातील साधन संपत्ती, मनुष्यबळ, उद्योगधंदे इत्यादीचा विचार करुन नियोजनाची प्रक्रिया राबविली पाहिजे, आर्थिक नियोजनाशिवाय भारताचा विकास होणार नाही असे त्यांचे मत होते. अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्यासाठी जमिन पध्दतीत सुधारणा करावी, नविन तंत्राचा वापर करावा, कसेल त्याची जमिन हे तत्व त्यांनी मान्य केले. प्रागतिक कर योजना सुरु

करावी म्हणज श्रीमंत घटकांकडून कर रुपाने अधिक पैसे घेऊन त्या पैशाचा उपयोग समाजहितासाठी केला पाहिजे. देशात औद्योगिकरण यशस्वी करण्यासाठी कारखाने आणि कच्च्या मालाचे प्रमाण यांच्यात वाढ केली पाहिजे. आर्थिक नियोजनाचा कार्यक्रम देशहिताच्या दृष्टीने जाहिर केला पाहिजे.

**५. खाजगी मालमत्तेला मर्यादा :**

पंडित नेहरु हे जरी व्यक्ती स्वातंत्र्यवादी असले तरी त्यांचा अतिरेकी व्यक्ती स्वातंत्र्याला विरोध होता. कारण समाजात बलवान घटकांबरोबरच कमकुवत घटक देखील असतात म्हणून त्यांच्या हितसंबंधांच्या रक्षणाची जबाबदारी राज्याची असते, त्यासाठी खाजगी मालमत्तेचा अधिकार मर्यादित असणे गरजेचे आहे. या अधिकारांमुळे कमी संख्येच्या लोकांमध्ये अधिक संपत्तीचा संचय होतो आणि बहुसंख्य लोक गरीब असतात, त्यातून आर्थिक विषमता निर्माण होत असते. म्हणून त्यांनी समाज हिताच्या दृष्टीने खाजगी मालमत्तेच्या अधिकारावर काही प्रमाणात मर्यादा घातली जावी असा विचार मांडला. नेहरुंचा लोकशाही समाजवाद प्रत्यक्ष व्यवहारामध्ये आणता येऊ शकेल. आर्थिक विषमता दूर करुन सामाजिक व आर्थिक विकास करावयाचा असेल तर नेहरुंच्या मते सरकारला कठोर पावले उचलावी लागतील. त्यात प्रामुख्याने त्यांनी कर योजना सांगितलेली आहे. तसेच राज्याने उद्योगधंद्यांवर आपले नियंत्रण ठेवावे.

स्त्री कामगारांना अवघड काम दिले जाऊ नये, कामाचे तास कमी करावेत, भांडवलदारांनी अनेकांच्या कल्याणाचा विचार करावा. जमिनदारीची पध्दत बदलावी इ. गोष्टी जर सरकारने केल्या तर भारतामध्ये लोकशाही समाजवाद प्रस्थापित होऊ शकेल.

**पंडीत नेहरुंचे लोकशाही विषयी विचार :**

पं. नेहरुंनी लोकशाहीचा पुरस्कार केलेला आहे. त्यांची लोकशाहीवर निष्ठा राहिलेली होती. नेहरुंचा शिक्षणचा बराच काळ इंग्लंडमध्ये गेला. तेथील व्यक्तीस्वातंत्र्य आणि उदारमतवादाने ते भारावून गेले. तेथील संसदीय लोकशाहीचे त्यांनी निरीक्षण केले. पं. नेहरुंनी लोकशाहीचे काही महत्वाचे घटक सांगितलेले आहेत ते पुढीलप्रमाणे ः

**१) मतदार आणि लोकप्रतिनिधी : (निवडणूक)**

पंडित नेहरुंनी पुरुषांना आपला प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार असला पाहिजे. मतदारांच्या पात्रतेचे निकष ठरवितांना शिक्षण आणि संपत्ती लक्षात घ्यावी हा विचार पंडीत नेहरुंना मान्य नव्हता. त्यांच्या मते मतदारांच्या संदर्भात असे निकष लावणे अयोग्य आहे. कारण त्यामुळे भारतातील बहुसंख्य जनता आपल्या राजकीय हक्कांपासून वंचित राहिल. तसेच फक्त पुरुषांना मतदाराचा अधिकार देणे लोकशाहीच्या दृष्टीने अयोग्य आहे.

लोकशाहीत मतदारांप्रमाणेच लोकप्रतिनिधी देखील एक महत्वाचा घटक आहे. जनता व सरकार यांना जोडणारा दुवा आहे. लोकप्रतिनिधींनी कदर करावी त्याचप्रमाणे तो सामान्य जनतेला जबाबदार असावा, लोकप्रतिनिधींनी आर्थिक दुर्बल मागासलेल्यांचा विकास करावा तसेच जनकल्याणाची कामे करावीत.

**२) स्वातंत्र्य आणि समता :**

नेहरुंनी आपल्या लोकशाही विचारांमध्ये व्यक्ती स्वातंत्र्यावर आणि समतेवर अधिक भर दिलेला आहे. जनतेच्या मुलभूत हक्कांची नोंद राज्यघटनेला करावी असे स्पष्टपणे सांगून प्रत्येक नागरीकाला भाषण लेखन स्वातंत्र्य, संघटन स्वातंत्र्य, धर्म स्वातंत्र्य संचार आणि वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. सर्व जनतेला स्वतःच्या विकासाची समान संधी मिळाली पाहिजे. धर्म, जात, भाषा, प्रांत यांच्या आधारे जनतेत भेदभाव करु नये. पं. नेहरुंनी स्वातंत्र्य समता या दोन तत्वांचा समन्वय साधला आहे.

**३) राजकीय पक्ष :**

पं. नेहरुंच्या मते लोकशाहीत राजकीय पक्ष असले पाहिजेत. पक्ष विरहीत लोकशाहीत सर्वत्र अंधाधुंदी निर्माण होते. राजकीय पक्षामुळे समाजाला एक वैचारीक शक्ती प्राप्त होत असते. राजकीय पक्ष नसतील तर संसदेत कोणतेही विधायक कार्य होणार नाही. म्हणून संसदीय लोकशाहीत राजकीय पक्ष असणे गरजेचे आहे. एकपक्षीय लोकशाहीत नेहरुंचा विरोध होता. लोकशाहीत राजकीय पक्ष जागरुक असले पाहिजेत. राजकीय पक्षांशिवाय लोकशाहीची कल्पना अशक्य आहे.

**४) अल्पसंख्यांकांचे हितसंबंध :**

लोकशाहीत केवळ बहुसंख्याकांच्या मतानुसार राज्यकारभार चालु नयते. लोकशाहीत बहुसंख्यांकांची हुकूमशाही प्रस्थापित झाली तर अल्पसंख्याकांना अपमानकारक वागणूक दिली जाईल त्यांची पिळवणूक केली जाईल. बहुसंख्यांकांचे निर्णय हे प्रत्येक वेळेला बरोबर असतीलच असे नाही. म्हणून लोकशाहीच्या यशासाठी अल्पसंख्यांकांच्या मताची कदर केली पाहिजे आणि त्यांना योग्य ते महत्व दिले पाहिजे. लोकशाहीतील शासनाने अल्पसंख्याकांचा विकास घडवून आणला पाहिजे.

**५) संसदीय लोकशाही व राज्याचे कार्यक्षेत्र :**

नेहरुंच्या मते भारताच्या दृष्टीने संसदीय लोकशाही पध्दत अत्यंत उपयुक्त आहे. कारण भारतातील बहुसंख्य लोक राजकारणाबद्दल उदासीन होते. अशा परिस्थितीत सरकार आपल्या सत्तेचा दुरुपयोग करुन व्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच करण्याची शक्यता होती म्हणून सरकारवर बंधने आवश्यक होती. संसदीय शासन पध्दतीत मंत्रीमंडाळाला लोकसभेचा विश्वास असेपर्यंत सत्तेवर राहता येते. संयुक्त जबाबदरीचे तत्व त्यात असते. संसदीय लोकशाहीत पंतप्रधानाचा राजीनामा म्हणजे मंत्रीमंडाळाचा राजीनामा असतो. संसदीय लोकशाहीत सत्तेच्या बाबतीत नेहमी पपरिवर्तन होत असते. राज्याचे अस्तित्व त्यांचा अधिकार सत्ता यावर अवलंबून असते. समाजात काही व्यक्ती किंवा गट हे स्वार्थी असतात. समाजाच्या हितसबंधाला त्यांच्यापासून धोका असतो. तसेच देशाला परकीय आक्रमणापासून धोका असतो. म्हणून देशाजवळ दंडशक्ती असणे आवश्यक आहे. आधुनिक काळात कल्याणकारी राज्याची कल्पना सर्वत्र दिसून येत असल्याने व्यक्ती स्वातंत्र्याचा काही प्रमाणात संकोच करावा लागतो.

**पंडीत नेहरु परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार :**

नेहरुंनी परराष्ट्र धोरण ठरवितांना भारताची साधनसंपत्ती, भौगोलिक स्थान, राजकीय आणि आर्थिक परिस्थिती यांचा विचार केला. त्यांच्या परराष्ट्र धारेणातील काही मुद्दे पुढील प्रमाणे ड्ड

**१) साम्राज्यवाद आणि वसाहतवादाला विरोध :**

नेहरुंनी साम्राज्यवादाला आणि वसाहतवादाला प्रखर विरोध केला होता. कारण भारत हा देश साम्राज्यवादाला बळी पडलेला होता. नेहरुंच्या मनात फक्त भारताच्या स्वातंत्र्याचा विचार नव्हता तर त्यांनी इतर देशांचा देखील पुरस्कार केला. जगातील इतर देश वसाहतवादाच्या प्रभुत्वाखाली होते. राष्ट्राराष्ट्रांमध्ये परस्परांबद्दल आंतरराष्ट्रीय राजकारणात भितीचे वातावरण होते. जगातील इतर राष्ट्रे स्वतंत्र झाली पाहिजेत असे नेहरुंचे मत होते.

**२) जागतिक शांततावाद :**

आंतरराष्ट्रीय क्षेत्रात संपूर्ण शांततामय सहजीवन निर्माण केले जावे हे महत्वाचे सुत्र त्यांनी आपल्या विदेश नितीत घेतले होते. दुसऱ्या महायुध्दात प्राणहानी आणि वित्तहानी मोठ्या प्रमाणावर झाली होती. म्हणून अशा प्रकारचे युध्द पुन्हा होऊ नये यासाठी ते प्रयत्नशील होते. युध्दाशिवाय इतर मार्गांनी म्हणजे विचारविनिमयातून सहकार्यातून आंतरराष्ट्रीय समस्या सुटल्या पाहिजेत असे त्यांचे मत होते. त्यांचा हा व्यावहारिक दृष्टीकोन महत्वाचा आहे. भारतासारख्या आर्थिक दृष्टीने विकसनशील असलेल्या देशाला आंतरराष्ट्रीय शांततेची गरज होती. त्यासाठी त्यांनी प्रयत्न केलेत. पं. नेहरुंनी जगातील इतर देशांमध्ये मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित केले. अमेरिकन गट आणि रशियन गट यांच्यात तणाव निर्माण होऊ नये म्हणून त्यांनी प्रयत्न केले. जागतिक शातंता निर्माण करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेला त्यांनी सर्व प्रकारचे सहकार्य केले. आंतरराष्ट्रीय व्यासपीठाचा उपयोग जगातील शांततेच्या आव्हानासाठी त्यांनी केला. जागतिक शांततेबरोबरच त्यांनी आंतरराष्ट्रीय सहकार्याचा विचार केला होता. जगातील विकसित देशांनी अविकसीत देशांना सर्व प्रकारचे सहकार्य करुन त्यांचा विकास करावा असे आवाहन त्यांनी केले. १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले आणि त्यांच्या शांततावादाला मोठ्या प्रमाणावर धक्का बसला.

**३) पंचशील तत्वे :**

आंतरराष्ट्रीय संबंधांच्या संदर्भात नेहरुंनी ज्या तत्वांचा उल्लेख केलेला होता त्यांना पंचशील तत्वे असे म्हणतात. आंतरराष्ट्रीय राजकारणात शांतता प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. एका देशाने दुसऱ्या देशाच्या

राजकीय व्यवस्थेत हस्तक्षेप करु नये यासंदर्भात काही तत्वे प्रमुख आहेत. भारत आणि चीन हे लोकसंख्येच्या दृष्टीने आणि भूविस्ताराच्या दृष्टीने मोठे देश आहेत. नेहरुंनी चीनशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले. चीनच्या संदर्भात नेपोलियनने एकदा असे उद्गार काढले होते की, जोपर्यंत चीनरुपी अजगर झोपलेला आहे तोपर्यंत ठिक आहे. तो झोपेतून जागा झाला तर कोणालाही गिळंकृत केल्याशिवाय राहणार नाही. भारताला चीनरुपी अजगरराचा त्रास होईल.

चीनला संयुक्त राष्ट्र संघटनेत प्रवेश मिळावा म्हणून पं. नेहरुंनी प्रयत्न केले होते. कारण मोठ्या लोकसंख्येचा देश असताना देखील चीन हा देश संयुक्त राष्ट्र संघटनेचा सभासद नाही हे नेहरुंना मान्य नव्हते. चीन या देशाशी संघर्ष उद्भवला तर तो सोडविण्यासाठी समान व्यासपीठ असावे. पं. नेहरुंनी सांगितलेली पंचशील तत्वे पुढीलप्रमाणे -

१) परस्परांच्या प्रादेशिक आणि सार्वभौमत्वाबाबत परस्परांनी आदर ठेवला पाहिजे.
२) एका देशाने दुसऱ्या देशावर आक्रमण न करणे.
३) एका देशाने दुसऱ्या देशाच्या अंतर्गत व्यवहारात हस्तक्षेप न करणे.
४) राष्ट्रीय समानता मानून एकमेकांचे हीत पहाणे.
५) शांततामय सहजीवन आणि आर्थिक सहकार्य या तत्वांचा स्विकार करणे.

**४) अलिप्तता आणि गटनिरपेक्षता :**

दुसऱ्या महायुध्दानंतर अमेरिका आणि रशिया या दोन महाशक्तींचा उदय झाला. या दोन्ही महासत्तांनी आक्रमक धोरणाचा अवलंब केला. दोन्ही देशांनी आपली प्रभाव क्षेत्रे वाढविण्याचा प्रयत्न केला. जगात अमेरिकन गट आणि रशियन गट निर्माण झाले भारताच्या शेजारी असलेल्या पाकिस्तानने अमेरिकन लष्करी गटात प्रवेश केला. त्यामुळे भारताला धोका निर्माण झाला. या दोन गटांच्या संघर्षातून जर इतर देशांना वाचवायचे असेल तर अलिप्ततावादी देशांचा तिसरा प्रभावी गट निर्माण करावा असे नेहरुंचे मत होते. त्यांनी अनेक देशांना अलिप्ततावादी गटात आणण्याचा प्रयत्न केला. अमेरिकन किंवा रशियन गटात सामील न होता अलिप्तपणे जागतिक शांततेचा

प्रयत्न करता येईल असे त्यांचे मत होते. पं. नेहरुंच्या धोरणाला इंजिप्त, इंडोनेशिया, युगोस्लाव्हिया या देशांनी पाठींबा दिला. भारताची प्रगती साधण्यासाठी भारताला प्रत्यक्ष दुसऱ्याची मदत घेणे गरजेचे होते. अशी ही मदत सर्वांकडून मिळावी म्हणून भारताने कोणत्याही लष्करी गटात सामील न होता गट निरपेक्ष धोरणातून आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

**पं. नेहरुंचे कल्याणकारी राज्याविषयी विचार स्पष्ट करा.**

पूर्वी राज्यांचे कार्यक्षेत्र मर्यादित होते. राज्यात शांतता प्रस्थापित करण्यापुरते राज्याचे कार्य होते. पण आज बहुतेक लोकशाही देशांनी कल्याणकारी राज्याचा पुरस्कार केलेला आहे. भारतातील आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठी नेहरुंनी प्रयत्न केलेत. भारतीय संविधानाच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये अप्रत्यक्ष लोककल्याणकारी राज्याची जबाबदारी स्विकारलेली आहे. भारताचा सर्वांगिण विकास होण्यासाठी त्यांनी आर्थिक नियोजनाचा पुरस्कार केलेला आहे. आर्थिक निये ाजनाचे उद्दिष्ट म्हणजे जनतेचे राहणीमान उंचविण्यासाठी विकासाची प्रक्रिया सुरु करणे म्हणून भारताने पंचवार्षिक योजनेद्वारे शेती, उद्योगधंदे, व्यवसाय व शिक्षण इ. क्षेत्रात प्रगती केलेली आहे आणि समाजवादी अर्थव्यवस्था निर्माण करण्यासाठी भारताने मिश्र अर्थव्यवस्थेचा स्विकार करुन समाजवादी समाज रचनेचा पुरस्कार केलेला आहे. नेहरुंच्या मते देशाची आर्थिक, सामाजिक आणि राजकीय प्रगती करण्यासाठी शांततामय मार्गांचा अवलंब केला पाहिजे.

**२. पंडित नेहरुंचे अहिंसेविषयी विचार :**

म. गांधींची अहिंसेची व्याप्ती मोठी होती. त्यांच्या मते अहिंसा म्हणजे इतरांना त्रास न देणे किंवा दुःख होईल असा विचार, आचार, उच्चार न करणे म्हणजे अहिंसा होय. अहिंसेच्या बाबतीत पं. नेहरुंनी भारतातील परिस्थिती लक्षात घेऊन एक व्यवहारीक गरज म्हणून अहिंसेचा स्विकार केला होता. कारण भारताची परिस्थिती हिंसा आणि सशस्त्र लढ्याला पोषक नव्हती. परंतू तरीही भारताला अहिंसावाद कायम स्विकारता येणार नाही असे स्पष्ट केले. अंहिसेचा अवलंब करण्यासाठी सुडबुध्दीवर नियंत्रण ठेवावे लागते. विशिष्ट परिस्थितीत हिंसेचा उपयोग करणे गरजेचे आहे. उदा. परकीय आक्रमण,

अत्याचार व प्रसंगी नेहरुंच्या मते अहिंसा ही हिंसेपेक्षा जास्त प्रभावी आणि फलदायी ठरत असते. यात सद्सद्विवेकबुध्दीचा विकास होत असतो. अहिंसेमुळे लोकांच्या मनात एक नवी शक्ती निर्माण होते.

**३. युध्द :**

नेहरुंच्या मते, जागतिक शांतता टिकविणे हे अत्यंत महत्वाचे असून आंतरराष्ट्रीय समस्या युध्दाच्या मार्गाने न सोडविता विचार विनिमयाच्या मार्गाने सोडवाव्यात. युध्दामध्ये कोणत्याही पक्षाचा विजय झाला तरी शेवटी मानवाच्या विकासास अडथळे निर्माण होऊन प्रगती नष्ट होते. युध्दामुळे कोणतीही समस्या सुटत नाही. लष्करी करार आणि युध्द निर्मिती यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात भितीचे वातावरण निर्माण होत असते. त्यामुळे जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. परकीय आक्रमणापासून देशरक्षणासाठी युध्दसज्ज असले पाहिजे. आक्रमक साम्राज्यवादी युध्दाला त्यांचा विरोध होता.

***

## प्रकरण ७

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

---

**जीवन परिचय -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी महू येथे झाला. दापोली आणि सातारा या ठिकाणी त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण झाले. विद्यार्थी दशतेच त्यांना अनेकदा अपमान सहन करावा लागला. अत्यंत कष्टात जीवन काढून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. सयाजीराव गायकवाड यांनी उच्च शिक्षणासाठी डॉ. आंबेडकरांना आर्थिक मदत केली. उच्च शिक्षणासाठी ते अमेरीकेला गेले. तेथील कोलंबिया विद्यापीठात एम.ए.ची पदवी संपादन केली. तसेच कमी कालावधीत त्यांनी P.hd. ही पदवी संपादन केली. त्याचप्रमाणे त्यांनी M.Sc. ची पदवी संपादन केली. १९४६ मध्ये ते घटना समितीवर निवडून आले. भारतीय राज्यघटनेचे निर्माते म्हणून कोलंबिया विद्यपीठाने त्यांना D.Lit. ही पदवी दिली. १४ ऑगस्ट १९५६ रोजी त्यांनी बौध्द धर्माचा स्विकार केला. डॉ. आंबेडकर हे पंडीत नेहरु यांच्या मंत्रीमंडळात कायदामंत्री होते. ६ डिसेंबर १९५६ रोजी त्यांचे निधन झाले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाही विषयी विचार :**

भारतातील राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकशाही विषयी विचार मांडले आहेत. त्यांनी लोकशाहीचा पुरस्कार केलेला आहे. साम्यवाद आणि सर्वंकष पध्दतीला त्यांनी विरोध केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ससंसदीय लोकशाहीचे काही आधारभूत घटक सांगितले आहेत, ते पुढीलप्रमाणे

१. व्यक्तीस्वातत्र्य

२. निवडणूका

३. सत्ता परीवर्तन

४. चर्चेला महत्व

५. राजकीय पक्ष

६. वृत्तपत्र स्वातंत्र्य

**१) व्यक्तीस्वातंत्र्य :** संसदीय लोकशाहीत व्यक्तीच्या अंगी असलेल्या गुणांचा विकास होत असतो. त्याला प्रत्येक क्षेत्रात संधी मिळत असते. सर्वांना समान संधी दिली जाते. व्यक्ती जबाबदारीने वागत असते. त्यामुळे सहकार्य आणि शिस्त प्रस्थापित होते.

**२. निवडणूक :** या पध्दतीत विशिष्ट काळानंतर निर्भय वातावरणात निवडणूका होतात. मतदारांवर कोणतेही दडपण नसते. निवडणूक मंडळाकडून निवडणूकीचे नियम निश्चित केले जातात. त्यामुळे निवडणुका योग्य रितीने पार पडतात.

**३. व्यक्ती परिवर्तन :** या पध्दतीत जनतेमार्फत संसद सदस्य निवडले जातात. आणि त्या सदस्यातून पंतप्रधान व त्यांच्या मंत्रीमंडळाची निवड होत असते. सरकारला अपयश आले तर जनतेमार्फत परिवर्तन होत असते. सत्तांतर हे घटनात्मक आणि शांततेच्या मार्गाने होत असते. रक्तपात, दहशत, हिंसाचार इ. गोष्टींना स्थान नसते.

**४. चर्चेला महत्व :** या पध्दतीत सरकार चर्चेच्या आधारे चालत असते. संसद हे एक चर्चा मंडळ आहे. जनतेच्या अडचणींना वाचा फोडण्याचे काम संसदेत होते. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय समस्यांवर विधायक चर्चा होऊन निर्णय घेतले जातात.

**५. राजकीय पक्ष :** या पध्दतीत राजकीय पक्षांना अत्यंत महत्वाचे स्थान असते. राजकीय पक्षांमार्फतच जनमत संघटीत होते. जनतेच्या इच्छा पक्षामार्फतच कार्यान्वित होतात. विरोधी पक्षाचे कार्य अत्यंत महत्वाचे असते. सत्ताधारी पक्षांच्या धोरणातील त्रुटी दाखवून त्यांना योग्य मार्ग दाखविण्येचे विधायक कार्य विरोधी पक्ष करीत असतात.

**६. वृत्तपत्र स्वातंत्र्य :** संसदीय शासन पध्दतीत वृत्तपत्र स्वतंत्र असते. वृत्तपत्रामुळेच जनतेच्या अडचणी शासनाला समजतात. वृत्तपत्र हे सरकारच्या चुका दाखवून देतात. तसेच सरकारच्या विधायक कार्याबद्दल त्यांची स्तुती करतात. अशाप्रकारे डॉ. आंबेडकरांनी संसदीय लोशाहीचे समर्थन केलेले आहे. मात्र पाश्चिमात्र्य देशं ामध्ये या पध्दतीला अपयश आले. त्यांची कारणमिमांसा त्यांनी केलेली आहे.

१. जर्मनी, इटली, स्पेन या देशांनी या पध्दतीला विरोध केला. कारण त्यांनी स्वातंत्र्य आणि मालमत्ता यांची जोपासना केली नाही. मोठ्या प्रमाणात आर्थिक विषमता निर्माण झाली.

२. संसदीय पध्दतीने केवळ राजकीय लोकशाही जोपासली. आर्थिक व सामाजिक लोकशाहीकडे दुर्लक्ष केले. म्हणूनच लोकशाहीची जागा हुकूमशाहीने घेतली.

३. या पध्दतीत चर्चेला महत्व असल्यामुळे राज्यकारभार अतिशय मंदगतीने होत असतो. लोकोपयोगी कायदे लवकर संमत होत नाही, झाले तर न्यायमंडळ त्यांना रद्द करु शकते.

४. या पध्दतीने समाजाची दोन भागात विभागणी झालेली आहे. ती म्हणजे शासक व शासीत या दोन वर्गात समाजाची विभागणी झाली आहे.

**लोकशाही मार्गातील अडथळे :**

१. अज्ञानता व निरक्षरता
२. रुढी, परंपरा आणि अंधश्रध्दा
३. परकीय कल्पना
४. सामाजिक वातावरणाचा अभाव
५. आर्थिक विषमता
६. विभूती पूजा
७. सदसदविवेक बुध्दीचा अभाव
८. सामाजिक विषमता
९. सहीष्णुतेचा अभाव

**१. अज्ञानता व निरक्षरता :**

भारतीयांची निरक्षरता आणि अज्ञानता हा लोकशाहीच्या मार्गातील फार मोठा अडथळा आहे. लोकशाहीत राज्यकारभार लोकांना चालवावा लागतो. त्यासाठी राज्यकारभाराचे ज्ञान आवश्यक असते. मात्र प्रत्यक्षात बहुसंख्य भारतीय जनता आपल्या सामा. आर्थिक व राजकीय अधकाराविषयी अज्ञानी आहेत.

**२. रुढी, परंपरा आणि अंधश्रध्दा :**

बहुसंख्य जनता ही अनिष्ठ रुढी, परंपरेच्या जाळ्यात अडकलेली आहे. तसेच अंधश्रध्देने ग्रस्त झालेले आहेत. येथील समाज जुन्या परंपरेला चिकटलेला आहे. त्याचप्रमाणे वर्ण वर्चस्व आणि जातीय अहंकार मोठ्या प्रमाणावर आहेत. म्हणून लोकशाहीला अपयश येत आहे.

**३. परकीय कल्पना :**

संसदीय लोकशाहीची कल्पना परकीय राष्ट्राची आहे. ब्रिटनमध्ये या पध्दतीला यश प्राप्त झाले. कारण शेकडो वर्षापासून त्यांनी या पध्दतीची जोपासना केली. त्यासाठी त्यांनी संघर्ष केला. भारतीयांचा विचार करतांना त्यांना लोकशाहीची माहिती नाही तसेच संघर्ष करण्याची त्यांची तयारी नाही.

**४. सामाजिक वातावरणाचा अभाव :**

या पध्दतीच्या यशासाठी अनुकूल सामजिक वातावरण भारतात नाही. एका वर्गाने दुसऱ्या वर्गाला गुलामगिरीत ठेवलेले आहे. जातीय व्यवस्था रुढ झालेली आहे. अस्पृश्यता नष्ट झालेली नाही. अशा या वातावरणात लोकशाही यशस्वी होत नाही.

**५. आर्थिक विषमता :**

भारतीय समाजात आर्थिक विषमता दिसून येते. मुठभर लोकांच्या हाती आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण झालेले आहे. बहुसंख्य जनता दारिद्रयात जीवन कंठीत आहे. अशा परिस्थितीत लोकशाही यशस्वी होणार नाही.

**६. विभूती पुजा :**

भारतीय लोक अज्ञानाप्रमाणचे विभूती पुजेच्या वर्चस्वाखाली आहेत. विभुती पुजा जनमाणसाचा फार मोठा दोष आहे. राजकीय क्षेत्रातील विभुतीपुजा अनैतिक मार्गाकडे नेते. डॉ. आंबेडकरांच्या मते व्यक्ती कितीही मोठी असली तरी तिच्या चरणी स्वतःचे स्वातंत्र्य अर्पण करु नये. मात्र ज्या व्यक्तींनी देशाची अविरत सेवा केली आहे त्यांच्याबद्दल आदर ठेवला पाहिजे.

**७. सद्सद्विवेक बुध्दीचा अभाव :**

भारतातील लोक स्वतःच्या सद्सद्विवेक बुध्दीचा विचार करुन स्वतःचे योग्य मत बनवत नाही. केवळ आदेशाचे पालन करतात. अशा

परीस्थितीत मोठ्या परिश्रमाने तयार केलेली लोकशाहीची जागा हुकूमशाही घेईल.

**८. सामाजिक विषमता :**

भारतीय समाजात आर्थिक विषमतेबरोबरच सामाजिक विषमता मोठ्या प्रमाणात आहे. भारतीय समाज हा असंख्य पोटजातीत किंवा उपजातीत विभागला गेला आहे. त्यामुळे समाजाची एकात्मता नष्ट झालेली आहे. जातीभेदामुळे समाजात न्यूनगंडाची भावना निर्माण झालेली आहे.

**९. सहिष्णुतेचा अभाव :**

डॉ. आंबेडकरांच्या मते भारतात विरोधी विचार किंवा मत समजून न घेता दडपून टाकण्यात येते. असहिष्णुता हा भारतीय राजकारणाचा पाया आहे. दुसऱ्याची मते ऐकून न घेता ते दडपून टाकली जातात. अशा स्थितीत लोकशाहीचे रुपांतर हुकूमशाहीत होते.

**भारतातील संसदीय लोकशाहीच्या यशासाठी आवश्यक असलेले घटक :**

१. सामाजिक लोकशाही
२. देशप्रेम किंवा राष्ट्रप्रेम
३. पक्षपध्दती
४. घटनात्मक मार्ग
५. अल्पसंख्यांकांचे रक्षण
६. जनतेचे चारीत्र्य
७. व्यक्तीस्वातंत्र्य

**१) सामाजिक लोकशाही :**

भारतात सर्वप्रथम सामाजिक लोकशाही निर्माण करावी. समाजातील वरीष्ठ आणि कनिष्ठ भेद नष्ट करावेत. सर्वांना समान हक्क दिला पाहिजे.

**२) देशप्रेम किंवा राष्ट्रप्रेम :**

लोकशाहीच्या यशासाठी जनतेत देशप्रेमाची भावना असली पाहिजे. तसेच समाजातील निरनिराळ्या घटकांमध्ये एकात्मता असली पाहिजे. व्यक्तीने संकुचित विचार न करता व्यापकपणे राष्ट्रहिताचा विचार करावा.

**३) पक्षपध्दती :**

संसदीय लोकशाहीच्या यशासाठी राजकीय पक्ष पध्दती आवश्यक आहे. विधी मंडळाला विरोधी पक्षाने विधायक कार्य करावे. राज्यकर्त्यांच्या चूका दाखवून त्यांना नैतिक पाठींबा द्यावा. सत्तारुढ पक्षाने पक्षहितापेक्षा राष्ट्रहिताला महत्व द्यावे. त्याचप्रमाणे राजकीय पक्षांनी समाज हिताचा विचार करावा.

**४) घटनात्मक मार्ग :**

लोकशाहीत घटनात्मक मार्गावर जास्त भर दिला पाहिजे. सत्तांतर हे शांततामय आणि घटनात्मक मार्गाने झाले पाहिजे. नितीमत्ता टिकवून ठेवली पाहिजे.

**५) अल्पसंख्यांकाचे रक्षण :**

कायदेमंडळात अल्पसंख्याकांना योग्य प्रतिनिधीत्व द्यावे. त्यांना स्वतःचा विचार मांडण्याची संधी द्यावी. त्यांच्या न्याय्य हक्कांचे रक्षण करावे. तरच खऱ्या अर्थाने संसदीय लोकशाही यशस्वी होईल.

**६) जनतेचे चारीत्र्य :**

लोकशाहीत जनतेचे चारीत्र्य उच्च दर्जाचे असावे. कारण त्यामुळे भ्रष्टाचार, अनिती यांना स्थान राहणार नाही. राज्यकर्त्यांनी जनतेच्या हिताचा विचार करावा.

**७) व्यक्तीस्वातंत्र्य :**

लोकशाहीत व्यक्तीस्वातंत्र्य आवश्यक ठरते. तसेच लोकांनी आपल्या सद्सदविवेक बुध्दीनुसार कार्य करावे. अन्याय होत असेल तर त्याला विरोध करावा.

**डॉ. आंबेडकरांचे समाजवादाविषयी विचार :**

डॉ. आंबेडकरांनी भारतातील सर्व परिस्थितीचा विचार करुन समाजवादाचा विचार मांडलेला आहे. त्यांना दारिद्रयाबद्दल चिड होती. त्यांच्या मते औद्योगिक यंत्रप्रधान समजा आणि भांडवलशाही या दोघांच्या परिणाम समाजावर झालेला आहे. तसेच समाजातील विकृत प्रवृत्तींमुळे समाजाची प्रगती खुंटलेली आहे. पाश्चिमात्य देशात भांडवलशाही यशस्वी झालेली आहे. मात्र भारताच्या दृष्टीने ती उपयुक्त नाही. कारण भारतातील सामाजिक आणि

आर्थिक परिस्थिती भिन्न स्वरुपाची आहे. लोकशाही समाजवाद पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

१. भांडवलशाही विरोध

२. मार्क्सवादाला विरोध

३. राज्य समाजवाद

१. शेतीचे राष्ट्रीयकरण करावे.

२. वस्तुंच्या वितरणावर राज्याचे नियंत्रण

३. उद्योगधंद्यांवर सरकारचे नियंत्रण असावे.

४. इच्छेनुसार काम मिळावे.

**१. भांडवलशाहीला विरोध :**

डॉ. आंबेडकरांच्या मते भांडवलशाहीमुळे संपत्तीचे केंद्रीकरण होते. श्रीमंत हे जास्त श्रीमंत होतात तर गरीब हे जास्त गरीब होतात. श्रीमंत लोक ऐषआरामाने जीवन जगतात तर गरीबांना हाल अपेष्टांमध्ये जीवन जगावे लागते. भारतातील कामगार, शेतकरी आणि अस्पृश्य यांची स्थिती अत्यंत वाईट होती.

डॉ. आंबेडकरांच्या मते भांडवलशाहीत श्रमिकांच्या कल्याणाचा विचार केला जात नाही. त्यांचे कामाचे तास प्रमाणापेक्षा जास्त असतात. त्यांचे जीवन पशुतुल्य असते. त्यांना स्वतःचा विकास करण्यासाठी संधी दिली जात नाही. त्याचप्रमाणे श्रमिक स्वतःच्या मुलांना शिक्षण देऊ शकत नाही. कामगारांना जास्त मेहनत करावी लागते. कामगारांना त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला मिळत नाही. आजारपण, अपंगत्व बेकारी इ. प्रसंगी त्यांना आर्थिक सुरक्षा मिळत नाही. तसेच वैद्यकिय आणि शिक्षणाच्या सवलती, करमणूक, विश्रांती इ. गोष्टींचाही विचार भांडवलदार करीत नाही. भांडवलदार ज्या वस्तु उत्पादीत करतो त्या वस्तु समाजहिताच्या आहेत की नाही याचा तो विचार करीत नाही.

**२. मार्क्सवादाला विरोध :**

डॉ. आंबेडकरांनी भांडवलशाहीप्रमाणे मार्क्सवादाला विरोध केलेला आहे. ते साम्यवादाचे कट्टर विरोधक होते. रशियातील साम्यवाद त्यांना मान्य

नव्हता. साम्यवादाला विशिष्ट कारणामुळे त्यांनी विरोध केला. ती कारणे पुढीलप्रमाणे -

१. मार्क्सला धर्माचे तत्वज्ञान मान्य नाही. धर्मामुळे मनुष्य स्थितीशिल बनतो. डॉ. आंबेडकरांना कार्लमार्क्सचे विचार मान्य नाही. त्यांच्या मते मनुष्य जीवनात धर्माला महत्व आहे. बौध्द धर्माने संपत्तीच्या केंद्रीकरणाला विरोध केला आहे.
२. मार्क्सने मानवी इतिहासात आर्थिक घटकांना महत्वाचे स्थान दिलेले आहे. त्यामुळे डॉ. आंबेडकरांना मार्क्सचा विचार मान्य नव्हता.
३. मार्क्सवादामुळे व्यक्तीस्वातंत्र्य नष्ट हाते. भांडवलशाहीच्या गुलामगिरीतून सुटून व्यक्ती ही सर्वंकष सत्तावादात सापडते आणि व्यक्तीचे जीवन गुलामगिरीसारखे यंत्रासारखे बनते. पशुपेक्षाही वाईट जीवन त्याला जगावे लागते. म्हणून आंबडेकरांनी साम्यवादाला विरोध केला.
४. साम्यवादी व्यवस्थेत एकपक्षीय हुकुमशाही असते. तेथे लोकशाही नष्ट होते. पक्षात देखील कमी लोकांच्या हातात राजकीय सत्ता केंद्रीत होते. या पाश्र्वभूमीवर डॉ. आंबेडकरांनी मार्क्सवादाला विरोध केला.

**राज्यसमाजवाद :**

डॉ. आंबेडकरांनी एका बाजुला भांडवलशाहीला विरोध केला तर दुसऱ्या बाजुस मार्क्सवादाला विरोध करुन सामाजिक समतेतुन राज्य समाजवादाचा पुरस्कार केला. डॉ. आंबेडकरांनी व्यक्ती स्वातंत्र्य आणि समाजवाद या दोन्ही पध्दतींचा समन्वय केला. समाजवादी विचार मांडतांना दुर्बल घटकांकडे विशेष लक्ष दिलेले आहे. आपल्या समाजवादात त्यांनी खाजगी मालमत्तेचा हक्क पूर्णपणे काढुल टाकलेला नाही. तर काही प्रमाणात स्वातंत्र्य दिलेले आहे. तसेच उद्योगधंद्याचे राष्ट्रीयकरण केले नाही. खाजगी मालमत्तेला उपयुक्त असलेली बाजु त्यांनी लक्षात घेतली. अशा रितीने भारतातील आर्थिक परिस्थितीचा विचार करुन त्यांनी भांडवलशाहीला आणि मार्क्सवादाला विरोध केला. तसेच राज्य समाजवादासाठी काही उपाय सुचविले ते पुढीलप्रमाणे -

### १) शेतीचे राष्ट्रीयकरण करावे -

समाजवाद निर्माण करण्यसाठी शेतीचे राष्ट्रीयकरण करावे. भारत हा शेतीप्रधान देश आहे. शेतीवरच जास्तीत जास्त लोकांचे जीवन अवलंबून आहे. मात्र शेती जुन्या पध्दतीने केली जाते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात धान्याचे उत्पादन घटले आहे. म्हणून सरकारने संपुर्ण शेती ताब्यात घ्यावी. त्यामुळे उत्पादन वाढेल आणि अन्नधान्याच्या बाबतीत देश स्वावलंबी बनेल. भांडवलदार, जमीनदार आणि सावकार गरीब शेतकऱ्यांची पिळवणूक करतात. शेतीवर राबणारा शेतकरी हा कर्जात जीवन जगतो. कर्ज डोक्यावर घेऊन मरतो. त्यांचे दारीद्रय दुर करण्यासाठी आधुनिक पध्दतीने उत्पादन केले पाहिजे.

### २) वस्तुच्या वितरणावर राज्याचे नियंत्रण असावे -

डॉ. आंबेडकरांच्या मते खऱ्या अर्थाने समाजावाद प्रस्थापित करावयाचा असेल तर उत्पादन साधनांप्रमाणेच उत्पादीत झालेल्या वस्तुंच्या वितरणावरही राज्याचे नियंत्रण असणे अत्यंत गरजेचे आहे. जनतेला वस्तु योग्य भावात मिळतात किंवा नाही हे बघण्याचे काम राज्याने करावे.

### ३) उद्योगधंद्यांवर सरकारचे नियंत्रण असावे -

समाजवाद निर्माण करण्यासाठी देशतील मोठ्या उद्योगधंद्यांवर सरकारचवे वर्चस्व असावे. समाजवादात नफा कमविणे हा करखानदारांचा हेतू नसावा. कामगारांचे कामाचे तास कमी करावेत याविषयी शासनाने नियम तयार करावेत.

### ४) इच्छेनु ार काम मिळावे :

भारतात व्यक्तींचा व्यवसाय हा त्याच्या वर्णानुसार ठरतो. त्यामुळे मोठ्या प्रमाणात व्यवसाय बंदी निर्माण झाली. प्रत्येक जातीचा व्यवसाय ठरलेला आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते प्रत्येक व्यक्तीस स्वकर्तुत्वानुसार गुणानुसार काम मिळाले तर खऱ्या अर्थाने समाजवाद यशस्वी होईल.

### डॉ. आंबेडकरांचे राज्यविषयक विचार :

राज्य हे मानव निर्मित असून मानवाला आपले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी राज्याची निर्मिती झाली. राज्य हे साध्य नसू साधन आहे, अंतर्गत शांतता आणि बाह्य आक्रमण याविरुध्द उपाय योजना करणारी यंत्रणा म्हणजे राज्य होय. प्रत्येक व्यक्तीला जगण्याचा, सुख भोगण्याचा, भाषण स्वातंत्र्याचा

अधिकार आहे. तसेच दलीत वर्गाला राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात संधी देण्यासाठी, विषमता दूर करण्यासाठी, अंतर्गत अशांतता आणि बाह्य आक्रमण यांच्यापासून प्रजेचे रक्षण करण्यासाठी राज्याची गरज आहे.

डॉ. आंबेडकरांच्या मते राज्य हे लोककल्याणकारी राज्य असावे. राज्य ही सामाजिक संघटना व्हावी आणि समाजाची आर्थिक प्रगती राज्याने घडवून आणावी.

१. राज्य हे कल्याणकारी राज्य असावे.
२. समाजाची प्रगती करावी.
३. हक्कांचे रक्षण करावे.

आर्थिक सुधारणा घडवून आणाव्यात, सामाजिक आणि आर्थिक लोकशाही निर्माण करावी. राज्याने व्यक्ती स्वातंत्र्य आणि नागरीकांचे हक्क यांचे रक्षण करावे. प्रजेने राज्याच्या आज्ञा पाळाव्यात. सर्व लोकांनी कायद्याचे पालन करावे. राज्याला सामाजीक, आर्थिक आणि राजकीय स्वातंत्र्य हे कार्य करीत असतांना व्यक्ती स्वातंत्र्यावर मर्यादा आणावी. राज्याने दलितांसाठी सामाजिक क्षेत्रात हस्तक्षेप करावा. डॉ. आंबेडकरांनी दलितांना जास्तीत जास्त महत्व दिलेले आहे.

**राज्यावरील / शासनावरील बंधने :**

१. अल्पसंख्याकांना आपले मत व्यक्त करण्याची संधी दिल्याशिवाय बहुसंख्याकांना सरकार बनविण्यास मनाई करावी.
२. प्रशासनावर कार्यकारी मंडळाचे नियंत्रण असावे.
३. अल्पसंख्याकांना मंत्रीमंडळात घेतले जावे.
४. कायदेमंडळाने केलेल्या कायद्याने समाजात बदल घडवून आणावा.

**परीक्षण / टीका :**

१. डॉ. आंबेडकरांच्या मते राज्याने व्यक्तीच्या सामाजिक क्षेत्रात हस्तक्षेप करावा. टिकाकारांच्या मते राज्याने जर सामाजिक क्षेत्रात हस्तक्षेप केला तर व्यक्तीचे स्वातंत्र्य नष्ट होऊन व्यक्ती स्वातंत्र्याचा नाश होईल.
२. डॉ. आंबेडकरांनी आल्या विचारात दलितांना महत्व दिलेले आहे. परंतु मध्यमवर्गीयांना मात्र महत्व दिलेले नाही.

३. डॉ. आंबेडकरांच्या मते राज्याने सामाजिक, आर्थिक, राजकीय, स्वातंत्र्य मिळविण्यासाठी व्यक्ती स्वातंत्र्यावर मर्यादा आणाव्यात. परंतु व्यकत्‌ी स्वातंयावर मर्यादा आल्या तर व्यक्तींच्या हक्कांवर मर्यादा येतील आणि व्यक्तींचा विकास होणार नाही.

४. डॉ. आंबेडकरांच्या मते मानवाला आपले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी राज्याची निर्मिती करण्यात आली. परंतु राज्यामुळे मानवाचे उद्दिष्ट पूर्ण होतातच असे नाही तर समाजातील इतर संघटना देखील मानवाचे उद्दिष्ट पूर्ण करतात. डॉ. आंबेडकरांवर वरील प्रकारे टीका करण्यात आली असली तरी ते एक सामाजिक कार्यकर्ते, कायदामंत्री दलितांचे कैवारी होते. घटनेचे शिल्पकार होते म्हणून तंची कामगिरी महत्वाची आहे हे विसरुन चालणार नाही.

**डॉ. आंबेडकरांचे अस्पृश्यता विषयी विचार :**

डॉ. आंबेडकरांच्या मते अस्पृश्यता ही परमेश्वर निर्मित नाही तर मानवनिर्मित आहे. मानवानेच स्वतःच्या स्वार्थासाठी ती निर्माण केली. प्राचीन काळात दोन भटक्या जमाती होत्या. त्यातील एका जमातीने दुसऱ्या जमातीचा पराभव केला. हा पराभूत झालेला गट दुसऱ्या ठिकाणी गेला कारण त्यांना स्वतःच्या रक्षणाची आणि आश्रयाची गरज होती. पराभूत झलेली जमात स्वरक्षणासाठी स्थिर व बलवान जमातीच्या आश्रयाला गेली. तेव्हा बलवान जमातीने त्यांना गावाच्या बाहेर जागा दिली. अशारीतीने गावाच्या बाहेर त्यांची स्वतंत्र वस्ती झाली. गावावर आक्रमण झाले तर त्याला तोंड देण्यासाठी या लोकांचा उपयोग करण्यात येई. या वस्तीचे लोक क्षत्रिय होते. मात्र स्थिर व्यक्तीच्या लोकांनी त्यांना अस्पृश्य बनविले आणि अशा रितीने अस्पृश्यतेचा जन्म झाला. म्हणून आंबेडकरांनी अस्पृश्यतेविषयी विचार मांडले. अस्पृश्यांचे शोषण होऊ लागले, त्यांच्याकडून सर्व स्थराची कमी प्रतीची कामे करुन घेण्यात येऊ लागली. म्हणून डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी सत्याग्रह केलेत. सामाजिक विषमता दूर करण्यसाठी त्यांनी प्रयत्न केले. अस्पृश्यांच्या विकासासाठी डॉ. आंबेडकरांनी आपले विचार मांडले.

१. राज्यघटनेत स्पृश्यांप्रमाणेच अस्पृश्यांना समान अधिकार असावा.

२. जे लोक अस्पृश्यता पाळत असतील त्यांना दंड आणि शिक्षा झाली पाहिजे.

३. सरकारने सामाजिक बहिष्कार टाकणाऱ्यांवर कायद्यामार्फत शिक्षा करावी.

४. कायदे मंडळात अस्पृश्यांना योग्य प्रतिनिधीत्व द्यावे.

सरकारी नोकरीत त्यांना आरक्षण द्यावे आणि मंत्रीमंडळातही अस्पृश्य लोकांना सामावून घेण्यात यावे.

***

## प्रकरण ८

# विनायक दामोदर सावरकर

**जीवन परिचय -**

विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म २८ मे १८८२ मध्ये नाशिक जिल्ह्यातील भगूर या गावी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण आणि माध्यमिक शिक्षण नाशिक येथे झाले आणि महाविद्यालयीन शिक्षण पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये झाले. सावरकरांनी जहाल व क्रांतीकारक मार्गाचा अवलंब करुन त्याकाळी स्वातंत्र्य प्राप्तीसाठी प्रयत्न केले होते. ते बॅरीस्टर होण्यासाठी १९०६ मध्ये इंग्लंडला गेले. तेथे देखील त्यांनी गुप्त संघटनेचे कार्य केले. सावरकरांच्या प्रभावाने मदनलाल धिंग्रा यांनी सर कर्झन वायलीचा खून केला. भारताच्या स्वातंत्र्यासाठी आंतरराष्ट्रीय मदत कशाप्रकारे मिळेल यासाठी त्यांनी प्रयत्न केला. त्यांच्या क्रांतीकारी हालचालींमुळे त्यांना १९१० मध्ये अटक करण्यात आली. राजकारणात कोणत्याही प्रकारचा भाग घेऊ नये. याविषयी त्यांच्यावर बंदी घालण्यात आली. हिंदूंच्या वाईट रुढींवर त्यांनी टिका केली. हिंदूना संघटीत करुन त्यांच्यात जागृती निर्माण करण्यास त्यांनी भरीव मदत केली. त्यांनी हिंदू राष्ट्रासंबंधी विचार सामाजिक विचार, सैनिकीकरणाबाबतचे विचार अहिंसा आणि स्वातंत्र्यासंबंधी विचार त्यांनी मांडलेले आहेत. अशा या थोर महत्म्याचा मृत्यु २६ फेब्रुवारी १९६६ मध्ये झाला.

**वि.दा. सावरकर यांचे हिंदू राष्ट्रवादाविषयी विचार :**

सावरकरांची राष्ट्रवादाची कल्पना वैशिष्ट्यपूर्ण होती. हिंदू राष्ट्रवादाची कल्पना स्पष्ट करतांना राष्ट्रवाद, हिंदुत्व आणि हिंदू मुस्लीम संबंध या तीन घटकांचा विचार करणे महत्वाचे आहे आणि त्यावरुन त्यांनी हिंदू राष्ट्रवादाची कल्पना मांडलेली आहे.

**अ) राष्ट्रवाद :**

**प्रा. बार्कर यांच्या मते,** "विशिष्ट भू-प्रदेशावर वस्ती करुन राहणारा जनसमुदाय म्हणजे राष्ट्र होय."

**प्रा. बर्जिस यांच्या मते,**

"भौगोलिक एकता असलेल्या प्रदेशात वस्ती करणारा आणि वांशिक एकता असणारा जनसमुदाय म्हणजे राष्ट्र होय."

राष्ट्राच्या जडणघडणीत धर्म, भाषा, वांशिकता, संस्कृती भौगोलिक एकात्मता हे घटक महत्वपूर्ण असतात. त्याचबरोबर आपण इतरांपेक्षा वेगळे आहोत. इतरांपेक्षा श्रेष्ठ आहोत यालादेखील महत्व आहे. समाज जर पारतंत्र्यात असेल तर तो समाज स्वातंत्र्य मिळविण्यासाठी संघटीत बनणे म्हणजे राष्ट्रस्वरुप बनणे. तसेच समाज जर स्वतंत्र असेल तर त्या समाजाने आपल्याला मिळालेले स्वातंत्र्य टिकविण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे. म्हणजे त्या समाजात एकत्र, संघटीतपणा राहिला पाहिजे.

**ब) हिंदूत्व :**

सावरकरांच्या मते हिंदू समाज हा राष्ट्रस्वरुप आहे. हे स्पष्ट करण्यासाठी त्यांनी हिंदूत्वाचे स्पष्टीकरण केले आहे. हिंदु हा शब्द प्राचीन काळापासून प्रचलीत आहे. प्राचीन काळी आर्य लोक भारतात आले आणि ते सिंधु नदीच्या काठी राहू लागले. कालातंतराने लोकसंख्या वाढल्याने हे लोक अन्य भागात पसरले. पार्शीयन लोक त्यांना सप्तसिंधु म्हणत असत. काळाच्या ओघात 'स' चा 'ह' झाला आणि सप्त हा शब्द बाजुला पडला आणि 'हिंदू' हा शब्द रुढ झाला. म्हणून हिंदू नावाशिवाय दुसरा पर्याय नाही असे सावरकर म्हणतात. आपले नाव परकीयांनी हिंदू ठेवले आहे. व्यक्तीचे नाव इतरांनी ठेवायचे असते. तोच निष्कर्ष हिंदू राष्ट्राच्या बाबतीत आहे. नावात विशेष काय आहे. कारण नावाने ती व्यक्ती ओळखली जात असते. हिंदू समाज पूर्वीपासून भारतीय भूमीत एकरुप झालेला आहे, म्हणून हिंदू समाज राष्ट्रस्वरुप आहे.

हिंदूत्वाची व्याख्या करतांना हिंदू कोणाला म्हणावे याचेदेखील स्पष्टीकरण सावरकरांनी केले आहे. ज्या व्यक्तींची पितृभूमी, पुण्यभूमी आणि धर्मभूमी हिंदुस्थान असेल त्या व्यक्तीला हिंदू म्हणावे म्हणजे ज्या व्यक्तींचा जन्म हिंदूस्थानात झाला असेल आणि त्याचबरोबर ज्या व्यक्तीचे धर्मसंस्थापक हिंदूस्थानात जन्माला आले असतील अशा व्यक्तींना हिंदू म्हणावे. याबाबतीत त्यांनी पुन्हा 'बौध्द', 'शीख' आणि 'जैन' यांना हिंदू म्हणावे का याचे उत्तर देतांना त्यांनी असे म्हटले आहे की, या धर्माचे धर्म संस्थापक भारतातच जन्माला

आल्यामुळे त्यांना हिंदू म्हणता येईल कारण त्यांची पुण्यभूमी हिंदुस्थान आहे. परंतु मुस्लीम आणि ख्रिश्चन यांची पुण्यभूमी आणि धर्मभूमी हिंदुस्थान नसल्यामुळे त्यांना हिंदु म्हणता येणार नाही. हिंदूंच्या बाबतीत त्यांनी धर्म निष्ठा, भूमीनिष्ठा आणि पुण्यभूमी इ. घटकांना विशेष महत्व दिलेले आहे.

**क) हिंदू - मुस्लीम संबंध :**

सावरकर हे मुस्लीम विरोधी नव्हते. उलट त्यांचे काही सहकारी मुस्लिम बांधव होते. हिंदू-मुस्लीम सबंधांचा विचार करतांना सांस्कृतिक, सामाजिक आणि राजकीय या क्षेत्राचा अभ्यास करावा लागतो. त्यांच्या मते या तिन्ही क्षेत्रात हिंदू मुस्लीमांचे संबंध चांगले होऊ शकले नाहीत. कारण की ब्रिटीशांनी फोडा आणि झोडा या नितीचा अवलंब करुन हिंदूंपासून मुस्लीमांना वेगळा करण्याचा प्रयत्न केला. मुस्लिम हे अल्पसंख्यांक असल्यामुळे त्यांना हिंदूंची भिती वाटत होती. कॉंग्रेसचे काही नेते फुटीरवादाचे राजकारण खेळत होते. मुस्लीमांच्या मागण्या मान्य करतांना हिंदूच्या हक्कांना वेगळेपणा देण्यात आला. हिंदुस्थान अखंड रहावा यासाठी सावरकरांनी खूपच प्रयत्न केले. त्यांच्यामते भारतात अल्पसंख्यांकांवर अन्याय होणार नही. स्वतंत्र विभक्त मतदार संघ असणार नाही. बहुसंख्य हिंदूंना विशेष सवलती आणि हक्क मिळणार नाहीत. सर्वांना समान वागणूक दिली जाई असे मत सावरकरांनी मांडले.

२) भौगोलिक एकता
३) सांस्कृतिक एकता
४) धार्मिक एकता
५) वांशिक एकता
६) भाषिक एकता

**१) भौगोलिक एकता :**

भौगोलिक एकतेच्या दृष्टीने हिंदूंची भूमी हिंदूस्थान आहे. हिंदूस्थानच्या उत्तरेला हिमालय पर्वत आहे आणि दक्षिणेला हिंदी महासागर आहे, पुर्वेला बंगालचा उपसागर आहे. आणि पश्चिमेला अरबी समुद्र आहे. त्यंनी हिंदूस्थानचे क्षेत्र निश्चित केलेले आहे.

**२) सांस्कृतिक एकता :**

हिंदूंनी केलेली प्रगती त्यांची संस्कृती दर्शविते. प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत त्यांनी जीवनाच्या अनेक क्षेत्रात यश प्राप्त केले आहे. कला, साहित्य, शास्त्रीय संशोधन इ. क्षेत्रातील यश हिंदूंना अभिमामास्पद वाटत असते. सांस्कृतिकदृष्ट्या हिंदू समाज एकात्म आहे. रविंद्रनाथ टागोर हे जरी बंगालमधील असले तरी महाराष्ट्रातील हिंदूंना त्यांच्याविषयी अभिमान वाटत असतो. म्हणून सांस्कृतिक दृष्टीकोनातून हिंदूंमध्ये एकता असल्यामुळे हिंदू राष्ट्रस्वरुप आहे.

**३) धार्मिक एकता :**

धार्मिकदृष्ट्या हिंदू एकात्म आहे. कारण भारत ही हिंदूंची धर्मभूमी आहे. हिंदूंचा धर्म या भूमतीच जन्माला आला. भगवद्गीता, वेद, रामायण व महाभारत इ. धर्मग्रंथ या देशातच रचले गेले. ख्रिश्चन व मुसलमान यांची धर्मभूमी देशाबाहेर आहे. भारत ही त्यांची कर्मभूमी असली तरी धर्मभूमी वेगळी आहे.

**४) वांशिक एकता :**

सावरकरांच्या मते वांशिक दृष्टीने हिंदू समाज एकात्म आहे. ते एकाच रक्ताचे आहेत. जगात कोठेही वांशिक शुध्दता दिसून येत नाही. सर्वत्र वंश एकमेकांत मिसळलेले आहेत. जर्मन आणि इंग्लंड राष्ट्रे वांशिक दृष्टीने एकात्म नसताना देखील स्वतःला राष्ट्रस्वरुप म्हणत असतात. त्यादृष्टीने हिंदूंमध्ये देखील राष्ट्रविषयक भावना निर्माण होऊ शकते. म्हणून सावरकरांच्या मते वांशिक शुध्दता नसली तरी हिंदू हे राष्ट्र आहे.

**५) भाषिक एकता :**

भाषा आणि लिपीच्या दृष्टीने विचार केला तर हिंदू हे राष्ट्र आहे. भारतात जरी अनेक भाषा, उपभाषा असल्या तरी या सर्व भाषांची जननी संस्कृत भाषा आहे. या भाषेला धार्मिक आणि सांस्कृतिक महत्व आहे. संस्कृत ही भाषा जरी सर्वसामान्य लोकांची भाषा नसली तरी त्या भाषेच्या जागी हिंदी ही राष्ट्रभाषा बनू शकेल असे त्यांचे मत होते.

**हिंदू राष्ट्रवादावरील परीक्षण/टिका :**

सावरकरांनी हिंदू राष्ट्रवादाची जी कल्पना मांडली आहे ती कल्पना गणिती पध्दतीने मांडलेली आहे. राष्ट्र बनण्यासाठी आवश्यक असलेले सर्व घटक हिंदू समाजात आहेत असे जरी दाखवून दिले असले तरी ते परीपूर्ण स्वरुपाचे राहत नाही. त्यांची हिंदूराष्ट्रवादाची कल्पना काही प्रमाणात संकुचीत स्वरुपाची वाटते. धर्म, भाषा, वांशिकता, सांस्कृतिक एकात्मता या गोष्टींना महत्व दिले असले तरी परीपूर्ण हिंदू राष्ट्र बनण्याच्या दृष्टी ने त्यात अपूर्णता आहे ती अपूर्णता पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**१. भाषिक एकता नाही :**

सर्व भाषांची जननी जरी संस्कृत भाषा असली तरी ती सर्वसामान्यांची भाषा बनू शकली नाही. तसेच हिंदी ही भाषा देशाच्या सर्वच भागांमध्ये विकसित झाली नाही. विशेषतः प्रादेशिक भाषेला बहुतेक घटक राज्यांमध्ये महत्व प्राप्त होत आहे. दक्षिण भारतीय लोक हिंदी भाषेला परकीय भाषा मानतात. तर इंग्रजी ही आपली भाषा मानतात म्हणून भाषेच्या मुद्यावरुन संपूर्ण देशात दोन भाग झालेले आहेत. त्यामुळे भाषेच्या आधाराने राष्ट्राची कल्पना मान्य करता येत नाही.

**२. वांशिक एकता नाही :**

हिंदू लोकांमध्ये वांशिक एकात्मता आहे असे सावरकर म्हणतात. परतु इतिहासाने असे स्पष्ट केले आहे की, अनेक वंशांनी हिंदूंची वंश शुध्दता नष्ट केलेली आहे. द्रविड वंश, नागवंश इ. वंशाने हिंदूची वांशिक शुध्दता नष्ट केलेली आहे.

**३. धार्मिक एकता नाही :**

धर्माच्या आधारावर हिंदू समाज एकजिनसी होऊ शकला नाही. त्यामानाने इस्लाम आणि ख्रिश्चन या धर्मात एक ग्रंथ प्रेरीत आहे. हिंदू धर्मात अनेक ग्रंथ आहेत. त्याचप्रमाणे हिंदू धर्मात मात्र अनेक पंथ, उपपंथ आहेत. हिंदू समाजात असणारी जातीव्यवस्था त्या समाजाचे विभाजन करीत आहे. तसेच बौध्द व शिख आणि जैन या धर्माचे लोक स्वतःला हिंदू म्हणून घ्यायला तयार नाही. म्हणून धर्मात एकात्मता आपल्याला दिसून येत नाही.

**४. सांस्कृतिक एकता नाही :**

हिंदू लोकांच्या एकात्मतेचा प्रश्न सांस्कृतिक दृष्टीने सुटण्यासारखा नाही. कारण त्यांची संस्कृती संमिश्र स्वरुपाची आहे. राहणीमान, कपडे, खाणे-पिणे इ. बाबतीत एकजीनसीपणा नाही. दक्षिण भारतीय लोकांवर द्रविड संस्कृतीचा प्रभाव पडलेला आहे. तर उत्तर भारतीय लोकांवर आर्य संस्कृतीचा प्रभाव पडलेला दिसून येतो. म्हणून राष्ट्र बनण्यासाठी समान संस्कृती हा घटक फारसा प्रभावी ठरत नाही.

सावरकरांच्या राष्ट्रविषयक संकल्पनेवर परीक्षण करतांना वरील प्रकारच्या उणिवा प्रामुख्याने दिसून येतात. म्हणून काही विचारवंतांचया मते विशेषतः काँग्रेसमधील काही नेत्यांच्या मते हिंदू राष्ट्राच्या जडणघडणीत भूमी या घटकाला विशेष महत्व दिले पाहजे. जे जे घटक भारतीय भूमीत जन्मलेले असतील त्यांच्यात भाषिक एकात्मता निर्माण होऊ शकते. परंतु सावरकर भूमी या घटकाला एकमेव घटक मान्य करायला तयार नाहीत. कारण केवळ भूमीला महत्व दिले तर या भूमीवर निष्ठा असणारे मुस्लिम, ख्रिश्चन तसेच बिगर हिंदू लोक राष्ट्राच्या कक्षेत येतात. सावरकरांनी राष्ट्र ही संकल्पना हिंदू या शब्दाने निश्तिचत केली असून तो शब्द पितृभूमीत आणि पुण्यभूमीत बंदिस्त केला आहे. म्हणून सावरकरांची राष्ट्रविषयक कल्पना व्यवहारीक पातळीवर मान्य होण्यासारखी नाही. त्यांची हिंदुत्वाची संकल्पना मोठ्या प्रमाणावर लोकप्रिय ठरु शकली नाही. तसेच राष्ट्रविषयक कल्पनादेखील पूर्णपणे मान्य होऊ शकली नाही. सावरकरांनी हिंदुत्व आणि हिंदू राष्ट्राची संकल्पना त्यावेळी प्रामुख्याने हिंदूमध्ये संघटन व्हावे यादृष्टीने निर्माण केली होती. कारण हिंदूआणि मुस्लिम यांच्यात कधीही संघर्ष होणार नाही असे त्यांना वाटत होते. परंतु असंघटीत हिंदू आणि संघटीत मुस्लीम यामुळे मुस्लीमांचे हिंदूवर प्रभुत्व निर्माण होऊ शकेल म्हणून त्यांचे असे मत होते की आपली स्वतःची भूमी हिंदुस्थान नसतांना ब्रिटीशांची गुलामगिरी आपण पत्करणार नाही. म्हणून त्यांनी 'हिंदूनो संघटीत व्हा, सशक्त बना' असा मंत्र दिला. परंतु हिंदुमध्ये संघटन निर्माण झाले नाही. आणि त्यांच्याच कालखंडता मुस्लीम समाजाचे पाकिस्तान हे नविन राष्ट्र निर्माण झाले. म्हणून त्यांची राष्ट्रविषयक संकल्पना पूर्णपणे व्यावहारीक दृष्टीने अयशस्वी ठरलेली आहे.

**वि.दा. सावरकरांचे सामाजिक विचार :**

सावरकरांनी आपल्या सामाजिक विचारांच्या बाबतीत हिंदू समाजात सामाजिक परीवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. सावरकर हे राजकीय क्षेत्रात जसे क्रांतीकारक होते तसे सामाजिक क्षेत्रात देखील क्रांतीकारक होते. सावरकरांनी हिंदू समाजातील जातीव्यवस्थेवर प्रामुख्याने टिका केली. कारण या जातीव्यवस्थेमुळे श्रेष्ठ-कनिष् भेदापोटी हिंदू समाज विकसीत झाला होता. त्यावेळेच्या परिस्थितीत वरीष्ठ जाती कनिष्ठ जातींवर मोठ्या प्रमाणात अन्याय करीत होते. त्याचा परीणाम असा होत होता की, कनिष्ठ जाती स्वत:ची इच्छा नसतांना धर्मांतर करीत होत्या. त्यामुळे हिंदू समाजाचे सामर्थ्य कमी होत होते. सावरकरांनी जातीव्यवस्थेला हिंदू समाजाचे वैशिष्ट्य मानले होते. आंतरजातीय विवाह हिंदू समाजात मर्यादित केले होते. आंतरजातीय विवाहाला पूर्णपणे बंदी होती. व्यक्तीचा व्यवसाय जातीने बंदीस्त केला गेला. जातीमुळे समाजाचे तुकडे होत होते. आशा जातीय व्यवस्थेच्या वैशिष्ट्यांमुळे हिंदू समाज प्रगती करु शकत नव्हता. ह्या जातीव्यवस्थेला धर्माचा आधार नसल्यामुळे ती अधिकच कठोर बनली होती. कनिष्ठ जातीच्या माणसाच्या स्पर्शाने देखील वरीष्ठ जातीच्या माणसांची शुध्दता कमी कमी होत होती अशी कल्पना त्यावेळी रुढ झाली होती. एवढेच काय एकाच जातीत देखील स्पृश्य अस्पृश्य मानले जात होते. पुजा करणाऱ्या ब्राम्हणाला इतर कोणत्याही व्यक्तीचा स्पर्श होता कामा नये असा दंडक होता. सावरकरांनी या सर्व गोष्टींवर मोठ्या प्रमाणावर टिका केली. स्वातंत्र्यपूर्व काळात बुध्दीमान हिंदू तरुणांनी सामाजिक परीवर्तनाच्या बाबतीत कोणकोणते प्रयत्न केले पाहिजेत यासाठी त्यांनी तरुणांना संघटीत करुन लोकशिक्षण देण्याचा प्रयत्न केला. हिंदू धर्मातील अनिष्ठ रुढी परंपरा नष्ट झाल्या पाहिजेत. हिंदू समाज प्रागतिक बनला पाहिजे असे त्यांना वाटे. त्यांच्या कालखंडात न्या. रानडे यांनी देखील सामाजिक परीवर्तनाच्या बाबतीत प्रयत्न केले होते. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, शाहू महाराज यांनी देखील हिंदू समाजातील जातीयता नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले. जातीयता ही जन्मावर आधारलेली नसते.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी आपल्या सामाजिक विचारात हिंदू समाजात परीवर्ततन होण्याच्या दृष्टीकोनातून जो समाज सात बंधनांमध्ये अटकलेला होता जोपर्यंत बंधनांमधून सुटका होत नाही तोपर्यंत हा समाज प्रगती करु शकणार नाही. वि.दा. सावरकरांनी सांगितलेली बंधने पुढीलप्रमाणे -

१. वेदबंदी
२. व्यवसायबंदी
३. स्पर्श बंदी
४. सिंध्‌ु ा बंदी
५. शुध्द बंदी
६. रोटी बंदी
७. बेटी बंदी

**१. वेदबंदी :**

वेदांचा अभ्यास वरीष्ठ जातीलाच करण्याचा अधिकार होता. म्हणून सावरकर म्हणतात वेद ही सर्व हिंदूंची संपत्ती आहे. ती कोणत्याही एका जातीची खाजगी मालमत्ता नाही. म्हणून वेदाच्या अभ्यासाला बंदी हा सामाजिक अन्याय आहे म्हणून त्यांनी वेदांचा अभ्यास सर्व जातींना करण्याची संधी प्राप्त झाली पाहिजे. वेदबंदी ही सामाजिक बंदी सोडली गेली तर हिंदू समाजात परीवर्तन होईल.

**२. व्यवसाय बंदी :**

जाती आणि पोटजातींमुळे समाजाचे व्यवसायिक रुपांतर झाले होते. लोहाराच्या मुलाने लोहारच व्हावे ही कल्पना त्यावेळी रुढ झाली होती. यामुळे त्या व्यक्तीवर तो अन्याय होत होता. त्या व्यक्तीला जर लोहार व्यतीरीक्त इतर कामे करण्याची आवड असेल किंवा तिच्या अंगी इतर गुण असतील तर त्या गुणांचा विकास करण्याची संधी त्या व्यक्तीला मिळत नव्हती. ही व्यवसाय बंदी तोडण्यासाठी सावरकरांनी समाजातील कोणत्याही व्यक्तीला आपल्या आवडीनिवडी नुसार व्यवसाय करण्याची संधी दिली पाहिजे.

**३. स्पर्ष बंदी :**

अस्पृश्यता ही एक मोठी बंदी आहे. म्हणून सावरकरांनी स्पर्श बंदीची बेडी सोडण्यासाठी खूप प्रयत्न केले. अस्पृश्यतेला वेदाचा आधार असेल तर आपण वेद मानणार नाहीत असे सावरकरांनी सांगितले.

**४. सिंधू बंदी :**

हिंदू लोकांना समुद्र पर्यटनावर बंदी होती. जर एखाद्या हिंदूने समुद्र पर्यटन केल `तर ती व्यकती हिंदू राहत नाही अशी समजुत त्याकाळी होती. या समजुतीमुळे हिंदूंचे व्यापारी दृष्टीने नुकसान झाले आहे. असे सावरकरांचे मत होते. म्हणून त्यांनी समुद्र पर्यटनामुळे एखाद्या हिंदूचे हिंदुत्व कमी केले जाणार नाही यासाठी प्रयत्न केलेत.

**५. शुध्द बंदी :**

धर्मांतराच्या बाबतीत ज्या व्यक्तीने हिंदू धर्म सोडून इतर धर्म स्विकारला असेल तर त्या व्यक्तीला हिंदू धर्माचे दरवाजे कायम स्वरुपात बंद केले जातात. ही गोष्ट हिंदू राष्ट्राच्या दृष्टीने हानीकारक आहे. कारण त्यामुळे हिंदूंचे संख्याबळ कमी होत होते आणि ज्या व्यक्तीने मुस्लीम धर्म स्विकारलेला असेल अशी व्यक्ती खऱ्या मुस्लिमांपेक्षा बाटलेला मुस्लीम हा हिंदूंचा अधिक वैरी बनत होता. म्हणून सावरकरांनी एखाद्या वेळी जातीच्या लोकांनी इच्छा नसतांना धर्मांतर केल्यास अशा व्यक्तीला पुन्हा हिंदू धर्मात जावे यासाठी शुध्द बंदी ही सामाजिक बेडी समाजातून काढण्याचा सावरकरांनी प्रयत्न केला.

**६. रोटीबंदी :**

हिंदू समाजातील जातीव्यवस्था इतकी कठोर होती की कोणत्याही जातीचे आंतरजातीय भोजन हे पाप मानले जात होते. एका जातीच्या लोकांनी दुसऱ्या जातीच्या लोकांबरोबर जर भोजन केले तर हिंदू बाटले गेले असे समजले जात होते. म्हणून सावरकरांनी समाजातल्या कोणत्याही जातीच्या उपजातीच्या व्यक्तीबरोबर कोणीही भोजन केले तर त्यांच्यात धर्मांतराची प्रक्रिया केली जाउ शकणार नाही अशी शेवटी बंदी सामाजिक बेडी नाहीशी करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

**७. बेटी बंदी :**

हिंदू समाजात आंतरजातीय विवाहाला पूर्णपणे बंद होती. परंतू सावरकरांनी वधुवरांच्या पसंतीने आतरजातीय विवाहाला त्यावेळी मान्यता दिली होती. परंतु त्या बाबतीत त्यांचे असे मत होते की, हिंदू मुलीने कोणत्याही परिस्थितीत अहिंदु मुलांशी विवाह करता कामा नये आणि याउलट अहिंदु मुलीने जर हिंदू मुलाशी विवाह केला तर तो विवाह सावरकर मान्य करीत होते. म्हणजेच हिंदू राष्ट्राच्या सामर्थ्याच्या दृष्टीकोनातून असा विचार त्यावेळी सावरकरांनी मांडला होता.

सामाजिक सुधारणांच्या बाबतीत जोपर्यंत समाज वरील सात प्रकारच्या बंधनातून पुर्णपणे मुक्त होत नाही तोपर्यंत भारतात सामाजिक परिवर्तन अशक्य आहे. सावरकरांनी त्यावेळी ब्राम्हण वर्गावर टिका केली. ब्राम्हणांनी समाजावरील आपले वर्चस्व स्थिर रहावे यासाठी जातीय व्यवस्था कठोर केली. परंतु सावरकरांनी अशा वरीष्ठ वर्गावर टिका करुन समाज घटकांना बरोबर नेण्याचा प्रयत्न केला. वरीष्ठ वर्गामध्ये त्यांनी फक्त ब्राम्हण वर्गावरच टिका केली नाही तर कनिष्ठ वर्गावरही टिका केली आहे. कारण कनिष्ठ वर्गात देखील किंवा जातीत देखील स्वतःला ब्राम्हण समजणारे काही घटक होते. उदा. एखाद्या भंगी हरीजनांच्या विहीरीवर पाणी भरत असेल तर तो हरीजनला चालत नसे. म्हणजे हरीजन हा भंगीच्या दृष्टीने ब्राम्हण आहे असे समजले जात असे. अशा प्रकारे सावरकरांनी त्यावेळच्या समाजरचनेचा सखोल अभ्यास करुन श्रेष्ठांमध्ये श्रेष्ठ-कनिष्ठ आणि कनिष्ठांमध्ये श्रेष्ठ-कनिष्ठ यांच्यातले अंतर्गत संघर्ष कसे दूर होतील यासाठी त्यांनी काही कार्यक्रम आयोजित केले होते. उदा. सार्वजनिक भोजनाचा कार्यक्रम, आंतरजातीय विवाह, स्त्रियांचे हळदी-कुंकवाचे कार्यक्रम आयोजित करुन हिंदू समाजात एकत्व आणि संघटीतपणा आणण्याचा त्यावेळी सावरकरांनी प्रयत्न केला होता.

**सावरकरांचे सैनिकीकरणाबाबत विचार :**

सावरकरांनी देशाच्या संरक्षणासाठी सैनिकीकरणाचा विचार केलेला आहे. देशाची सुरक्षितता समाजाच्या एकात्मतेवर आणि लष्करी सामर्थ्यावर अवलंबून असते. ज्या प्रमाणे प्रत्येक व्यक्तीला आपले स्वतःचे संरक्षण करणे ही प्रवृत्ती वाटत असते त्याप्रमाणे देशाच्या दृष्टीने देखील देशाच्या संरक्षणाची

जबाबदरी घेतांना त्यांनी सैनिकीकरण हा मंत्र सांगितलेला आहे. कोणत्याही देशाला युध्दाची आणि परकीय आक्रमणाची सतत भिती असते अशा वेळी शांततेचे मार्ग अपुरे पडत असतात. सावरकरांनी भारतासमोर असलेल्या समस्यांचा सखोल विचार केला त्यावेळी भारताला परकीय शत्रुपासून स्वातंत्र्य मिळवायचे होते. ब्रिटीश लोक जरी चां ंगले असले तरी भारताविषयी त्यांचा दृष्टीकोन फुटीरवादाचा होता. भीक मागून याचना करुन स्वातं ंत्र्य मिळणार नाही यासाठी भारतीयांनी संघटीत झाले पाहिजे. असे सैनिकीकरण जेव्हा भारतात होईल तेव्हा बाह्य घटकावर त्यांचा दबाव पडेल असे सावरकरांचे मत होते. सैनिकीकरणाच्या बाबतीत सावरकरांनी सतत विचार केला. कारण सैनिक म्हणून आणि लष्करी सामर्थ्याच्या दृष्टीने भारतातील लोक पूर्णपणे मागासलेले होते. जर भारतात पूर्णपणे सैनिकीकरण झाले तर त्यांना युध्दपध्दती, युध्द साहित्य यांचा परिचय होईल. सावरकरांची देशभक्ती प्रखर स्वरुपाची असल्यामुळे त्यांना असे वाटत होते की, आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताची शान जर टिकवायची असेल तर सैनिकीकरणाचा यज्ञ महत्वाचा आहे. कारण परकीयांच्या मनात भारताच्या लष्करी सामर्थ्यामुळे भिती निर्माण होईल आणि भारतावर कोणीही आक्रमण करण्याचा विचार करणार नाही. सैनिकी शिक्षणाचा प्रसार तरुणांमध्ये झाला पाहिजे. सैनिकी शिक्षणाच्या शाळा सुरु कराव्यात. भारतात जेवढ्या शिक्षण संस्था असतील त्या सैनिकी शिक्षण संस्था बनल्या पाहिजेत. म्हणून त्यांनी भारतातील तरुणांना असे सांगितले की लेखण्या सोडा, तलवारी घ्या, शाईने लिहू नका, रक्ताने लिहा असा संदेश देण्यामागे एकच हेतु होता की हिंदू समाज संघटीत होऊन स्वातंत्र्य मिळविण्याच्या दृष्टीकोनातून परीपक्व बनू शकेल.

**वि.दा सावरकरांचे विषयी विचार :**

सावरकर हे क्रांतीकारक होते. त्यांना महात्मा गांधीने मांडलेली अहिंसेची कल्पना मान्य नव्हती. म. गांधींच्या मते उदात्त ध्येय साध्य करण्यासाठी साधने देखील तितकीच चांगली असली पाहिजे. सावरकरांना हे मान्य नव्हते. उदात्त ध्येय असेल तर त्यासाठी कोणत्याही साधनांचा वापर करावा. त्यावेळी भारतापुढे उदात्त ध्येय म्हणजे स्वातंत्र्य मिळविणे. हे ध्येय साध्य करण्यासाठी त्यांनी अहिंसेचा मंत्र सांगितलेला नाही. स्वातंत्र्य

मिळविण्यासाठी वेळ प्रसंगी हिंसा करावी लागली तरी भारतीयांनी मागे पुढे पाहू नये. कारण अशी हिंसा अनैतिक स्वरुपाची ठरत नाही. स्वातंत्र्य प्राप्तीसाठी सनदशीर मार्ग निरुपयोगी ठरतात. त्यावेळी हिंसात्मक मार्ग पत्करल्याशिवाय गत्यंतर नसते. ब्रिटीश लोक भारतीय जनतेवर अन्याय, अत्याचार करतात आणि फुटीरवादाचे धोरण आखतात आणि आपण शांत बसावे हे त्यांना मान्य नव्हते. आपण देखील दहशतवाद निर्माण केला पाहिजे. वेळप्रसंगी ब्रिटीश अधिकाऱ्यांचे वध केले तरच ब्रिटीशांना आपली भिती वाटेल म्हणून त्यांनी अहिंसात्मक मार्गापेक्षा हिंसेचा मार्ग स्वातंत्र्यप्राप्तीसाठी आवश्यक मानले आहे. अहिंसा वादामुळे राष्ट्र हे दुर्बल बनत असते. हिंसा ही नेहमी विघातक स्वरुपाची असते असे नही तर ती पवित्र देखील असते. या संदर्भात त्यांनी इतिहासाचे दाखले दिले. अनेकवेळा चांगले ध्येय साध्य करण्यासाठी हिंसेचा वापर केला जातो. उदा. शिवाजी महाराजांनी अफजलखनाचा केलेला वध ही एक पवित्र हिंसा होती. म्हणून न्यायप्राप्तीसाठी, स्वरक्षणासाठी आणि स्वातंत्र्यप्राप्तीसाठी काही वेळेला हिंसेचा वापर करावाच लागतो.

**सावरकरांचे अहिंसेविषयी विचार :**

स्वातंत्र्य हा प्रत्येक व्यक्तीचा, समाजाचा जन्मसिध्द हक्क असतो आणि तो कोणत्याही मार्गाने तसेच कोणत्याही साधनेने प्राप्त करुन घेणे योग्य असते. वि. दा. सावरकरांनी भारतभूमीसाठी मोलाची कामगिरी केलेली दिसून येते. भारताच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. स्वातंत्र्य काळातील भारतातील शासन कशाप्रकारे असावे याबाबतीत त्यांनी आपले विचार मांडलेले आहेत.

१) शासनाने अन्यायाचे उच्चाटन करावे. देशातील राज्यकारभार घटनेनुसार चालावा.

२) स्वातंत्र्यानंतरच्या काळातही भारतीय तरुणांना लष्करी शिक्षण द्यावे. देशाची संरक्षण व्यवस्था मजबूत करावी. भारताने दुसऱ्या राष्ट्रावर आक्रमण करु नये. भारताची संरक्षण व्यवस्था इतकी मजबूत असावी की , परकीय देश भारतावर आक्रमण करु शकणार नाही.

३) राज्यपध्दती लोकसत्ताक असावी आणि एक व्यक्ती एक मत याप्रमाणे निवडणूका घेण्यात याव्यात. अल्पसंख्याकांना योग्य हक्क

आणि स्वातंत्र्य द्यावे. तरी केवळ अल्पसंख्यांक म्हणून ज्यादा हक्क आणि ज्यादा सवलती देऊ नयेत.

४) बहुसंख्य लोकांची भाषा आणि लिपी ही राष्ट्रभाषा झाली पाहिजे.

५) विरोधी पक्षाने विरोधासाठी विरोध करु नये. चांगल्या कार्यासाठी सत्तारुढ पक्षाला सहकार्य करावे.

सावरकरांनी भारताच्या संघराज्याला विरोध केला. कारण त्यांनी एकमुखी भारतीय राज्याचा पुरस्कार केलेला आहे. त्यांच्या मनात भारताविषयी एकात्मतेची भावना होती. त्याचप्रमाणे एकात्मतेची भावना लोकांमध्ये निर्माण होण्यासाठी त्यानी प्रयत्न केले. त्यांनी एकसंघ भारताचा पुरस्कार केला.

**सावरकरांचे यंत्र आणि यंत्रयुग याबाबतचे विचार :**

सावरकर हे सनातनी प्रतिगामी होते अशी त्यांच्यावर टिका केली जाते. परंतू ते आधुनिक विचारसरणीचे होते. परंतू सावरकरांनी रुढी, प्रथा, परंपरा या जशाच्या तशा न स्विकारता ज्या उपयुक्त आहेत त्यांचाच स्विकार करावा आणि ज्या कालबाह्य झाल्या असतील त्या टाकून द्याव्यात. आज भारतीय समाज अनिष्ट रुढी, प्रथा, परंपरा यांच्यात अडकलेला आहे त्यातून बाहेर काढण्यासाठी भारतीयांनी आपली प्रगती शासकिय तत्वांवर करावी असे जपान, इंग्लंड येथील लोकांची जी प्रगती केलेली आहे तशीच प्रगती भारतीय लोकांनी करावी. हिंदूंनी मागे न राहता यंत्र आणि यंत्रयुगाचा स्विकार करावा. सावरकरांच्या मते युरोपियन लोकांनी विज्ञानात आणि यंत्रयुगात जी प्रगती केलेली आहे त्यामुळे ते आपल्यापेक्षा बरीच वर्ष प्रगतीने पुढे आहेत.

सावरकरांच्या मते यंत्रयुगामुळे भौतिक व्यापाराशी जुळवून घेता आले पाहिजे. कारण विज्ञान जन्य निश्चिती ही यंत्रशील पणाची जननी असते. यंत्रयुगात युरोपने देखील खूप प्रगती केली. आपल्या देशाने प्रगती करावयाची असेल तर विज्ञाननिष्ठ झाले पाहिजे. कारण विज्ञानातील यंत्र हत्यार हे शक्तीपेक्षाही कार्यक्षम आहेत. त्यामुळे मनुष्य पृथ्वीवरुन चंद्रावर गेला आणि आता इतर ग्रहांवर जाण्याची तयारी करीत आहे. आधुनिक काळात यंत्र हे शाप नसून मानव जातीला एक वरदान आहे. आज रशियाने यंत्राच्या बळावर खूप प्रगती केली आहे. जगता प्रबळ व संपन्न राष्ट ते बनले आहे. म्हणूनच सावरकर हे आधुनिक विचारसरणीचे होते.

## प्रकरण ९

# डॉ. सुभाषचंद्र बोस

**जीवन परिचय -**

सुभाषचंद्र बोस यांचा जन्म एका धार्मिक व उदारमतवादी कुटूंबात इ.स. १८९७ च्या २३ जानेवारीस कटक येथे झाला. कुटूंबातील धार्मिक आणि उदारमतवादी आई वडीलांचा प्रभाव त्यांच्यावर पडलेला दिसून येतो. त्यांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण स्पॉटिश हायस्कुलमध्ये झाले. महाविद्यालयीन शिक्षण त्यांनी प्रेसिडेन्सी व स्पॉटिश यात पुर्ण केले. उच्च शिक्षण पूर्ण झाल्यावर ते आय.सी.एस. परीक्षेसाठी इंग्लंडला गेले. आय.सी.एस. परीक्षा उत्तीर्ण होऊन ब्रिटीशांची गुलामगिरी पत्करण्यापेक्षा त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात उडी घेतली आणि आय.सी.एस.कडे पाठ फिरविली. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात अतिशय महत्वाची भूमिका पार पाडणारे व गांधीजीच्या नेतृत्वाला पाठींबा देऊनही वेगळा मार्ग स्विकारणारे सुभाष बाबु होते. ते चित्तरंजनादास यांचे शिष्य होते. १९२८ मध्ये ते कलकत्ता महानगरपालिकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी झले. हरीपूर व त्रिपुरा काँग्रेसचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. ती निवडणूक त्यांनी महात्मा गांधींच्या मनाविरुध्द लढवली. त्यामुळे नेताजी व गांधीजी यांच्यात मतभेद निर्माण झाले. त्यामुळे नेताजींवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली. नंतर नेताजींनी फॉरवर्ड ब्लॉकची स्थापना केली. नेताजी यांच्यावर राजा राममोहन रॉय, स्वामी विवेकानंद, रामकृष्ण परमहंस, डॉ. आंबेडकर, पंडीत नेहरु, जयप्रकाश नारायण त्याचप्रमाणे कार्ल मार्क्स, मुसोलिनी आणि हिटलर यांचा प्रभाव पडला होता.

नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी राष्ट्रवाद, धर्मनिरेक्षता, लोकशाही आणि आर्थिक विचार मांडले आहेत. इटली. जपान, जर्मनी यांच्या मदतीने आझाद हिंद संघटनेची बांधनी त्यांनी केली. १९४५ ला विमानाने प्रवास करीत असतांना त्यांच्या विमानाला अपघात झाला. भारत सरकारने त्यांच्या

मृत्युबाबत चौकशी कमिशन नेमले. परंतू त्यांच्या मृत्युबाबत ठोस माहिती उजेडात येऊ शकली नाही. त्यामुळे नेताजींच्या मृत्युचे गुढ अद्यापही कायम आहे.

**सुभाषचंद्र बोस यांचे राजकिय विचार :**

**राष्ट्रवाद आणि आंतरराष्ट्रवाद :** सुभाषबाबु हे थोर देशभक्त होते. भारत मातेच्या विरोधी त्यांनी कोणतीही तडजोड केली नाही. राष्ट्रीय एकात्मता, मातृभूमी यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले होते. भारतीय तरुणांमध्ये देशभक्ती रुजविण्याचे कार्य त्यांनी केले. त्यासाठी त्यांनी जहाल राष्ट्रवादाचा स्विकार केला. जहाल राष्ट्रवादाचे आक्रमक राष्ट्रवादात रुपांतर त्यांनी होऊ दिले नाही. भारतीय स्वातंत्र्य आंदोलन म्हणजे फक्त भारताची ब्रिटीश साम्राज्यातून मुक्तता करणे एवढाच मर्यादीत नसून पारतंत्र्यात असलेल्या अनेक देशांच्या स्वातंत्र्य लढ्यात त्यांनी पाठींबा दिला. त्यांनी आंतरराष्ट्रीय वादाचाही पुरस्कार केला. त्यांचा राष्ट्रवाद विधायक आणि व्यापक स्वरुपाचा होता.

**अध्यात्मिक दृष्टीकोन :**

नेताजींवर कुटूंबातील धार्मिक वातावरणाचा प्रभाव पडलेला होता. त्यांची ईश्वरावर श्रध्दा होती. स्वामी रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद व योगी अरविंद यांच्या अध्यात्मिक शिकवणीचा प्रभाव त्यांच्यावर होता. हिंदुस्थानच्या अध्यात्मिक परंपरेचा त्यांना अभिमान होता. त्यांचा प्रभाव देखील नेहमी व्यक्त केलेल्या विचारात दिसून येतो.

**धर्मनिरपेक्षता :** मानवी जीवनातुन धर्माचे महत्व ते मान्य करतात. धर्मातील अंधश्रध्देवर त्यांनी मोठ्या प्रमाणावर टिका केली होती. त्यांनी सांगितले कि, वैयक्तिक जिवनात धर्माचे आचरण करावे पण सार्वजनिक जिवनात धर्माचा आविष्कार केला जाऊ नये. त्यासाठी ते धर्म आणि राजकारण यांची फारकत मान्य करतात. स्वतः त्यांनी त्या पध्दतीने आचरण करुन आदर्श निर्माण केला होता. भारताला धर्मनिरपेक्ष तत्वांची गरज आहे अशी मांडणी ते करतात.

**लोकशाही समाजवाद :** सुभाषचंद्र बोस यांनी लोकशाही समाजवादाचा पुरस्कार केलेला आहे. नेताजींनी लोकशाही समाजवादाचा फक्त राजकीय लोकशाही स्थापन करुन समाजाच्या समस्या सुटनार नाही तर त्याबरोबर आर्थिक आणि सामाजिक लोकशाही स्थापन केली पाहिजे. स्वातंत्र्य, समता,

बंधुता आणि न्याय या तत्वावर आधारीत लोकशाही समाजवादाचा ते आग्रह धरतात. समाजातील आर्थिक प्रश्न सुटले कि, धार्मिक आणि सामाजिक तणाव सुटू शकतील यावर त्यांचा विश्वास होता. हीच भूमिका स्विकारुन ते लोकशाही समाजवादी दृष्टीकोनाचा विचार करतात.

**सुभाषचंद्र बोस यांचे सामाजिक विचार :** राजकीय सुधारणा आधी की, सामाजीक सुधारणा या वादात न पडता दोन्ही सुधारणा बरोबर झाल्या पाहिजे अशी त्यांची भूमिका होती. सामाजीक विषमता, जातीयवाद, धार्मिकवाद, स्त्री-पुरुष विषमता, वाढती लोकसंख्या, गरिबी या सर्व प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी सामाजिक सुधारणा करणे आवश्यक आहे. भारतात स्वातंत्र्यानंतर लोकशाही प्रस्थापित करायची असेल तर त्यासाठी सामाजिक सुधारणा होणे आवश्यक आहे. सामाजिक विचार पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**१) महिला विषयक विचार :**

सुभाष बाबु यांनी स्त्रिवादी व राष्ट्रवादी भूमिका विशद केलेली आहे. इतिहास काळातील अनेक कर्तृत्ववान स्त्रियांचा ते उल्लेख करतात. प्राचीनकाळी मैत्र्यही तर आधुनिक काळात रजिया बेगम, नुर जहॉ यांची उदाहरणे देऊन महिला किती कर्तृत्ववान असु शकतात हे स्पष्ट करतात. झाशीच्या राणीचा आदर्श घेवून देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्त्रियांनी देखील योगदान दिले पाहिजे, त्याग केला पाहिजे. एकंदरीत स्त्री शक्तीवर त्यांचा विश्वास होता. सुभाष बाबूंनी स्त्रियांच्या कर्तव्याबरोबरच हक्कांचा देखील अनेक भाषणातून उल्लेख केला. त्यांचे भाषण ऐकुन स्त्रीयांमध्ये प्रेरण निर्माण होत असल्यामुळे अधिका-धिक युवक-युवती, विद्यार्थी चळवळीत सहभागी झ ााले व आझाद हिंद फौजेने महत्वाची भूमिका पार पाडली. महिला जास्त प्रमाणात चळवळीत सहभागी झाल्या तर त्यांची गुलामगिरीतून सुटका होईल आणि महिलांना त्यांच्या हक्काची व शक्तीची जाणीव होईल अशी त्यांची भूमिका होती.

**२) युवकांसंबंधी विचार :**

सुभाष बाबुंनी कॉंग्रेस अंतर्गत 'युथलिंग'ची स्थापना केली होती. युवकांची चळवळ देशाच्या चारही दिशांना फोफावली पाहिजे व युवकांचे प्रबोधन घडून आले पाहिजे म्हणून त्यांनी प्रयत्न केले. युवकांनी स्वतंत्र

भारताच्या निर्मितीसाठी त्याग केला पाहिजे. आपल्या शत्रुशी आधुनिक पध्दतीने लढा दिला पाहिजे. सुभष बाबुंनी युवक संघटीत करण्यावर जास्त भर दिला होता. युवकांमध्ये श्रध्दा, सहिष्णुता वाढविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केला. देशासाठी त्याग केल्याशिवाय देशाला स्वातंत्र्य मिळत नाही म्हणून त्यांनी युवकांना 'तुम मुझे खून दो, मैं तुम्हे आझादी दुंगा' असे आव्हान केले होते. आझाद हिंद सेनेत युवकांचा भरणा त्यांनी मोठ्या प्रमाणात केला होता. युवक आणि बालक सेना उभारल्या होत्या. त्यात लष्करी प्रशिक्षणही दिले होते. युवकांच्या शक्तीवर त्यांचा विश्वास होता. युवक हेच क्रांती घडवून आणू शकतात, देशाचे उज्वल भवितव्य युवकांच्या हाती असते असे सुभाष बाबु म्हणतात. अन्याय, अत्याचार यांना विरोध करणे हे युवकांचे कार्य आहे.

**३) शिक्षणाविषयी विचार :**

भारतातील दारिद्रय आणि दुःख दूर करण्यासासाठी योग्य शिक्षण व्यवस्था राबवली पाहिजे. देशाला प्रगती घडवुन आणायची असेल, शिक्षणाशिवाय पर्याय नाही म्हणून नेताजी संपूर्ण शिक्षण धोरण बदलण्यावर भर देतात. संपूर्ण समाज सुशिक्षित झाला पाहिजे असा आग्रह ते धरतात. मुला-मुलींना सारख्या पध्दतीने शिक्षण दिले पाहिजे. मुलींना अधिक शिक्षणाची आवश्यकता आहे. या बाबतीत ते आग्रही भूमिका घेतात. आजच्या तरुण-तरुणींना धर्मनिरपेक्ष आणि वैज्ञानिक शिक्षण दिले पाहिजे तर सांस्कृतिक एकात्मता घडून आणण्यास मदत होईल. जनतेची मानसिकता शिक्षणाच्या माध्यमातून बदलता येईल. शिक्षण हे परिवर्तनाचे प्रभावी साधन ते मानतात.

**४) लोकसंख्याविषयी विचार :**

भारतातील वाढती लोकसंख्या पुढे राष्ट्रीय समस्या होणार याची जाणिव सुभाष बाबुंना स्वातंत्र्यपुर्व काळातच झालेली होती. म्हणूनच त्यांनी लोकसंख्येचे नियंत्रण झाले पाहिजे अशी भूमिका घेतली. देशाची लोकसंख्या वाढल्याने बेकारी, निरक्षरता, अन्नधान्याचा तुटवडा इ. समस्या निर्माण होतात. भारताची लोकसंख्या अशाच पध्दतीने वाढत राहिली तर कोणतीही आर्थिक योजना यशस्वी होणार नाही.

**५) धार्मिक विचार :**

सुभाष बाबु यांची ईश्वरावर श्रध्दा होती. स्वामी रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद व अरविंद घोष यांच्या अध्यात्मिक शिकवणीचा परिणाम त्यांच्या विचारांवर दिसून येतो. विचारांची मांडणी करतांना सत्याकडून अंतिम सत्याकडे नेणारा विचार ते स्विकारतात. म्हणून ते आपल्याजवळ गितेची प्रत कालीमातेचा फोटो व तुळशीमाळ भारताच्या अध्यात्मिक परंपरेचा अभिमान व ओळख म्हणून ते सोबत ठेवत असत. सुभाष बाबुंच्या मते धर्म म्हणजे शक्तीची आराधना करणे, पवित्र जीवन जगणे, मानवतेची सेवा करणे हीच खरी ईश्वर पुजा आणि हाच खरा धर्म होय. राष्ट्रवंत राहण्यासाठी ते शक्तीची पुजा करत. ते शक्तीचे उपासक होते. राष्ट्राची उन्नती व्हावी म्हणून सेवा आणि त्याग यांना आचरणात आणावे असे ते मानत.

**सुभाषबाबुंचे आर्थिक विचार :**

ब्रिटीश राजवटीत भारताची मोठ्या प्रमाणावर आर्थिक अवनती झालेली होती. औद्योगिक क्रांतींचे दुष्परीणाम भारताच्या उद्योग धंद्यांवर झालेले होते. सामाजीक आणि आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात वाढलेली होती. दारिद्रय आणि शोषणाचे प्रमाण जास्त होते. भारत हा कृषीप्रधान देश असुनही शेती पारंपारीक पध्दतीने केली जात होती. शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत नाजूक होती. शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर जमिनीचा महसुल आणि शेतसारा भरावा लागत होता. ब्रिटीशांच्या आर्थिक शोषणामुळे भारतीय लोकांच्या दारिद्रयात वाढ झाली. अशा परिस्थितीत ते समाजवादाला महत्व देतात. सुभाष बाबुंनी भारताचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी नियोजन सांगितले. आर्थिक नियोजनासंदर्भात शेती, उद्योगधंदे यांच्या नियोजनावर भर देऊन ते म्हणतात की, शेती व्यवसायात सुधारणा केली पाहिजे. तसेच शेती उद्योगासाठी नवनवीन साधनांचा अवलंब केला पाहिजे. बेकारीची समस्या सोडविण्यासाठी आपल्या अर्थव्यवस्थेत क्रांतीकारक बदल केले पाहिजे. म. गांधीजींच्या कुटीर उद्योगांना ते विरोध करतात. औद्योगिकरणाचे ते समर्थन करतात. भावी समृध्दीसाठी औद्योगिकरणाचा पाया देशात घालून जड उद्योग, मध्यम उद्योग आणि कुटीर उद्योगांचे जाळे देशभर पसरविले पाहिजे असे त्यांचे मत होते.

**सुभाषचंद्र बोस यांचे समाजवादाविषयी विचार :**

भांडवलशाहीच्या विरोधातून समतेवर आधारित समाजवादी विचार अनेक विचारवंतांनी मांडले. सुभाष बाबु, दादाभाई नौरोजी, स्वामी विवेकानंद यांच्याच विचारांचा प्रभाव सुभाष बाबु यांच्यावर पडलेला होता. त्यांनी इतरांचे विचार लक्षात घेवून समाजवादाच्या विचारांची मांडणी केली आहे. देशाच्या परिस्थितीला अनुकूल नियोजन करुन आर्थिक कार्यक्रमांना प्राधान्य देतात. पारंपारिक व मार्क्सवादातील पोथीनिष्ठेला विरोध करुन समाजवादाची मांडणी त्यांनी केलेली आहे. समाजवादी विचारांचा जगभर प्रसार त्यांनी केला. अशाच प्रकारची प्रेरणा सुभाष बाबुंना आधी विद्यार्थी जीवनात मिळालेली होती.

स्वामी विवेकानंद यांच्या समाजवादी विचारांचा प्रभाव सुभाष बाबूंच्या समाजवादी विचारांचा व्यापक स्वरुपाचा होता. अगदी लहानपणापासून विवेकानंद विचारांनी झपाटून गेलेल्या सुभाष बाबुंनी आयुष्यभर त्यांच्या विचारांची कास धरली. कुठेही संन्याशाची भुमिका त्यांनी घेतली नाही. विद्यार्थी समन्वयाची जिवनातही विवेकानंदांना अपेक्षित भूमिकेनुसार आपली कार्यपध्दत आखली व ती कार्यान्वित केली. सुभाष बाबूंनी गरिबांची सेवा केली. शक्य होईल तेवढी मदत त्यांनी केली. निरक्षरांना साक्षर करणाऱ्या हेतुने सुभाष बाबु खेडोपाडी जाऊन प्राथमिक शाळेच्या मुलांना शिकवत असत. अप्रत्यक्ष सहभागातून त्यांनी जनसेवेचा अनुभव त्यांनी घेतला होता. मानव सेवा करणे हाच त्यांचा हेतु होता. जिवन म्हणजे फक्त वैयक्तिक योग साधना नसून राष्ट्रसेवेसहित साऱ्या मानव जातीची सेवा होय.

लहानपणापासुन कुटूंबाचे संस्कार, शिक्षण, धार्मिक वृत्ती, जनसेवा हीच ईश्वर सेवा यामुळे सुभष बाबुंच्या समाजवादी विचारांना पूर्णतः भारतीय परंपरेचे स्वरुप होते. भारतात समाजवादाची अध्यात्मिक परंपरा होती. भारतीय ऋषीमुनींनी मानवतेची सेवा हाच खरा सेवाधर्म होय असे भारतीयांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न केला.

**आझाद हिंद सेना :**

नेताजी सुभाषचंद्र बोस १९४३ मध्ये सिंगापूरला आले. तेथील हिंदी लोकांनी त्यांचे जोरदार स्वागत केले. रासबिहारी बोस तेथेच होते. त्यांनी हिंदी

स्वातंत्र्य संघाची व आझाद हिंद फौजेची सर्व सुत्र नेताजींकडे सोपविले. नेताजी हे हिंदी स्वातंत्र्य संघाचे अध्यख व आझाद हिंद फौजेचे सरसेनापती बनले. त्याच वेळी त्यांनी आझाद हिंद फौजेस 'चलो दिल्ली'ची घोषणा दिली. लोकांनी मोठ्याप्रमाणे त्यांना 'नेताजी' ही पदवी बहाल केली. पुढे याच नावाने ते हिंदुस्थानच्या इतिहासात अजरामर झाले.

आझाद हिंद फौजेचे नेतृत्व स्विकारल्यानंतर तिची पुनर्रचना करण्याच्या कारणास त्यांनी सुरुवात केली. प्रशिक्षण केंद्रात कार्यक्षमता आणली गेली. स्त्रियांसाठी लष्करी प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यात आली. २१ ऑक्टोबर १९४३ रोजी नेताजींनी हंगामी सरकारची स्थापना केली आणि हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी आपण इंग्लंड व अमेरिका यांच्याविरुध्द युध्द पुकारत आहोत असे जाहिर केले. या घटनेचे पडसाद सर्व जगभर उमटले. जपान, जर्मनी आणि इटली व इतर अनेक राष्ट्रांनी नेताजींच्या या हंगामी सरकारास मान्यता दिली. लवकरच जपानी फौजांनी जिंकून घेतलेले अंदमान व निकोबार हे हिंदी प्रदेश या हंगामी सरकारकडे सुपुर्द करण्यात आले.

आझाद हिंद फौजेच्या गांधी ब्रिगेड, आझाद ब्रिगेड व नेहरु ब्रिगेड अशा तीन ब्रिगेड होत्या. त्या नेत्यांबद्दल नेताजींना आदर होता. आझाद हिंद फौजेतील सैनिक व अधिकारी कैद झाल्यावर ब्रिटीश सरकारने त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेऊन खटला भरला होता. हा खटला सर्व देशभर गाजला. आझाद हिंद फौजेतील सैनिक व अधिकारी यांची लोकप्रियता वाढत गेली. आझाद हिंद सेनेतील सैनिकांमध्ये हिंदुस्थानबद्दल प्रेम व ब्रिटीश सत्तेबद्दल द्वेष असेल तर आपणांस येथे दीर्घकाळ राज्य करता येणार नाही हे सत्य उमगल्यानंतर १९४४ ते ४५ सालानंतर ब्रिटीशांनी हिंदुस्थान सोडून जाण्याचा निर्णय पक्का केला. अशाप्रकारे हिंदुस्थान सोडून जाण्याच्या ब्रिटीशांच्या निर्णयास नेताजी सुभाष चंद्र बोस व त्यांची आझाद हिंद फौज यांचा पराक्रम व देशभक्ती बऱ्याच प्रमाणावर कारणीभूत ठरलेली आहे.

***

## प्रकरण १०

# राममनोहर लोहिया

---

**जीवन परिचय -**

राममनोहर लोहिया यांचा जन्म १३ मार्च १९१० मध्ये उत्तर प्रदेशात अक्तुबर येथे झाला. १९२५ मध्ये ते मॅट्रीकची परिक्षा पास झाले. पुढे १९२९ मध्ये ते B.A. honours झाले. १९३२ मध्ये त्यांनी Ph.D. पुर्ण केली. १९४२ च्या चले जाव चळवळीत सक्रीय भाग घेतला. १९५६ मध्ये त्यांनी Socialist Party ची स्थापना केली. १९५७ मध्ये डॉ. राममनोहर लोहिया लोकसभेच्या निवडणूकीत पराभूत झाले. मात्र १९६३ मध्ये लोकसभेवर निवडून आले. त्यांनी १९६५ मध्ये रशिया आणि पुर्व जर्मनीचा दौरा केला. त्यांनी समाजवादाला जास्तीत जास्त महत्व दिले. तसेच जातीयवादावर त्यांनी टिका केली. तसेच इंग्रजी भाषेला विरोध होता. अशा या थोर नेत्याचा मृत्यु १२ ऑक्टोबर १९६७ मध्ये दिल्ली येथे झाला.

**डॉ. लोहिया यांचे समाजवादाविषयी विचार :**

डॉ. लोहिया हे समाजवादाचे खरे प्रचारक होते. त्यांचा भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत अत्यंत महत्वाचा सहभाग दिसून येतो.

१. भारतातील समाजवादी चळवळ पुढे नेण्यासाठी डॉ. लोहिया यांनी प्रयत्न केले.

२. डॉ. लोहिया यांच्या मते भांडवलशाहीवाद म्हणजे साम्यवाद ही एकाच संस्कृतीचे दोन अंगे आहेत. याचे मुख्य कारण म्हणजे केंद्रिक उत्पादन व्यवस्था आणि सतत वाढणारे जीवनमान ही दोन प्रमुख वैशिष्ट्ये या दोन्ही विचारसरणीत होते. डॉ. लोहिया हे आर्थिक केंद्रीकरणाच्या विरोधात होते. डॉ. लोहिया म्हणतात साम्यवाद आणि भांडवलशाहीवादात योग्य सांगड न घातल्याने बेकारी, अत्याचार, नोकरशाही आणि हुकूमशाही निर्माण झाली.

३. डॉ. लोहिया यांनी वर्तमान व भविष्यकाळ, धार्मिकता व अधार्मिकता यांच्यातील विचार संघर्षाची चर्चा केलेली आहे. अंधश्रध्दा दूर झ ााल्याशिवाय समाज उपयुक्त विचारप्रणाली नांदू शकणार नाही असे मत व्यक्त केले.

४. डॉ. लोहिया यांच्यावर महात्मा गांधींच्या आर्थिक विकेंद्रीकरणाचा परिणाम झालेला दिसून येतो. त्यांनी लघुउद्योगांविषयी आपले मत व्यक्त केले. लहान खेड्यातील उद्योगधंद्यांच्या विकासासाठी आर्थिक विकेंद्रीकरणाची गरज प्रतिपादन केली.

५. डॉ. लोहिया यांनी समाजवादाविषयी विचार मांडताना चार खांबी पायावर आधारलेली राज्यव्यवस्था या विचाराचा पुरस्कार केला. या संकल्पनेत केंद्रीकरणा, विकेंद्रीकरण या दोन्ही गोष्टींचा एकत्रीकरणाचा प्रयत्न दिसून येतो. या पध्दतीत खेडे, जिल्हा, प्रदेश (प्रांत) आणि मध्यवर्ती शासन या चारही स्तरांना आपापली स्वायत्तता प्राप्त झालेली असते. विकेंद्रीकरणामुळे सत्तेची मक्तेदारी आपोआप नाहीशी होते.

६. डॉ. लोहिया यांना विकेंद्रीत समाजवादाचे व्याख्याते म्हटले जाते. त्यांनी स्थानिक लहान यंत्र, सहकारी / सामुदायिक कष्ट या बाबींचा पुरस्कार केला आहे. त्यांच्या मते लहान प्रभागावरील यंत्र म्हणजे भांडवलशाही सत्तेचा केंद्रीकरणावर व मोठ्या प्रमाणावरील बेकारीवरील एक चांगला उपाय आहे.

७. डॉ. लोहिया यांनी राष्ट्रीयकरणावर भर दिलेला आहे. जगातील वाढते आर्थिक परावलंबन व जागतिक जीवनमान उंचावण्यासाठी राष्ट्रीयकरणाची आवश्यकता आहे. असे मत व्यक्त केले. तसेच सामान्य जनतेच्या हक्कासाठी गांधीजींच्या सामुदायिक व वैयक्तिक कायदेभंगाचा पुरस्कार त्यांनी केला आहे.

८. जमिन महसुल रद्द व्हावी ही एक क्रांतीकारक घोषणा त्यांनी केलेली होती. जो पर्यंत अर्थशास्त्रीय आधार नसलेली जमिन महसुल रद्द होत नाही तोपर्यंत सामान्य - गरिब शेतकऱ्याच्या जीवनमानात सुधारणा होऊ शकत नाही.

अशाप्रकारे डॉ. लोहिया हे समाजवादाचे जोरदार समर्थक होते. ते फक्त समाजवादी नव्हते तर कृती आणि चिंतन यांनी व्यक्तिवादाचा विचास व्हावा या विचारसरणीचे ते होते.

**डॉ. लोहिया यांचा नवसमाजवाद / नवसमाजवादाची लक्षणे घटके / तत्वे :**

१. समतेचे तत्व

२. सामाजिक मालकी

३. लघुउद्योग

४. चारखांबी राज्यव्यवस्था / चतु:स्तंभी योजना

५. उच्च राहणीमान

६. जागतिक संसद आणि सरकार

**१. समतेचे तत्व :**

डॉ. लोहिया यांनी नवसमाजवादाच्या समतेच्या तत्वाचा पुरस्कार केला आहे. समाजवाद हा समता प्रस्थापित करण्याचे एक मोठे साधन आहे. समतेच्या तत्वात त्यांन पुढील विचार मांडला.

१) **स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करणे :** डॉ. लोहिया यांच्या मते पुरुषप्रधान संस्कृतीने नेहमीच आपला अहंमपणा जोपासला व स्त्रियांचे जीवन बंदिस्त ठेवले आहे. याला लोहियांनी विरोध केला.

२) **रंग समानता व त्यानुसार सौंदर्याच्या कसोट्यांना मान्यता देणे :** या घटकांत लोहियांनी आफ्रिकेतील गोरे आणि को हा भेद व भारतातील उच्चवर्णीय व मागासवर्गीय हा भेद नष्ट करण्याचे आवाहन केले.

३) **जातप्रथा नष्ट करणे :** डॉ. लोहिया म्हणतात सर्वांना समान संधी दिल्याने जातीप्रथेची समस्या सुटनार नाही त्यासाठी काहींना विशेष संधी द्यावी लागेल.

४) **राजकीय गुलामी व साम्राज्यवादाचा विनाश झाला पाहिजे :** कोणीही पारतंत्र्यात राहू नये. कोणालाही राजकीय गुलामगिरीत ठेवणे याचा पुरस्कार लोहियांनी केला.

५) **सरकारच्या अनुचित हस्तक्षेपापासुन व्यक्तिगत जीवनाचे रक्षण करणे :** प्रत्येकाला सुखमय, आनंदी जीवन प्राप्त करुन देणे. त्यांच्या शिक्षणाची व आरोग्याची सोय करणे.

६) **निःशस्त्रीकरणाबरोबरच सत्याग्रहाचा मार्ग स्विकारणे.**

**२. सामाजिक मालकी :** डॉ. लोहिया यांनी समाजवाद प्रस्थापित करण्यासाठी सामाजिक मालकी तत्वाचा पुरस्कार केलेला आहे. खाजगी मालमत्ता पध्दत नष्ट करुन मालमत्तेवर समाजाचीच मालकी असावी असे मत व्यक्त केले. तरच खऱ्या अर्थाने आपल्या देशात समाजवाद प्रस्थापित होईल.

**३. लघुउद्योग :** डॉ. लोहिया हे लघुउद्योगचा पुरस्कार करणारे होते. त्यांच्या मते लहान उद्योग हे खेड्यापाड्यापर्यंत विस्तारीत करता येतात. आर्थिकदृष्ट्या ते उपयुक्त ठरतात. समाजवादाच्या यशासाठी आर्थिक विकेंद्रीकरण आवश्यक आहे.

**४. चार खांबी राज्यव्यवस्था :** डॉ. लोहियांनी चार खांबी राज्यव्यवस्थेचा पुरस्कार केला आहे. खेडे, जिल्हा, प्रांत व केंद्र यावर आधारीत राज्यव्यवस्था असावी व या विभागांना कायदा करण्याचे व त्यांची अंमलबजावणी करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे असे डॉ. लोहिया म्हणतात. केंद्र सरकारच्या ताब्यात लष्करी पोलीस यंत्रणा असावी. रेल्वे लोखंड, पोलाद, स्टिल इ. उद्योग केंद्राच्या ताब्यात असावे. लहान कारखाने खेडी व जिल्ह्याच्या नियंत्रणाखाली असावे.

**५. उच्च राहणीमान :** डॉ. लोहियांच्या मते समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपल्या जीवनमानात सुधारणा केली पाहिजे. याचाच अर्थ बेकारी, दारिद्रय यातुन बाहेर पडुन व्यक्तीचे जीवनमान हे आरामदायी व सुखकारक झाले पाहिजे. गरिब व श्रीमंत यांच्यातील विषमतेची दरी कमी झाली पाहिजे तेव्हा सर्वांचे जीवनमान सुधारेल व समाजवादाला यश प्राप्त होईल.

**६. जागतिक संसद व शासन :** डॉ. लोहियांच्या मते जगातील विविध राष्ट्रांच्या जवळ असलेली सत्ता व शस्त्रसामुग्री यांचा वापर जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी आणि आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी केला पाहिजे. तसेच विकसित राष्ट्रांनी विकसनशील देशांना मदत केली पाहिजे.

**डॉ. लोहिया यांचे भाषावादाविषयी विचार :**

डॉ. लोहिया यांच्या मते भारतात भाषावादाचा जो गंभीर प्रश्न आहे त्याला दक्षिण भारत विरुध्द उत्तर भारत असे स्वरुप देण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र खऱ्या अर्थाने हा वाद इंग्रजी येणाऱ्या पांढरपेशांविरुध्द इंग्रजी न

बोलता येणारा सुशिक्षित, अशिक्षित असा बहुजन समाजाचा आहे. थोडक्यात इंग्रजी भाषेविरुध्द लोकभाषा अशा स्वरुपाचा आहे. दुर्दैवाने काही नेत्यांनी या भाषावादाला प्रोदशिक वादाचे स्वरुप दिले. प्रांतवादाचा विचार करतांना किनारपट्टीवर असलेले म्हैसुर, आंध्रप्रदेश, केरळ, ओरिसा, बंगाल, तामिळनाडु, महाराष्ट्र, गुजरात, आंतरभागातील मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान हे हिंदी भाषिक प्रदेश असे दोन वर्ग पडतात.

डॉ. लोहिया यांच्या मते किनारपट्टीच्या प्रांतातील काही नेते म्हणतात की, इंग्रजीचे उच्चाटन केले तर हिंदी आपल्या मानगुटीवर बसेल. आंतरभागातील नेते म्हणतात इंग्रजीचे उच्चाटन केले तर देशाची एकात्मता नष्ट होईल, बंगाल व तामिळनाडु हे राज्य फुटून निघतील.

महाराष्ट्र व गुजरात या प्रांतात हिंदी भाषेला प्रखर विरोध नव्हता. तसेच इंग्रजी भाषेचे पूर्ण उच्चाटन करण्याची घाई देखील नव्हती. तसेच गुजराथी व मराठी या भाषांचा आग्रह देखील नव्हता. डॉ. लोहिया यांच्या मते पं. नेहरु व राजगोपालाचारी यांनी देशाला एका कैचीत पकडले आहे. नेहरुंनी तर इंग्रजी समर्थकांची भाषा बोलून दाखविली आहे. त्यांच्या मते इंग्रजीचे उच्चाटन केले तर देशाचे विघटन होईल. राजगोपालाचारी यांच्या मते किनारपट्टीवरील अहिंदी भाषिक व तामिळनाडुमधील इंग्रजी समर्थकांची भिती ते दाखवितात. व इंग्रजी गेली तर हिंदी भाषिकांचे साम्राज्य निर्माण होईल.

डॉ. लोहिया यांच्या मते भारतातील भ्रष्टाचार मिटविण्यासाठी शिवाजी महाराज, सुभाषचंद्र बोस व म. गांधी अशा थोर नेत्यांची आज गरज आहे. डॉ. लोहिया यांच्या मते किनारपट्टीवाले व आंतरभागातील नेत्यांनी महानता दाखविली तर भाषेची समस्या सुटेल. लोहिया म्हणतात की भारतातील राष्ट्रपती, उपराष्ट्रपी, पंतप्रधान, केंद्र व घटकराज्याचे मंत्री आणि लोकप्रतिनिधी यांनी आपला व्यवहार मातृभाषेत / हिंदी भाषेत करुन इंग्रजीवर बहिष्कार टाकला पाहिजे. तसेच न्यायालयात देखील प्रांतिक भाषेचा हिंदी भाषेचा अवलंब केला पाहिजे.

**डॉ. राममनोहर लोहिया यांचे जातिविषयी विचार :**

डॉ. लोहिया यांच्या मते जाती प्रथा ही फक्त भारतातच नाही तर संपूर्ण विश्वात आहे. ती वेगवेगळ्या स्वरुपात अस्तित्वात होती आणि आहे.

मात्र हिंदुस्थानात दिर्घकाळापासून ती टिकून राहिली आहे. प्रामुख्याने ह्या जाती व्यवस्थेला धर्माचे अधिष्ठान प्राप्त झालेले आहे. हिंदुस्थानात मनुष्याचा वर्ग बदलला तर त्याची जात बदलत नाही. म्हणजेच एखाद्या कनिष्ठ जातीतील व्यक्तीने स्वकर्तृत्वाने विद्या संपन्न केली, श्रीमंत झाला तरी त्या व्यक्तीला वरच्या जातीत प्रवेश मिळत नाही. मानवाचा वर्ग बदलला तरी जात बदलत नाही. अशी ही भक्कम जातीव्यवस्था त्या व्यक्तीच्या मृत्युबरोबर संपते. लोहियांच्या मते समाजातील निरनिराळ्या वर्गाचे समाजाचे योग्य स्थान कायम टिकवून राहावे ह्या हेतुने जातीची निर्मिती केली होती.

डॉ. लोहिया यांच्या मते जाती प्रथेविषयी भारताचा विचार करता या देशाने पराभूत परकियांना स्वतःमध्ये सामावून घेतले अशा रीतीने गेल्या ५००० वर्षांपासून जिंकलेला मानवी समूह निरनिराळ्या समाज गटात विभागला गेला व ह्या देशात त्याने आपले अस्तित्व टिकवून ठेवले. अशा रितीने समाजाच्या विभाजनामुळे जाती प्रथेची एक मोठी दलदल निर्माण झाली. डॉ. लोहिया यांच्या मते जाती प्रथा हा भारतीय संस्कृतीचा सर्वात घातक वारसा आहे. ज्या व्यक्ती जातीप्रथा मान्य करीत नाही ते असा दंडोरा पिटतात ते प्रत्यक्ष व्यवहारात जातीयतने वागतात. एवढेच नाही तर समाज जीवनातील सर्व मुख्य व्यवहार जातीच्या अंतर्गतच पार पडतात. उदा. धर्म, विवाह आणि मृत्यु हे सर्व महत्वपूर्ण संस्कार जातीच्या चौकटीतच होत असतात. डॉ. लोहियांच्या मते जाती निर्मुलनाचे कार्य फक्त रोटी व्यवहारापुरते झालेले आहे. बेटी व्यवहारापर्यंत त्यांनी अजून मजल मारलेली नाही. भारतात जातीय व्यवस्था मोठ्या प्रमाणात रुजलेली आहे व तिचा समाजाच्या प्रत्येक क्षेत्रावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे परिणाम झालेला दिसतो.

डॉ. लोहिया यांच्या मते जगात वरिष्ठ, कनिष्ठ, उच्च-निच हा भेदभाव सर्वत्र, कमी जास्त प्रमाणात दिसून येतो. भारताचा विचार करता व्यक्ती-व्यक्तीतील फरक हा जन्म आणि जात यावरुन दिसून येतो. डॉ. लोहिया म्हणतात छोट्या जातीचे लोक ९०% आहेत. मात्र ते लखव्यासारखे पडलेले आहेत. देशाच्या अप्रगतीचे व भूतकाळातील गुलामगिरीचे ते एक कारण आहे. त्यामानाने पाश्चिमात्य देशात कनिष्ठ समाजातून मोठे मुत्सद्दी,

योध्दे, राजनेते निर्माण झाले. उदा. १. स्टॅलिन हा चांभाराचा मुलगा होता, २. हिटलर हा रंगारीचा मुलगा होता, ३. क्रुश्चेव हा धनगराचा मुलगा होता.

**जातीप्रथेचे परिणाम :**

डॉ. लोहिया यांच्या मते भारतात हजारो वर्षांपासून जातिव्यवस्था प्रचलीत आहे. परिणामतः ह्या जातीचे काही वेगवेगळे रितीरिवाज आहेत. आणि ते भक्कम झाले आहेत. सामाजिकदृष्ट्या देशाचे अनेकदा विभाजन झालेले आहे. काही जातींकडे वंश परंपरेने - राज्यकारभार, व्यवसाय, व्यापार, शेती, कारागिरी इ. चालत आलेले आहे. उदा. मारवाडी, बनियाकडे, ब्राम्हण वर्गाकडे ज्ञान, शुद्राकडे शेती, अस्पृश्यांकडे गलिच्छ व मोलमजुरीची कामे. अशा प्रकारे जाती व्यवस्थेमध्ये मानवाला मिळणारी संधी व योग्यता ही विशिष्ट जातीसंबंधी मर्यादित राहिली. सर्वात मोठा अनिष्ट परिणाम म्हणजे अधिकारी व राजकीय नेता हा आपल्याच जाती माणसांना वर आणण्याचा प्रयत्न करतो. म्हणजेच आपल्याच जात बांधवांना मोठ्या पदावरच्या नोकऱ्या प्राप्त करुन देत असतो. उदा. मराठा, रेड्डी, जाट, ठाकूर, दलित, यादव हे सर्व तेच करीत असतात.

डॉ. लोहिया यांच्या मते मागासलेल्या जतींना त्यांच्या गरजेनुसार नेहमी संधी दिली पाहिजे. मागासलेलया जातींना स्वावलंबी व स्वतंत्र केले पाहिजे. डॉ. लोहिया यांना जातीव्यवस्था, समाज मार्गातील अडथळा वाटत होतो. म्हणून त्यांनी सामाजिक अन्यायाविरोधी तिव्र संघर्ष उभा केला होता.

***

# संदर्भ ग्रंथसुची


| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. डोळे ना.य. | - | प्रमुख भारतीय राजकीय विचारवंत<br>विद्या बुक्स पब्लीशर्स, औरंगाबाद जुन १९९९ |
| २. | डॉ. भोळे भा.ल. | - | आधुनिक भारतातील राजकीय विचार<br>पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लीशर्स, नागपूर जुन २००३ |
| ३. | कुलकर्णी बी.वाय. | - | भारतीय राजकीय विचारवंत<br>विद्याभारतीय प्रकाशन, लातूर |
| ४. | डॉ. साबळे आर.डी. | - | भारतीय राजकीय विचारवंत<br>अभय प्रकाशन, नांदेड जुन १९९९ |
| ५. | डॉ. पाटील वा.भा. | - | आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत<br>प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव २००९ |
| ६. | डॉ. कळंबे दिनकर | - | भारतीय राजकीय विचारवंत<br>कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद |
| ७. | डॉ. भोळे भास्कर लक्ष्मण<br>विचार | - | भारतीय आणि पाश्चीमात्य राजकीय<br><br>पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर |
| ८. | प्रा. गोखले आर.एम. | - | आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत<br>कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे |
| ९. | वराडकर र.घ. | - | भारतीय राजकीय विचारवंत<br>विद्या प्रकाशन, नागपूर |
| १०. | प्रा. चोपडे किसन | - | भारतीय राजकीय विचार<br>विद्या बुक्स पब्लिशर्स, नागपूर |
| ११. | डॉ. गाठाळ साहेबराव | - | आधुनिक भारतीय विचारवंत<br>कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद |
| १२. | डॉ. देवरे पी.डी.<br>डॉ. निकुंभ दिलीपसिंह | - | आधुनिक राजकीय विचारवंत<br>प्रशांत पब्लीकेशन्स, जळगाव |
| १३. | प्रा. मुळीक आर.जी. | - | भारतीय राजकीय विचारवंत<br>सिंधुताई राजाराम मुळीक, वसंत नगर, सांगली |
| १४. | पाटील संभाजी<br>डॉ. पाटील लिला | - | ओळख थोर नेत्यांची<br>परी प्रकाशन, कोल्हापूर |
| १५. | प्रा. पाटील व्ही.बी.<br>सुधारणेचा इतिहास | - | एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील समाज<br>के. सागर पब्लिकेशन्स, पुणे |
| १६. | देशपांडे श्रीकांत वि. | - | भारतीय राजकीय विचारवंत<br>श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर |
| १७. | कुलकर्णी व्ही.जी. | - | भारतीय राजकीय विचारवंत<br>कैलास पब्लीकेशन्स, औरंगाबाद |
| १८. | डॉ. पाटील वा.भा. | - | स्वातंत्र्योत्तर भारतीय राजकीय विचारवंत<br>प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव |

१९. फडके य.दी. - कहानी सुभाषचंद्रांची
श्री विद्या प्रकाशन, पुणे

२०. जोग वि.स. - देश गौरव सुभाषचंद्र बोस
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

२१. भिडे रामकृष्ण गोपाळ - नेताजी सुभाषचंद्र बोस
चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणे

२२. खाडिलकर नीळकंठ - नेताजी
परचुरे प्रकाशन, मुंबई

२३. डॉ. ढोबळे रमेश - आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत
विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद

२४. कीर धनंजय - डॉ. बाबासाहेब आंबेडकर
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

२५. खरे भा.द. - लोकमान्य टिळक दर्शन
केसरी प्रकाशन, पुणे

२६. दळवी म.य. - डॉ. राममनोहर लोहियांचे वैचारिक योगदान
कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद

२७. तळवलकर गोविंद - नवरोजी ते नेहरु
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

२८. फडके य.दि. - आंबेडकरी चळवळ
श्री विद्या प्रकाशन, पुणे

२९. फाटक न.र. - लोकमान्य
मौज प्रकाशन, मुंबई

३०. फडके भालचंद्र - डॉ. बाबासाहेब आंबेडकर
श्रीविद्या प्रकाशन, पुणे

३१. डॉ. पाटील संभाजी संतोष - थोर भारतीय विचारवंत
ऑरेन्ज बुक्स पब्लिकेशन्स, स्मृती नगर, भिलाई, छत्तीसगड

***



# भारतीय राजकीय विचार

## लेखक परिचय

### प्रा. डॉ. संभाजी संतोष पाटील

**(एम.ए.,, बी.एड., एम.फील., पीएच.डी.)**

| | |
|---|---|
| सहयोगी प्राध्यापक | - श्री. शि. वि. प्र. संस्थेचे भाऊसाहेब ना. स. पाठील साहित्य आणि मु. फि. मु. अ. वाणिज्य महाविद्यालय, देवपूर धुळे. |
| अध्यक्ष | - खान्देश राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषद |
| सहा. संपादक | - विचारमंथन संशोधन पत्रिका |
| मा. केंद्रसंयोजक | - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. |
| अध्यक्ष | - रिअल इंडो ग्लोबल व्हिजन सोशल डेव्हलपमेंट गुरूकुल फाउंडेशन, धुळे. |
| मा. जिल्हाध्यक्ष | - ओ. बी. सी. सेवा संघ, धुळे. |
| मा. व्यवस्थापक | - शिवगंगा बायोटेक |
| | - स्पर्धा परिक्षा व व्यवसाय मार्गदर्शन केंद्र, श्री. शि. वि. प्र. संस्थेचे महाविद्यालय, धुळे. |
| समन्वयक | - करिअर कट्टा, श्री. शि. वि. प्र. संस्थेचे महाविद्यालय, धुळे. |
| पुरस्कार | - गुरुगौरव पुरस्कार २०१७ |
| | - भारत शिक्षा रत्न अवार्ड 2021 |
| आदर्श गुरुजन पुरस्कार | - २०२१ |
| | - राज्यस्तरीय गुरुगौरव पुरस्कार २०२२ |
| | - महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत उत्कृष्ट विभागीय महाविद्यालयीन समन्वयक पुरस्कार २०२२ |
| | - राज्यस्तरीय लोकराजा राजर्षी शाहू गौरव |

पुरस्कार २०२३

- राज्यस्तरीय समाजभुषण पुरस्कार २०२३
- राष्ट्रीय शिक्षारत्न पुरस्कार २०२३
- नेशन बिल्डर अवार्ड २०२४

- आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य विभागीय परिषदा व चर्चासत्रात विविध विषयांवर शोधनिबंध सादर व १४ पुस्तके प्रकाशित.
- वर्तमानपत्र व नियतकालीकातून लेख प्रसिध्द, विविध विषयांवर भाषणे दिलेली आहेत. तसेच ७५ लेख प्रकाशित.
- विविध विषयांवर मार्गदर्शन व प्रभावी व्याख्याने
- सामाजिक कार्य तसेच विविध जनप्रबोधनात्मक जनजागृती रॅलीचे आयोजक.

***